# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१०/ २०१८** **दिनांक ०६.०९.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.०६.०९.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२६०७/२०१८, दि.२९.०८.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.०६.०९.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग, सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०६. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०७. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.अमोल कीर्तिकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.०६.०९.२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. हया संदर्भात शिवसेना सचिव श्री.अनिल देसाई व पर्यावरण मंत्री मा.श्री.रामदास कदम यांनी मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती व मा.मुख्यमंत्र्यांनी शिवसेनेला व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष पद देण्यास संमती दिली होती. याबाबत अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे खेद वाटत आहे. त्यामुळे या बैठकीस उपस्थित राहण्यास मला स्वारस्य नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.१** दिनांक २२.०८.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

**निर्णय क्र.५३६** **दिनांक २२.०८.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.**

**१) निर्णय क्र.५१४-** यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर प्रस्तावीत व चालू असलेल्या प्रकल्पांवर होणाऱ्या अपेक्षित खर्चाचे तुलनेत माहे जुलै-२०१८ अखेर रु.८८.८५ कोटी खर्च झालेला आहे. आयकर कायद्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची दि.३१.०३.२०१९ अखेर खर्च करावयाची अखर्चित रक्कम रु.३४३.९२ कोटी आहे. त्यामुळे उर्वरीत कालावधीत रु.२५५.०७ कोटी खर्च होणे आवश्यक असल्याने साईभक्तांचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, कॅन्सर हॉस्पीटलची उभारणी करणे, मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरु करणे, यासाठी आवश्यक असलेल्या जमिनी खरेदी करणे इत्यादी साठी अखर्चीत रक्कमेचा विनियोग करावा असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१८-१९ अखेर प्रस्तावीत व चालू असलेल्या प्रकल्पांवर होणाऱ्या अपेक्षित खर्चाचे तुलनेत माहे जुलै-२०१८ अखेर रु.८८.८५ कोटी खर्च झालेला आहे. आयकर कायद्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाची दि.३१.०३.२०१९ अखेर खर्च करावयाची अखर्चित रक्कम रु.३४३.९२ कोटी आहे. त्यामुळे उर्वरीत कालावधीत रु.२५५.०७ कोटी खर्च होणे आवश्यक असल्याने साईभक्तांचे दृष्टीने आवश्यक असलेल्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे, कॅन्सर हॉस्पीटलची उभारणी करणे, मेडीकल व नर्सिंग कॉलेज सुरु करणे, यासाठी आवश्यक असलेल्या जमिनी खरेदी करणे इत्यादी साठी अखर्चीत रक्कमेचा विनियोग करावा असे ठरले.**

तसेच संस्थानचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र आयकर कार्यालयाकडे दाखल करणेकामी सदर आयकर विवरणासोबत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाची रक्कम कशी व कोणत्या उद्दीष्टांसाठी खर्च करण्यात येईल याबाबतचा मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय सोबत जोडणे बंधनकारक असल्याने पुढील पाच वर्षात संस्थानचे उद्दीष्टांवर होणाऱ्या आर्थिक वर्ष २०१७-१८ चे अखर्चित उत्पन्न रक्कम रु.२७५ कोटी संस्थान वा संस्थानच्या संयुक्त विद्यमाने खर्चाच्या नियोजनाचा ढोबळ मसुदा सन २०१७-१८ या वर्षाचे आयकर विवरणपत्रासोबत आयकर विभागाकडे दाखल करणेस मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१ | मंदिराची विश्वस्तव्यवसथेच्या मालमत्तांचा विकास करणे, स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे, देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे. |
| ०२ | भक्तांना प्रसाद भोजन देणे आणि अन्नछत्र चालविणे, पाणी योजनेकरीता. |
| ०३ | भक्तांना दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोई व सुविधा पुरविणे, दर्शनरांग प्रकल्प. |
| ०४ | भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी भक्तनिवास, विश्रामगृह बांधणे, त्याची दुरुस्ती देखभाल करणे, भक्तांकरीता साईसिटी प्रकल्प निर्मिती. |
| ०५ | शासन मान्यतेने नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, सोसायटी यांचे शैक्षणिक संस्था, क्रिडा, संस्था वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शरिरीक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला व साहित्य क्षेत्राशी संबधीत असलेली संस्था, कोणत्याही बिगर वाणिज्यीक सांस्कृतीक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेणे, शैक्षणिक संकुल. |
| ०६ | शिर्डी नगरपंचायतीस स्थानिक नागरी सेवा व सुविधा व वाढ होण्यासाठी, शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणे. |
| ०७ | भक्तांच्या / जनतेच्या सोईसाठी संस्थानच्या २५ कि.मी.परिसरातील रस्त्यांची कामे करणे. |

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

२) निर्णय क्र. ५१७ - यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई महासमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त संस्थानचे सर्व मा.विश्वस्त, माजी विश्वस्त,मान्यवर व प्रतिनियुक्तीवरील शासकीय अधिकारी, इतर अधिकारी/कर्मचारी यांना प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कंत्राटी कर्मचारी १७५० (आऊटसोर्स) वगळता इतरांना साई प्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे सप्रेम भेट म्हणून देणेस मान्यता देण्यात आली व याकामी १०,००० चांदीची नाणी नमुन्या प्रमाणे तयार करण्यास येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर चांदीच्या नाण्यावर सन १९१८–२०१८ असा उल्लेख करावा, सप्रेमभेट म्हणून दिलेल्या चांदीची नाणे व्यतिरीक्त उर्वरीत चांदीची नाणे साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, तसेच भविष्यात देखील सदर नाणे 'शताब्दी नाणे' म्हणून विक्रीसाठी उपलब्ध करावे. सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मा.विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा शासनाची मान्यता मिळालेनंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई महासमाधी शताब्दी महोत्सव २०१८ निमित्त संस्थानचे सर्व मा.विश्वस्त, मान्यवर,संस्थानचे आस्थापनेवरील कायम व कंत्राटी कर्मचारी अधिकारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/ कर्मचारी यांना साई प्रतिमा असलेले २५ ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे सप्रेम भेट म्हणून देणेस मान्यता देण्यात आली. मात्र आऊटसोर्स करण्यात आलेल्या कामांवरील कर्मचाऱ्यांना सदर नाणे देण्यात येऊ नये, असे ठरले.व याकामी दहा हजार चांदीची नाणी भारत सरकारच्या फोर्ट, मुंबई येथील टाकसाळीतुन नमुन्या प्रमाणे तयार करुन खरेदी करण्यास व येणाऱ्या अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर चांदीच्या नाण्यावर सन १९१८–२०१८ असा उल्लेख करावा, सप्रेमभेट म्हणून दिलेल्या चांदीची नाणे व्यतिरीक्त उर्वरीत चांदीची नाणे साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, तसेच भविष्यात देखील सदर नाणे 'शताब्दी नाणे' म्हणून भारत सरकारच्या फोर्ट, मुंबई येथील टाकसाळीतून आवश्यकतेप्रमाणे खरेदी करुन साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करावे. सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनाचे मा.विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा शासनाची मान्यता मिळालेनंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

---

३) **निर्णय क्र.५२०-** यावर सविस्तर चर्चा होऊन, नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित, नांदेड यांचे श्री गुरुजी सहकार रुग्णालय यांना कॅथ लॅब व सिटी स्कॅन उपकरणासाठी रक्कम रु.३.६५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांची शिफारस असल्याने तत्वता मान्यता देण्यात आली. तथापी सदर रुग्णालयाची नोंदणी सोसायटी ॲक्ट १९६० नुसार झालेली असल्याने आर्थीक अनुदान देता येईल काय ? याबाबत शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नंदीग्राम वैद्यकीय सहकारी संस्था मर्यादित,नांदेड यांचे श्री गुरुजी सहकार रुग्णालय यांना कॅथ लॅब व सिटी स्कॅन उपकरणासाठी रक्कम रु.३.६५ कोटी आर्थिक मदत देणेबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांची शिफारस असल्याने तत्वता मान्यता देण्यात आली. तथापी सदर रुग्णालयाची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये झालेली असल्याने आर्थीक अनुदान देता येईल काय? याबाबत शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

४) **निर्णय क्र. ५३०-** यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आर्थिक वर्ष २०१२-१३ व त्यापुढीलही वर्षा संबंधीत आलेल्या नोटीसी संदर्भात आवश्यकते नुसार फेर कर निर्धारण करणे, अपिल, आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल करणेबाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सी.ए., विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविणेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना देण्यात यावे असे ठरले.

तसेच व्हॅट कर वसुलीबाबतच्या नोटीशी विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचीका औरंगाबाद खंडपीठाकडे वर्ग झाली असुन त्यासाठी औरंगाबाद येथील ॲडआर.एन.धोर्डे यांचेशी चर्चा झाली असुन त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. असे मा.ॲड मोहन जयकर यांनी नमुद केले, तसेच ॲडआर.एन.धोर्डे यांना वकीलपत्र देणेबाबत सुचीत केले, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा करण्यात आली आर्थिक वर्ष २०१२-१३ व त्यापुढीलही वर्षा संबंधीत आलेल्या नोटीसी संदर्भात आवश्यकते नुसार फेर कर निर्धारण करणे, अपिल, आवश्यकतेनुसार मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल करणेबाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सी.ए., विधीज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविणेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांना देण्यात यावे असे ठरले.**

**तसेच व्हॅट कर वसुलीबाबतच्या नोटीशी विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचीका औरंगाबाद खंडपीठाकडे वर्ग झाली असुन त्यासाठी औरंगाबाद येथील ॲड आर. एन. धोर्डे यांचेशी चर्चा झाली असुन त्यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. असे मा.ॲड मोहन जयकर यांनी नमुद केले, तसेच त्यासाठी त्यांचा मुलगा ॲड व्ही.आर. धोर्डे यांना वकीलपत्र देणेबाबत सुचीत केले, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

५) **निर्णय क्र.५३३-** नुकत्याच केरळ राज्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील जनतेवर नैसर्गिक संकट कोसळून मोठया प्रमाणात जिवित व आर्थिक हानी झालेली आहे, मानवतेच्या दृष्टीकोणातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने मदत म्हणून रु. ५ कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी मात्र) इतकी रक्कम शासनाच्या पूर्व मान्यतेने 'मुख्यमंत्री केरळ पुरग्रस्त सहायता निधी' (Chief Minister Kerala Flood Relief Fund) यांचेकडे जमा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**नुकत्याच केरळ राज्यात आलेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील जनतेवर नैसर्गिक संकट कोसळून मोठया प्रमाणात जिवित व आर्थिक हानी झालेली आहे, मानवतेच्या दृष्टीकोणातून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या वतीने मदत म्हणून रु. ५ कोटी (अक्षरी रुपये पाच कोटी मात्र) इतकी रक्कम केरळ पुरग्रस्तांसाठी शासनाच्या पूर्व मान्यतेने 'मुख्यमंत्री सहायता निधी', महाराष्ट्र राज्य यांचेकडे जमा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**विषय नं.२** **मा. शासनाने दि. २१ सप्टेंबर, २०१७ रोजी पारीत केलेली अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतची नियमावली श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता लागु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) मा.शासन निर्णयातील अनुकंपा तरतुदीचे अनुषंगाने, शासकीय सेवेत असतांना मृत पावणा-या कर्मचा-यांच्या कुटूंबातील एका पात्र वारसदारास सरळ सेवेने भरल्या जाणा-या गट-क व गट-ड चे पदांवर नेमणूक देणेची कार्यपध्दती आहे. अशा पध्दतीने अनुकंपा तत्वावरील एका पात्र वारसदारास सेवेत समाविष्ट करुन घेणेबाबत मा.शासनाने दि.२१ सप्टेंबर,२०१७ अन्वये सर्व समावेशक नियमावली प्रसिध्द केलेली आहे.या शासकीय नियमावलीतील तरतुदी संस्थान व्यवस्थापनास लागु करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१जून,२०१८ रोजीचे सभेत सविस्तर व तपशिलवार प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू प्रस्तावावर निर्णय क्र.३७१ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

"...अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीचे मा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे, समिती सदस्य यांनी अवलोकन करावे व व्यवस्थापन समितीच्या पुढील बैठकीत त्यांचे अभिप्राय सादर करावेत. त्यानंतर पुढील निर्णय घ्यावा, असे ठरले."

ब) मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार मा.श्री. भाऊसाहेब वाकचौरे, समिती सदस्य यांनी प्रस्तावीत अनुकंपा नियमावलीचे पुर्नःवाचन व अवलोकन केले असून दि.१६/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे अभिप्राय सादर केलेला आहे -

१) नियम क्र.०१ मधील तरतूद जशीच्या - तशी लागू राहील.

२) नियम क्र. ०२ चे (अ) मध्ये " शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट क व गट ड संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियानाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील." असे नमूद आहे,

त्याऐवजी ...

"संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट 'अ' 'ब' 'क' व 'ड' संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील." अशी दुरुस्ती करणे उचित राहील, असा अभिप्राय दिला आहे.

३) तसेच नियम क्र.०३ ते २३ मधील तरतूद जशीच्या - तशा लागू राहतील.

विभागाचे अभिप्रायः मा.शासनाचे नियमानुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गामधील शासकीय कर्मचा-यांच्या पाल्यांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय आहे. त्यानुसारच संस्थान कर्मचा-यांसाठी तरतुद असावी व वेळोवेळी शासन आदेशानुसार त्यात बदल करावेत, असे मत आहे.

प्रस्तावः शासन निर्णयानुसार अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतची सर्व समावेशक नियमावली व मा. समिती सदस्य, श्री भाऊसाहेब वाकचौरे यांचे अभिप्राय अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील, नियम १ ते २३ अनुसार संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गामधील संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान सेवेतील गट 'अ' व 'ब' या संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत मार्गदर्शन घेणेकामी शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३** **दि. २१-२२/०२/२००४ रोजी प्रसिध्द झालेल्या अंतिम सेवाजेष्ठता यादीवरील अपील.**

**प्रस्ताव-** अ) उपरोक्त विषयांस अनुसरुन श्री. सतिष कासार व इतर ९ कर्मचारी यांनी दि.१९/०८/२०१०, दि.२१/०३/२०१०, दि.२०/०६/२०१३, दि.०३/०४/२०१४, दि.०८/०१०/२०१४, दि.२१/०३/२०१६, दि.०६/०६/२०१६, दि.२४/०४/२०१७ व दि.०१/०६/२०१८ चे पत्रान्वये वेळोवेळी सेवाजेष्ठता यादीतील नोंदीबाबत सामुहिकरित्या तसेच वैयक्तिकरित्या अर्ज केलेले असून आमचे अर्जाचा विचार होऊन आमच्यावर झालेला अन्याय दुर करावा, अशी विनंती केलेली होती.

तसेच आता, पुनःश्च दि.२२ जून, २०१८ रोजी मा. अध्यक्ष साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे अर्जदाखल केलेला आहे. सदरचे अर्जात त्यांनी नमूद केलेली स्थिती खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | सेवा जेष्ठता यादीबाबतची तक्रार | तक्रारीबाबतची वस्तुस्थिती |
|---|---|---|
| ०१ | मा. श्री.द.म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीच्या दि. १९-२०/०६/१९९९ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.२४० अन्वये, संस्थानमधील लिपीक टंकलेखक संवर्गातील ज्या कर्मचा-यांची सलग १२ वर्ष पूर्ण सेवा झालेली आहे, अशा कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने नियमित नियुक्ती देण्यात यावी (अशी नियुक्ती दिल्यानंतर वरिष्ठ लिपीक या संवर्गातील त्यांची परस्पर | मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९-२०/०६/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२४०"ब" नुसार जे कर्मचारी लिपीक-टंकलेखक (असुधारित वेतनश्रेणी रु.९५०-१५००) त्या पदावर सलग १२ वर्ष समाधानकारकपणे सेवा पूर्ण झाल्यानंतर कुंठीतता निवारण योजनेअंतर्गत ज्यांना लगतची वरची वेतनश्रेणी (असुधारित रु. १२००-२०४०) देण्यात आलेली आहे. त्यांना त्याच वेतनश्रेणीतील (रु.१२००-२०४०असुधारित) वरिष्ठ लिपीक/ कनिष्ठ पर्यवेक्षक या |

| | | |
|---|---|---|
| | सेवाजेष्ठता लिपीक टंकलेखक या संवर्गातील त्यांच्या पूर्वीच्या संवर्गातील परस्पर सेवाजेष्ठतेनुसारच कायम राखण्यात यावी) असे ठरले होते. | पदावर पदोन्नतीने नियमित नियुक्ती देण्यात यावी. (अशी नियुक्ती दिल्यानंतर "वरिष्ठ लिपीक" या संवर्गातील त्यांची परस्पर सेवाजेष्ठता "लिपीक टंकलेखक" या संवर्गातील त्यांच्या पूर्वीच्या परस्पर सेवाजेष्ठतेनुसारच कायम राखणेत यावी.) ही नियुक्ती ०१ ऑगष्ट, १९९९ पासून अंमलात आणणेत यावी, असा निर्णय झालेला आहे. |
| ०२ | सदरच्या निर्णयास अनुसरुन कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत लाभ मिळालेल्या कर्मचा-यांना श्री साईबाबा संस्थानच्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधानुसार दि.०१/०८/१९९९ पासून एकाचवेळी ५० कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक या रिक्त पदावर पदोन्नती देण्यात आलेली होती. त्यावेळी वरिष्ठ लिपीक या पदावर कनिष्ठ संवर्गाच्या जेष्ठता सूचीतील (लिपीक टंकलेखक) पदावरील कर्मचा-यांची सेवाजेष्ठतेनुसार पदस्थापना करण्यात आलेली होती. | मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-११/०७/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२९२ संस्थान आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक / कनिष्ठ पर्यवेक्षक या संवर्गातील एकूण ५० पदे लिपीक-टंकलेखक (असुधारित वेतनश्रेणी रु. ९५० ते १५०० म्हणजेच सुधारित वेतनश्रेणी रु. ३०५०/- ते रु. ४५९०/-) या संवर्गात सेवेत असलेल्या कर्मचा-यांना सेवाजेष्ठता व समाधानकारक काम या निकषानुसार पदोन्नती देऊन भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. याच निर्णयात वरिष्ठ लिपीकया पदावर पदोन्नती दिलेल्या सर्व कर्मचा-यांची नांवे सेवा जेष्ठतेनुसार स्पष्टपणे नमूद केलेली आहेत. |
| ०३ | पदस्थापना केलेपासून ते सन २०१० पर्यंत वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सेवाजेष्ठता यादीतील सर्वच वरिष्ठ लिपीक कर्मचा-यांचा क्रम योग्य होता. म्हणजेच सन १९९९ ते २००९ पर्यंत सेवाजेष्ठतेबाबत कुठलाही बदल झालेला नाही. मात्र सन २०१० मध्ये प्रसिध्द झालेल्या सेवाजेष्ठता यादीत अचानकपणे बरेच बदल करण्यात आलेले आहे.<br>महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियम) नियमावली १९८२ मधील नियम ४ (ब) नुसार पदोन्नत कर्मचा-यांच्या बाबतीत निवड समितीने निवड सुचीतील त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील जेष्ठता निश्चित करावयाची असते. परंतू संस्थान प्रशासनाने सन २०१० ची जेष्ठता यादी तयार करतांना सदर नियमानुसार कार्यवाही न करता मंत्रालयातील लिपीक, लिपीक-टंकलेखक यांच्यासाठी लागू असलेले दि.१७ मे, २००६ व दि.३० एप्रिल, २०१३ चे परिपत्रकास अनुसरुन जेष्ठता यादीतील क्रम बदललेला आहे.<br>तथापि, वेळोवेळी आमची हरकत शासन निर्णयास अनुसरुन निकाली न काढता शासनाने मंत्रालयातील फक्त लिपीक टंकलेखक या संवर्गासाठी दि.१७ मे,२००६ व दि.३० एप्रिल,२०१३ च्या परिपत्रकात नमूद असलेल्या मजकुरानुसार निकाली काढणेत आल्याचे आदेश निर्गमीत केले आहेत. सदरची दोन्ही परिपत्रके ही फक्त मंत्रालयातील विशिष्ट कामसाठी म्हणजेच सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी अर्हताप्राप्त करणा-यांना मंत्रालयीन विभागातील लिपीक, लिपीक टंकलेखक व टंकलेखकांची सामाईक जेष्ठतासूची (फक्त या संवर्गापुरते मार्यदित) दि.०१/०१/१९९५ व दि.०१/०१/२०१३ साठी काढलेली आहेत. | सन २०१० चे सेवाजेष्ठता यादीबाबत पारीत करण्यात आलेल्या जा.क्र.एसएसएस/वशी-१/४३३९/ २०१० दि. १४/०८/२०१० चे परिपत्रकातील "ड"-२ मध्ये असे नमूद केले आहे की,पदोन्नत कर्मचा-यांची जेष्ठता त्यांच्या नियमीत पदोन्नतीच्या दिनांकानुसार निश्चित केली आहे. मात्र जर असा दिनांक एकच असेल तर वयाने जेष्ठ असलेला कर्मचारी जेष्ठ दर्शविण्यात आलेला आहे.<br>तसेच सेवाजेष्ठता यादीबाबत आस्थापना विभागाने दिनांक २५/०६/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीनुसार सन २०१० चे वरिष्ठ लिपीकाचे सेवा जेष्ठता यादीबाबत ज्या कर्मचा-यांनी हरकती घेतलेल्या होत्या त्यांच्या हरकती शासन परिपत्रक क्र. साजेलि-१००४/प्र.क्र.६९/ २००४/१४ अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, दि. १७ मे, २००६ व शासन क्र.साजेलि-१०१३/प्र.क्र.४८/२०१३/१४-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, दिनांक ३० एप्रिल, २०१३ रोजीचे सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणा-या मंत्रालयीन विभागातील लिपीक, लिपीक-टंकलेखक व टंकलेखकांची सामाईक तात्पुरती जेष्ठतासूचीबाबतचे परिपत्रकाचा आधार घेऊन पदोन्नत कर्मचा-यांची जेष्ठता नियमित पदोन्नतीच्या दिनांकानुसार निश्चित केली आहे. मात्र जर असा दिनांक एकच असेल तर वयाने जेष्ठ असलेला कर्मचारी जेष्ठ दर्शविण्यात आला आहे. असे नमूद करुन सेवा जेष्ठता यादी अंतिम करण्यात आली होती. व संबंधितांच्या हरकती निकाली काढणेत आलेल्या आहेत.<br>मात्र उपरोक्त परिपत्रके संस्थान कर्मचा-यांना लागू करणे उचित होणार नाही. |
| ०४ | सन १९९९ व २००४ मध्ये व्यवस्थापन समितीच्या अनुक्रमे निर्णय क्र. २४०, २९२ व ८९ अन्वये सेवाजेष्ठतेबद्दल निर्णय झालेला आहे. त्या निर्णयानुसारसन २००९ पर्यंतची सेवा जेष्ठतेबाबतची कार्यवाही योग्य होती. परंतू सन २०१० मध्ये सेवा जेष्ठता यादीत जो बदल केला तो बदल नियमानुसार नसून व्यवस्थापन समितीच्या वरील निर्णयाच्याविरुध्द आहे.<br>तरी, वरील नमूद वस्तुस्थिती विचारात घेता, मा. व्यवस्थापन समितीच्या सन १९९९ व २००४ मधील अनुक्रमे निर्णय क्र. २४०/२९२ व ८९ प्रमाणे तसेच महाराष्ट्र नागरी | शासनपरिपत्रक क्र. साजेलि- १००४/प्र.क्र.६९/२००४/१४ अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, दि. १७ मे, २००६ व शासन क्रमांक साजेलि-१०१३/प्र.क्र.४८/२०१३/ १४-अ, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, दिनांक ३० एप्रिल, २०१३ हे दोन्ही शासन परिपत्रके सहाय्यक पदावरील पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणा-या मंत्रालयीन विभागातील लिपीक, लिपीक-टंकलेखक व टंकलेखकांची सामाईक तात्पुरती जेष्ठतासूची असून ती सर्वांसाठीची नियमावली नाही. सदर परिपत्रकातील तरतुदींचा विचार न करता मा.व्यवस्थापन |

| | | |
|---|---|---|
| | सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील नियम ४ (ब) नुसार सेवाजेष्ठता यादीतील नोंदीचे पुर्नविलोकन होऊन सेवाजेष्ठता यादीतील नोंदीची दुरुस्ती व्हावी व सेवाजेष्ठता यादीमध्ये आमच्या क्रमवारीत झालेला अन्याय दूर करावा, अशी विनंती केलेली आहे. | समितीचे दि.१९-२०/०६/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२४०,मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०-११/०७/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२९२ व मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१-२२/०२/२००४चे सभेतील निर्णय क्र. ८९ चे निर्णयात नमुद केलेनुसार तसेच सन २००० ते २००९ या कालावधीत प्रसिध्द केलेल्या सेवा जेष्ठता यादीनुसारच सदरची वरिष्ठ लिपीकांची सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे अभिप्रेत होते. |

**ब)** (१) जा.नं.एसएसएस/सा.प्रशा/आस्था/४४६०/२०१४ दि. २७/१२/२०१४ रोजीचे आदेशान्वये शासनाने मान्यता दिलेले विनियम संस्थानला दिनांक ०१ जानेवारी, २०१५ पासून लागू करण्यात आलेले आहे. सदर विनयमातील(सर्वसाधारण सेवा अटी) २०१३ चे नियम २३ (जेष्ठता) मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

१) संस्थानच्या प्रत्येक स्थायी कर्मचा-याला सेवा प्रवेशानंतर श्रेणी दिली जाईल.

२) सेवा जेष्ठता निवड गुणवत्ता यादीनुसार आणि विशिष्ट पदावरीत नियुक्ती दिनांकानुसार निश्चीत केली जाईल. तर नियुक्ती दिनांक सारखेच असतील तर वयानुसार जेष्ठतेची गणना करणे आवश्यक आहे.

३) जर एकच वेतन श्रेणीतील दोन किंवा जास्त भिन्न पदावरील संस्थानचे कर्मचारी एक किंवा त्यापेक्षा जास्त एकाच वेतन श्रेणीतील उच्च पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असतील तर नियुक्ती दिनांकनुसार संस्थानच्या अशा कर्मचा-यांची संयुक्त जेष्ठता यादी तयार करण्यात येईल आणि उच्चपदावर किंवा पदांवर या विनियमात नमुद करण्यात आलेल्या सेवाजेष्ठता आणि पदोन्नती यासंबंधिच्या इतर तरतुदीच्या अधीन राहून पदोन्नती देण्याच्या उद्देशाने जेष्ठता निश्चीत करण्यासाठी अशी संयुक्त जेष्ठता यादी लक्षात घेतली जाईल.

४) आवश्यकता असल्यास समितीच्या मंजुरीच्या अधीन राहुन कार्यकारी अधिकारी सेवाजेष्ठता निश्चीत करण्यासाठी इतर काणतेही निकष विहित करु शकतात.

(२) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ मधील नियम ४ (ब) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

"निवड सुचीतून पदोन्नती मिळालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत अशा निवडसुचीत त्यांची नावे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची अपसातील जेष्ठता राहील, जर निवडसुची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनर्शत निवड झालेल्यांची नावे अंतर्भूत असतील व दुस-या भागात निवड झालेल्यांची नांवे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुस-या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल.

परंतू निवड सुचीतील नावे ज्या क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित शासकीय कर्मचा-यांचा जेष्ठताक्रम त्यांच्या या सुधारीत क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येऊन निर्धारित केला जाईल."

(३) शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई, यांचे दि.२१/१०/२०११ रोजीचे शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द झालेनंतर यात समाविष्ठ असलेल्या अधिकारी / कर्मचा-यांकडून नव्याने आक्षेप प्राप्त झाल्यास असे अक्षेप विचारात घेण्यात येऊ नये. असे नमूद आहे. तसेच सदरील तक्रारदार यांनी मा. अध्यक्ष साहेब यांचेकडे दिनांक २२/०६/२०१८ रोजीचे अर्जान्वये सन २०१६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या सेवा जेष्ठता यादीबाबत तक्रार केलेली आहे. कर्मचा-यांना त्यांचेवर झालेल्या अन्यायाबाबत नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन मा. व्यवस्थापन समितीकडे विनंती अर्ज–वजा–अपिल करण्याची मुभा आहे.

तथापी, संबंधित तक्रारदारांनी सन २०१०पासून म्हणजेच ज्यावेळेस सेवाजेष्ठता यादीत प्रथम बदल केला गेला,त्यावेळेपासून हरकत / विनंती अर्ज दिलेले आहेत. व सदरचे तक्रार अर्ज वेळोवेळी निकाली काढण्यात आलेले आहेत. तसेच आता, त्यांनी मा. अध्यक्ष साहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे पुन्हाः विनंती अर्ज केलेला आहे. हे विचारात घेऊन सदरचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**(क)** उपरोक्त परिच्छेद "**अ**" व "**ब**" मधील वस्तुस्थितीदर्शक परिस्थती विचारात घेऊन सोबत सन २०१६ ची प्रसिध्द करण्यत आलेली वरिष्ठ लिपीक संवर्गाची सध्याची सेवा जेष्ठता यादी परिशिष्ट "**अ**" म्हणून सादर करण्यात आलेली आहे. तसेच सन १९९९ चे स्थितीप्रमाणे तयार करणेत आलेली सेवा जेष्ठता यादी परिशिष्ट "**ब**" म्हणून अवलोकनार्थ सादर केलेली आहे. या दोन्ही याद्यांमध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची नांवे समाविष्ट नाहीत.

**प्रस्तावः** अर्जदार श्री.कासार व इतर ०९ यांनी सेवा जेष्ठता यादीबाबत वेळोवेळी घेतलेल्या हरकती / विनंती अर्ज यामधील बाबी विचारात घेऊन तात्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९-२०/०६/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२४०,मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०-११/०७/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२९२ व मा. व्यवस्थापन

समितीचे दि. २१-२२/०२/२००४ चे सभेतील निर्णय क्र.८९ नुसार वरिष्ठ लिपीकांची सेवा जेष्ठता यादी (परिशिष्ट "ब" प्रमाणे) पुन्हाः नव्याने तयार करुन प्रकाशित करावयाची किंवा सन २०१६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली सेवाजेष्ठता यादी परिशिष्ट "अ" प्रमाणे कायम ठेवावयाची याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९-२०/०६/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२४०,मा. व्यवस्थापन समितीचे दि.१०-११/०७/१९९९ चे सभेतील निर्णय क्र.२९२ व मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१-२२/०२/२००४ चे सभेतील निर्णय क्र.८९ नुसार वरिष्ठ लिपीकांची सेवा जेष्ठता यादी (परिशिष्ट "ब" प्रमाणे) व सन २०१६ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली सेवाजेष्ठता यादी परिशिष्ट "अ" यामध्ये जेष्ठता यादीमध्ये बरीच तफावत असल्याचे दिसुन येते. सन २०१० मधील यादी ही मंत्रालयीन कर्मचा-यांसाठी लागु असलेल्या परिपत्रकाचे आधारे तयार करण्यात आली आहे, वस्तुता सदर यादी शासनाच्या महाराष्ट्र नागरी सेवा/ जेष्ठतेचे विनियम नियमावली १९८२ व संस्थानच्या विनियमातील सर्व साधारण सेवा अटी-२०१६ चे नियम २३ नुसार करणे आवश्यक आहे, त्यामुळे वरिष्ठ लिपीक संवर्गाची सन २०१० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली सेवाजेष्ठता यादी रद्द करण्यात यावी व शासनाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियम नियमावली) १९८२ मधील तरतुदीनुसार तयार करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४** **संस्थानचे साईनिवास अतिथीगृह इमारतीस लिफ्ट बसविणेकरीता आर.सी.सी. व विट बांधकामामध्ये शाफ्ट तयार करणे तसेच लिफ्ट कॅबीन, मशिन इ.मेकॅनिकल कामे करणेसाठी येणाऱ्या एकुण रुपये १६.६० लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद**-अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये " भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** संस्थानचे जुने प्रसादालय परीसरात साईनिवास अतिथीगृह या इमारतीचे बांधकाम सन २००० साली पूर्ण करणेत आलेले आहे. सदर इमारतीचे तळमजल्यावर भांडारगृह असून पहिल्या व दुस-या मजल्यावर एकूण २४ वातानुकूलीत व्हीआयपी सुटस् आहेत. या सुटसमध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्त तसेच इतर मान्यवर, व्ही.आय.पी. यांची निवासाची व्यवस्था केली जाते. सदरहू इमारतीस लिफ्टची व्यवस्था करणे आवश्यक असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेविषयी इकडील विभागास सूचना करणेत आलेली आहे.

साईनिवास अतिथीगृह इमारतीचे बांधकाम आर्किटेक्ट निकम पा., श्रीरामपुर यांचे देखरेखी खाली करणेत आलेले असून त्यांचेमार्फत स्ट्रक्चरल डिझाईनचे काम श्री.एम.डी.बालटे, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांनी केलेले आहे. त्यामुळे सदर नियोजीत लिफ्टचे कामासाठी स्ट्रक्चरल डिझाईन करुन देणेबाबत त्यांना विनंती करणेत आली. त्यास अनुसरुन श्री.एम.डी.बाल्टे यांनी दि.२६/०७/२०१८ रोजी साईटवर पहाणी करुन मोजमापे घेतली.सदर इमारतीमधिल उत्तर बाजुचे जिन्यामधिल मोकळया जागेत (staircase well) ३.२० मि. X १.८० मि. साईजचे लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करता येईल, असे श्री.एम.डी.बालटे यांनी दि.१६/०८/२०१८ रोजीचे ईमेलव्दारे कळविले आहे. यासाठी करावयाची कामे व अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| ०१ | लिफ्टसाठी आरसीसी व वीट बांधकामामध्ये शाफ्ट बांधकाम करणे. ३.२०mx १.८०m या साईजचा २.५ मी. खोलीपर्यंत खोदकाम करणे, सोलिंग पी.सी.सी. करुन आर.सी.सी. राफ्ट, कॉलम व बिमकरीता M20 कॉंक्रीट करणे, विट बांधकाम प्लास्टर व रंगकाम करणे तसेच लिफ्टचे ओपनिंगकरीता व समोरील भागात ग्रेनाईट बसविणे इ. सिव्हील कामे, स्ट्रक्चरल डिझाईन कन्सल्टंसी चार्जेस, इत्यादीसह | रु. ४.१० लक्ष |
| ०२ | लिफ्ट, केबीन, मशीन इ. मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल कामांचे इन्स्टॉलेशनव कमिशनींग करणे. | रु.१२.५० लक्ष |
| | **एकूण रक्कम रु. -** | **रु. १६.६० लक्ष** |

**विभागाचा अभिप्राय–** साईनिवास अतिथीगृह येथे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा. विश्वस्त, व्ही. व्ही.आय.पी. तसेच इतर मान्यवर यांची निवासव्यवस्था करणेत येते. तसेच सदर इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सभागृहात मा.व्यवस्थापन समिती, मा.उपसमिती, मा.खरेदी समिती यांच्या सभा आयोजीत करणेत येत असलेने सदरहू इमारतीस लिफ्ट बसविणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव**– संस्थानचे साईनिवास अतिथीगृह इमारतीस लिफ्ट बसविणेकरीता वर नमूद केलेप्रमाणे सिव्हिल मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल कामे करणेसाठी येणारे एकुण रु. १६.६० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणे. तसेच त्यापैकी रु. ४.१० लक्ष इतक्या अंदाजे खर्चाचे सिव्हील कामासाठी बांधकाम विभागामार्फत शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांची बांधकाम परवानगी प्राप्त करुन विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे. त्यासाठी आवश्यक स्ट्रक्चरल डिझाईन सल्लासेवा श्री.एम.डी.बाल्टे, साई कन्सल्टंट, अहमदनगर यांचेकडून घेणेस मान्यता देणे. मेकॅनिकल स्वरुपाच्या रु. १२.५० लक्ष इतक्या अंदाजे खर्चाचे कामासाठी मेकॅनिकल विभागामार्फत विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यतेकरीता सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती .

निर्णय क्र.५३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईनिवास अतिथीगृह इमारतीस लिफ्ट बसविणेकरीता सिव्हिल, मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल कामे संबधीत विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबवुन करणेस व त्याकामी येणाऱ्या एकुण रु.१६.६० लक्ष मात्रचे अंदाजे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच त्यासाठी आवश्यक स्ट्रक्चरल डिझाईन सल्ला सेवा श्री एम.डी. बाल्टे, साई कन्सलटंट, अहमदनगर यांचेकडून करुन घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग/ उप कार्यकारी अभियंता,विद्युत विभाग/ मॅकेनिकल विभागप्रमुख)**

---

विषय नं.५ **सर्व्हे नं. १४८ मधील श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील जागेतील प्रस्तावीत नविन इमारत बांधकाम रद्द करुन याकामाचे आर्किटेक्ट डिझाईन असोशिएट्स, नोयडा यांची नेमणूक रद्द करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद: अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणे बाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचेसभेतीलनिर्णय :

१. दिनांक १९/०९/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५६९.
२. दिनांक ३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८९०.
३. दिनांक २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५२४ (अ)
४. दिनांक २३/१०/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९०३.
५. दिनांक १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००५ (४)
६. दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१५.

प्रस्तावना: श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयांमध्ये रुग्णांकरीता आवश्यक सुविधा व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी सर्व्हे नं. १४८ पैकी मधील श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील जागेत नविन इमारतीचे बांधकाम करणेसाठी नामांकित आर्किटेक्टची नेमणूक करणेकरीता विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९/०९/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्र.५६९ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार सदरहू कामासाठी विहीत पध्दतीने आर्किटेक्ट यांचेकडून ई-प्रस्ताव मागविणेत येऊन, मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१००५ (४) अन्वये निम्नतम दराचे आर्किटेक्ट डिझाईन असोशिएटस,नोयडा यांची प्रकल्प किमतीवर १.३% फी अधिक जीएसटी नेमणूक करणेस मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार त्यांना दि.०५/१२/२०१७ अन्वये नेमणूक पत्र देणेत आले आहे. सल्लागार यांनी दि.११/०१/२०१८ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उपस्थितीत संबंधित विभागाचे प्रतिनिधींचे बैठकीतील चर्चेनुसार पाठविलेले या कामाचे सविस्तर आराखडे दि.०३/०३/२०१८ रोजी प्राप्त झालेनंतर रुग्णालय बांधकामाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेत चर्चा झाली व त्या अनुषंगाने निर्णय

क्र. २१५ खालीलप्रमाणे झाला आहे.

“..मौजे रुई, ता. राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानीचॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून दानपत्राद्वारे प्राप्त गट नं.२९३ मधील ७ हेक्टर ३२ आर या जागेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी एकत्रित ‘वैद्यकीय संकूल’ उभारण्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करण्याबाबतची प्रक्रिया सुरु करण्यात यावी.”

उपरोक्त निर्णय विचारात घेता,श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी एकत्रित ‘वैद्यकीय संकूल’ उभारणे प्रस्तावीत असल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेतनविन इमारतबांधकाम करणे तसेच या कामाचे आर्कीटेक्ट डिझाईन असोशिएटस,नोयडायांचेनेमणूकीबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे

सभेपुढे निर्णयार्थसादर करणेकामी प्रस्ताव दि.३०/०५/२०१८ रोजी सादर करणेत आला होता. त्यावरील निर्देशानुसार फेरप्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

१. सदर कामाचे Request For Proposalमधील पृष्ठ क्र.३ Disclaimerमध्ये काम रद्द करणेबाबत खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे.

"..*Shri Saibaba Sansthan Trust reserves the right not to proceed with the Project or to change the configuration of the Project, to alter the timetable reflected in this document or to change the process or procedure to be applied. It also reserves the right to decline to discuss the matter further with any intending party.*"

२. या कामाचे ई-प्रस्तावानुसार फी अदा करणेच्या स्टेजेस खालीप्रमाणे आहेत.

| STAGE | DESCRIPTION | PERCENTAGE OF FEES PAYABLE | Effecting Payment |
|---|---|---|---|
| 1. | On signing of the contract awarding the Architectural work and on completion of initial work up to and including submitting NIT, Specification, BOQ and tender drawing etc. for inviting e-tenders from eligible contractors. | 10% of the total fees | On Approved Estimated Cost |
| 2. | On award of the works to the contractor finally selected of its execution. | 20% of the total fees | On Approved Estimated Cost |
| 3. | During construction-Prorate basis on certified works of the contractor. | 50% of the total fees | On Value of Workdone by the Contractor |
| 4. | On completion of the works, after submission of final certificate of completion and certification of contractors final bill. | 20% of the total fees | On Value of Work done by the Contractor |

विभागाचा अभिप्राय:- आर्किटेक्ट डिझाईन असोशिएटस,नोयडा यांना या कामासाठी नेमणूकपत्र देणेत आले आहे. मात्र श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी एकत्रित 'वैद्यकीय संकूल' उभारणे प्रस्तावीत असल्याने त्यांचेसमवेत अद्याप करारनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे आर्कीटेक्ट यांचे नेमणूकीबाबत व फीबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. आर्किटेक्ट डिझाईन असोशिएटस,नोयडा यांनी या कामाचे आराखडे सादर केले असले तरी फी अदा करणेचेस्टेज क्र.१ मध्ये नमूद केलेले कामकाजपूर्ण होणेपुर्वीच सदरचे काम स्थगित असल्याने त्यांना कोणतेही Payment अनुज्ञेय होत नाही असे मत आहे.

प्रस्ताव:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी एकत्रित 'वैद्यकीय संकूल' उभारणे प्रस्तावीत असल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेतील प्रस्तावीत नविन इमारत बांधकाम रद्द करणे तसेच या कामाचे आर्कीटेक्ट डिझाईन असोशिएटस,नोयडा यांची नेमणूक रद्द करणे व फीबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पीटलसाठी एकत्रित 'वैद्यकीय संकूल' उभारणे प्रस्तावीत असल्याने श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील सर्व्हे नं.१४८ मधील जागेतील प्रस्तावीत नविन इमारत बांधकाम रद्द करणेत यावे, तसेच या कामाचे आर्कीटेक्ट डिझाईन असोशिएटस, नोयडा यांची नेमणूक रद्द करणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.६ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या संस्थानचे स्वागतकक्ष येथील क्लोकरुमसाठी मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमातील तरतूद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/११/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५७३ प्रमाणे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना स्वागतकक्ष येथील क्लोकरुम दि.२२/०१/२०१६ ते दि.२१/०१/२०१७ या एक वर्षाचे कालावधीसाठी पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरुन व मासिक फी मध्ये १०%

वाढ करुन आणि विद्युत आकार मीटर रिडींगप्रमाणे वेगळा आकारुन चालविणेकामी मुदतवाढ देण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

सदरची मुदत दि.२१/०१/२०१७ रोजी संपुष्टात आल्याने पुढील मुदतवाढ मिळणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांनी त्यांचेकडील दि.२६/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये इकडेस विनंती केलेली आहे.तदनुषंगाने पुढील मुदतवाढ देणेकामी दि.२८/०३/२०१७ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आलेली आहे. दरम्यानचे काळात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३५५ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"पादत्राणेगृह,बॅग क्लोकरुम, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालवणेत देणेत याव्यात. पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्यात व मोबाईल कॅमेरा यासाठी प्रति नगर रु.५/- मात्र आकार आकारण्यात यावा. तसेच याबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांचेकडून लेखी स्वरुपात करारनामा करुन घेण्यात यावा," असेबाबतचा निर्णय झालेला आहे.

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने, आता सदरची पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुमची सेवा साईभक्तास विनामुल्य दिली जात आहे. संस्थान मालकीची जागा वापरास ११-११ महिन्याची मुदतवाढ दिल्यास व सदरचा कालावधी सलग धरल्यास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होत असलेने व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अथवा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद असलेने यापूर्वी जागा वापराची मुदतवाढीचे काही प्रकरणात शासनाकडे अहवाल सादर करुन मुदतवाढ देणकामीचे प्रस्ताव सादर करणेत आलेले आहेत.

त्यापैकीचे गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविण्याच्या व्यवसायास दि.०७/११/२०१६ ते दि.०६/१०/२०१७ या ११ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देवून करारनामा करण्यास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आलेला होता. त्यास अनुसरुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि/ १०१७/ २०३६/प्र.क्र.२२२/का.१६ दि.०१/०३/२०१८ अन्वये "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ चे पोटकलम (३) नुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची जागा ११ महिन्यांसाठी भाडेतत्वावर देण्याकरीता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. यास्तव प्रकरणी दि.२०/१२/२०१२ पासून ११ महिन्यांचे करारनामे करुन मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने कार्योत्तर मान्यता देता येईल.तसेच भविष्यात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करारनामा करुन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी," असेबाबत इकडेस कळविण्यात आलेले आहे. तदनुषंगाने सदर प्रकरणी कार्यवाही अलाहीदा करण्यात आलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम प्रमाणेच सदरचे स्वागतकक्षाचे जागा वापराचे मुदतवाढीचे प्रकरण आहे. यास्तव प्रस्तुत प्रकरणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि. शिर्डी यांना संस्थानचे स्वागतकक्ष येथील क्लोकरुमसाठीची मासिक परवाना फी रु.१,०३७/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,०३७/-+१०% रु.१०४/-= रु.१,१४१/-) रु.१,१४१/- (अक्षरी रु.एक हजार एकशे एक्केचाळीस मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२२/०१/२०१७ ते दि.२१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी तसेच दि.२२/१२/२०१७ ते दि.२१/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी देखील मागील मासिक परवाना फी रु,१,१४१/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,१४१/-+१०% रु.११४/-= रु.१,२५५/-) रु.१,२५५/- (अक्षरी रु.एक हजार दोनशे पंचावन्न मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन आणि क्लोकरुमची सेवा साईभक्तांना विनामुल्य देणेच्या व इतर पूर्वीच्याच अटी व शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामे करुन घेता येईल.

प्रस्ताव– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे स्वागतकक्ष येथील क्लोकरुम साठीची जागा वापरास मासिक परवाना फी रु .१,०३७/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,०३७/- +१०% रु.१०४/-= रु.१,१४१/-) रु.१,१४१/- (अक्षरी रु.एक हजार एकशे एक्केचाळीस मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२२/०१/२०१७ ते दि.२१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी तसेच दि.२२/१२/२०१७ ते दि.२१/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी देखील मागील मासिक परवाना फी रु,१,१४१/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,१४१/-+१०% रु.११४/-= रु.१,२५५/-) रु.१,२५५/- (अक्षरी

रु.एक हजार दोनशे पंचावन्न मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन आणि क्लोकरुमची सेवा साईभक्तांना विनामुल्य देणेच्या व इतर पूर्वीच्याच अटी व शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामे करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे स्वागतकक्ष येथील क्लोकरुम साठीची जागा दि.२२/०१/२०१७ ते दि.२१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरास मासिक परवाना फी रु .१,०३७/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,०३७/-+१०% रु.१०४/- = रु.१,१४१/-) रु.१,१४१/- (अक्षरी रु.एक हजार एकशे एक्केचाळीस मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन तसेच दि.२२/१२/२०१७ ते दि.२१/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी देखील मागील मासिक परवाना फी रु,१,१४१/- मध्ये १०% वाढ करुन (रु.१,१४१/-+१०% रु.११४/-= रु.१,२५५/-) रु.१,२५५/- (अक्षरी रु.एक हजार दोनशे पंचावन्न मात्र) व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन आणि क्लोकरुमची सेवा साईभक्तांना विनामुल्य देणेच्या व इतर पूर्वीच्याच अटी व शर्तीस अनुसरुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.७** **संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांचे मार्फत चालवत असलेल्या क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसायास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०५/२००९ चे सभेतील निर्णय क्रं.४४१ अन्वये साईनाथ छाया इमारतीत क्लोकरुम व मोबाईल ठेवणेकामी एकत्रित ५ वर्षांकरीता तत्वत मान्यता देवून प्रति ११ महिने कालावधीसाठी (१०% प्रति वर्षी वाढ करुन) करार करणेत यावा,असे ठरले होते.

त्यास अनुसरुन श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटीस संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील एकूण ५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वावर ५ व्या वर्षाकरीता म्हणजेच दि.१७/०७/२०१३ ते दि.१६/०६/२०१४ अखेर ११ महिन्यांचे कालावधीसाठी मासिक परवाना फी रु.८,८५८/- मात्र व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन मुदतवाढ देण्यात आली होती.

सदरचे व्यवसायाची मुदत दि.१६/०६/२०१४ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील मुदतवाढ मिळणेकामी उक्त सोसायटीने दि.०८/०५/२०१४ रोजी इकडेस विनंती केलेली आहे. त्यास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेत सदरचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यावर निर्णय क्रं.६४३ प्रमाणे “प्रस्तावित कामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येवून मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात यावी व खंडपीठाचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी,” असे ठरले.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील अॅप्लिकेशन क्रं.१०४२६/२०१४ चे दि.०६/१०/२०१४ रोजी दाखल करणेत आले. त्यानंतर मा.व्यवस्थापन समिती गठीत झालेने, मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५६६ अन्वये मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले सिव्हील अर्ज मागे घेणेबाबत (Withdraw) निर्णय झालेला आहे. त्यानुसार दि.०८/०९/२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयातून उपरोक्त सिव्हील अर्ज मागे घेणेत आलेला आहे. त्यात मे.उच्च न्यायालयाने दि.०८/०९/२०१६ रोजीचे निर्णयाने मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे काळात संस्थान मालकीचे साईनाथछाया इमारतीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. यांचेमार्फत साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी बॅग क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा या सुविधाबाबतचा व्यवसाय सुरु ठेवणेत आलेला आहे.

सदर व्यवसायाची मुदत यापूर्वी दि.१६/०६/२०१४ रोजी संपुष्टात आलेली असलेने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/ ११३/२०१८ दि.०९/०८/२०१८ अन्वये दि.१७/०६/२०१४ ते दि.१६/०५/२०१५,दि.१७/०५/२०१५ ते दि.१६/०४/२०१६, दि.१७/०४/२०१६ ते दि.१६/०३/२०१७, दि.१७/०३/२०१७ ते दि.१६/०२/२०१८ व दि.१७/०२/२०१८ ते दि.१६/०१/२०१९ या ११-११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली असून त्यात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३५६ प्रमाणे संस्था साईभक्तांना पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम या सुविधा विनामुल्य पुरवित आहे,असेबाबत नमूद करुन संस्था

संस्थानचे नियमाप्रमाणे जागा भाडे भरण्यास व करारनामा करुन देण्यास तयार आहे. तरी संस्थेमार्फत साईनाथछाया इमारतीत चालवत असलेले बॅग क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायास वरीलप्रमाणे मुदतवाढ मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

यापूर्वी उक्त संस्थेस विविध ठिकाणी विविध व्यवसायासाठी संस्थान मालकीच्या मिळकती ११-११ महिन्यांचे लिव्ह अँण्ड लायसन्स कराराने वापरास दिलेल्या आहेत. सदरचा ११-११ महिन्याचा कालावधी सलग धरल्यास १ वर्षापेक्षा जास्त कालावधी होत असल्याने, गुरुस्थान मंदिराच्या दक्षिणेकडील संस्थान मालकीचे सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ मध्ये मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/४५२९/ २०१७ दि.१७/११/२०१७ अन्वये शासनाचे विधी व न्याय विभागाकडे सादर करणेत आलेला होता.

सदर प्रस्तावास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.सासंवि/१०१७/२०३६/प्र.क्र.२२२/का.१६ दि.०१/०३/२०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम १७ चे पोटकलम (३) नुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची जागा ११ महिन्यांसाठी भाडे तत्वावर देण्याकरीता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. यास्तव प्रस्तुत प्रकरणी दि.२०/१२/२०१२ पासून ११ महिन्यांचे करारनामे करुन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने कार्योत्तर मान्यता देता येईल. तसेच

भविष्यात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करारनामा करुन व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील एकूण ५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी लिव्ह अँण्ड लायसन्स तत्वावर खालील नमूद केलेल्या दि.१७/०६/२०१४ पासून पुढील ११-११ महिन्याचे कालावधीसाठी त्यासमोर दर्शविलेल्या मासिक भाडेदराप्रमाणे व विद्युत बील वेगळे आकारुन मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे उपरोक्त कालावधीसाठीचे करारनामे करुन घेता येतील आणि उक्त संस्थेकडे असलेली बाकी वसुल करता येईल.

| करारनामा तारीख | मासिक भाडे | वसुल करावयाचे एकूण भाडे | वसुल झालेले एकूण भाडे | भाडे वसुल करावयाची बाकी | करारानुसार पुढील वर्षासाठी १०% दरमहा होणारी भाडेवाढ रक्कम (रकाना क्रं.२ मधील रकमेच्या १०% रक्कम) | १०% भाडेवाढ धरुन दरमहा होणारे एकूण भाडे (रकाना क्रं.२ + ६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १७/०७/२०१३ ते १६/०६/२०१४ | रु.८,८५८/- | रु. ९७,४३८/- | रु. ९७,४३८/- | -- | रु.८८६/- | रु.९,७४४/- |
| १७/०६/२०१४ ते १६/०५/२०१५ | रु.९,७४४/- | रु.१,०७,१८४/- | रु. ९७,४३८/- | रु. ९,७४६/- | रु.९७४/- | रु.१०,७१८/- |
| १७/०५/२०१५ ते १६/०४/२०१६ | रु.१०,७१८/- | रु.१,१७,८९८/- | रु. ९७,४३८/- | रु. २०,४६०/- | रु.१,०७२/- | रु.११,७९०/- |
| १७/०४/२०१६ ते १६/०३/२०१७ | रु.११,७९०/- | रु.१,२९,६९०/- | रु. ९७,४३८/- | रु. ३२,२५२/- | रु.१,१७९/- | रु.१२,९६९/- |
| १७/०३/२०१७ ते १६/०२/२०१८ | रु.१२,९६९/- | रु.१,४२,६५९/- | रु. ९७,४३८/- | रु. ४५,२२१/- | रु.१,२९७/- | रु.१४,२६६/- |
| १७/०२/२०१८ ते १६/०१/२०१९ | रु.१४,२६६/- | रु.१,५६,९२६/- | रु. ९७,४३८/- | रु. ५९,४८८/- | रु.१,४२७/- | रु.१५,६९३/- |
| | | रु.७,५१,७९५/- | रु.५,८४,६२८/- | रु.१,६७,१६७/- | | |

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील एकूण ५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी लिव्ह अँण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/०६/२०१४ पासून दि.१६/०१/२०१९ पर्यत ११-११ महिन्यांचे कालावधीसाठी उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठी त्यासमोर दर्शविलेल्या भाडेदराप्रमाणे व विद्युत बील वेगळे आकारुन मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामे करुन घेणेच्या व उक्त संस्थेकडे उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली बाकी वसुल करणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थानचे साईनाथ छाया इमारतीतील एकूण ५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी लिव्ह अँण्ड लायसन्स तत्वावर दि.१७/०६/२०१४ पासून दि.१६/०१/२०१९ पर्यत**

**११-११ महिन्यांचे कालावधीसाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या भाडे दराप्रमाणे व विद्युत बील वेगळे आकारुन मुदतवाढ देणेस व त्याप्रमाणे करारनामे करुन घेणेस तसेच श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडून उपरोक्त तक्त्यात दर्शविलेली बाकी वसुल करणेस मान्यता देण्यात आली.**

| करारनामा तारीख | मासिक भाडे | वसुल करावयाचे एकूण भाडे | वसुल झालेले एकूण भाडे | भाडे वसुल करावयाची बाकी | करारानुसार पुढील वर्षासाठी १०% दरमहा होणारी भाडेवाढ रक्कम (रकाना क्रं.२ मधील रकमेच्या १०% रक्कम) | १०% भाडेवाढ धरुन दरमहा होणारे एकूण भाडे (रकाना क्रं.२ + ६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १७/०७/२०१३ ते १६/०६/२०१४ | रु.८,८५८/- | रु. ९७,४३८/- | रु. ९७,४३८/- | -- | रु.८८६/- | रु.९,७४४/- |
| १७/०६/२०१४ ते १६/०५/२०१५ | रु.९,७४४/- | रु.१,०७,१८४/- | रु. ९७,४३८/- | रु. ९,७४६/- | रु.९७४/- | रु.१०,७१८/- |
| १७/०५/२०१५ ते १६/०४/२०१६ | रु.१०,७१८/- | रु.१,१७,८९८/- | रु. ९७,४३८/- | रु. २०,४६०/- | रु.१,०७२/- | रु.११,७९०/- |
| १७/०४/२०१६ ते १६/०३/२०१७ | रु.११,७९०/- | रु.१,२९,६९०/- | रु. ९७,४३८/- | रु. ३२,२५२/- | रु.१,१७९/- | रु.१२,९६९/- |
| १७/०३/२०१७ ते १६/०२/२०१८ | रु.१२,९६९/- | रु.१,४२,६५९/- | रु. ९७,४३८/- | रु. ४५,२२१/- | रु.१,२९७/- | रु.१४,२६६/- |
| १७/०२/२०१८ ते १६/०१/२०१९ | रु.१४,२६६/- | रु.१,५६,९२६/- | रु. ९७,४३८/- | रु. ५९,४८८/- | रु.१,४२७/- | रु.१५,६९३/- |
| | | रु.७,५१,७९५/- | रु.५,८४,६२८/- | रु.१,६७,१६७/- | | |

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.८ गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.,शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता,राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री साई संस्थान ऍप्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ (क्षेत्र १३ चौमी.) येथे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालविणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३०८ अन्वये दि.०७/१०/२०१७ ते दि.०६/०९/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम

रु.८,५७५/- व विद्युत बील वेगळे आकारुन करारनामा करणेस मान्यता देणेत आलेली आहे. त्याप्रमाणे उक्त संस्थेकडून दि.११/०७/२०१८ रोजी करारनामा करुन घेण्यात आलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.०६/०९/२०१८ रोजी संपुष्टात येत असल्याकारणाने उक्त जागा वापरासाठी पुढील दि.०७/०९/२०१८ ते दि.०६/०८/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेसाठी मा.चेअरमन, श्री साई संस्थान ऍप्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/८१/२०१८ दि.०५/०७/२०१८ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय– यापूर्वी मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन, मंत्रालय , मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.सासंवि-१०१७/२०३६/प्र.क्र.२२२/का.१६ दि.०१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ चे पोटकलम (३) नुसार श्री साईबाबा संस्थानच्या मालकीची जागा ११ महिन्यांसाठी भाडेतत्वावर देण्याकरीता शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. तसेच भविष्यात ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करारनामा करुन व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ देण्याची कार्यवाही करण्यात यावी, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

श्री साई संस्थान ऍप्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ मध्ये मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास दि.०७/०९/२०१८ ते दि.०६/०८/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.८,५७५/-+ १०% रु.८५८/- = एकूण रक्कम रु.९,४३३/- इतकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

**प्रस्ताव-** श्री साई संस्थान ऍप्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ मध्ये मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास दि.०७/०९/२०१८ ते दि.०६/०८/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.८,५७५/-+ १०% रु.८५८/- = एकूण रक्कम रु.९,४३३/- इतकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीप्रमाणेच करारनामा नोटराईज करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान ऍम्पलॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ मध्ये मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास दि.०७/०९/२०१८ ते दि.०६/०८/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.८,५७५/-+ १०% रु.८५८/- = एकूण रक्कम रु.९,४३३/- इतकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यास व याकामी पूर्वीप्रमाणे करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.९** **श्रींचे समाधी मंदिरातील श्रींचे मुर्तीचे मागील खांबावर सोन्याचे "श्रध्दा –सबुरी" नांवे देणगी दाखल स्विकारणे व बसविणेचे परवानगीबाबत.**

**प्रस्ताव-** श्रींचे समाधी मंदिरामध्ये श्रींची मूर्ती प्रतिष्ठीत करण्यात आलेली आहे. श्रींचे मूर्तीचे मागीलबाजुस मुर्तीचे वरील भिंतीवर सोने देणगीदाखल बसविण्यात आलेले आहे. तसेच श्रींचे सिंहासन हे सोन्याचे देणगीदाखल बसविण्यात आलेले आहे. श्रींचे मूर्तीचे मागे भिंत आहे. या भिंतीवर श्रींचे मूर्तीचे दोन्ही बाजूंनी दगडी खांब आहेत. याठिकाणी कोणत्याही प्रकारचे सोने किंवा इतर धातू बसविण्यात आलेले नाही.

**प्रस्ताव:-** साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांनी त्यांचे दि.०४/०८/२०१८ रोजीचे पत्रानुसार श्रींचे समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे मागील दोन्ही बाजुस असलेल्या खांबांना सोन्याचे “Shradda” and “Saburi” अशी दोन नांवे इंग्रजी भाषेमध्ये देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली आहे.

**विभागचा अभिप्राय:-** यापुर्वी साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंगयांनी खालीलप्रमाणे सोने वस्तू देणगीदाखल दिलेल्या आहेत-

| अ.क्र | आवक दिनांक | तपशील | नग | कॅरेट | वजन (ग्रॅम) | पावतीनुसार किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दि.०२/११/२००४ | सोन्याचा मुकूट | ०१ | २२ | ६४६.००० | ३,८३,०७८/- |
| ०२ | दि.०१/१०/२००६ | सोन्यामध्ये मढलेली रुद्राक्ष माळ | ०१ | २४ | ६४१.००० | ५,८३,४६५/- |
| ०३ | दि.२३/१०/२००६ | सोन्यामध्ये मढलेली रुद्राक्ष माळ | ०१ | २२ | ५४१.४५० | ४,९१,६३७/- |

आता पुन्हा देणगीदार साईभक्त श्री.ठाकूर गजेंद्र सिंग यांनी समाधी मंदिरामध्ये श्रींचे मूर्तीचे मागे असलेल्या भिंतीवरील खांबांवर सोन्यामध्ये "श्रद्धा व सबुरी" अशी दोन नांवे लावणेबाबत विनंती केली आहे. त्याबाबत असे की, "श्रद्धा" आणि "सबुरी" ही दोन्ही अक्षरे मराठी भाषेमध्येच बनवावे, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव:- तरी उपरोक्त नमूद केलेल्याप्रमाणे देणगीदार साईभक्त श्री.ठाकुर गजेंद्र सिंग, रा.हैद्राबाद यांनी केलेल्या विनंतीनुसार समाधी मंदिरातील मूर्तीचे मागील बाजूस असलेल्या खांबांवर "श्रद्धा" आणि "सबुरी" अशी दोन नांवे मराठी भाषेमध्ये देणगीदाखल स्विकारणेबाबतचा निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त श्री.ठाकूर गजेंद्र सिंग यांनी समाधी मंदिरामध्ये श्रींचे मूर्तीचे मागे असलेल्या भिंतीवरील खांबांवर सोन्यामध्ये "श्रद्धा व सबुरी" अशी दोन नांवे देणगीदाखल लावणेबाबतचा प्रस्ताव समिती सदस्य स्वत: लावणार असल्याने तूर्त स्थगीत ठेवावा.**

**यावेळी समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा कोल्हे यांनी श्रींचे समाधी मंदिरातील श्रींचे मूर्तीचे मागील दोन्ही बाजुस असलेल्या खांबांना सोन्याचे "श्रद्धा" आणि "सबुरी" अशी दोन नावे मराठी भाषेमध्ये स्वखर्चाने शताब्दीपुर्वी देणगीदाखल देणेबाबत इच्छा प्रदर्शित केली, त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१०** **सन २०१७-१८ या आर्थीक वर्षातील श्री साई प्रसादालयातील धान्य–कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद** :-सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ भाग-४ मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

**प्रस्ताविक** :- श्री साई प्रसादालयामध्ये दररोज अंदाजे ३५ ते ४० हजार साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेत असून उत्सव कालावधीमध्ये ही संख्या वाढून ८० ते ८५ हजारापर्यंत जाते. तसेच दररोज सुमारे ९ हजार ते १० हजार अन्नपाकीटांची विक्री होत आहे. त्याकामी लागणारा किराणा माल, धान्य- कडधान्य डाळी इत्यादी साफ केल्यानंतर वापरासाठी देण्यात येतात. सदर माल डिस्टोनर मशिनव्दारे व मनुष्यबळाकरवी साफ करण्यात येतो. सर्व प्रकारचे धान्य व कडधान्य स्वच्छ करण्यात येत असून गहू व हरबरा दाळ दळल्यानंतर काही प्रमाणात घट येते. त्याचप्रमाणे दळण-कांडन व साफ केल्यानंतर काही प्रमाणात कचरा, खडे, मातेरे निघते. तसेच वातावरणात वेळोवेळी होणा-या बदलामुळेही कडधान्याच्या वजनात घट येते. या सर्व कारणामुळे व प्रक्रिया करतांना किराणा मालामध्ये घट-तुट येत असते. वरीलप्रमाणे भाजी बनविणेसाठी लागणारा मसाला देखील तयार करण्यात येतो. त्याकरीता मसाल्याचे पदार्थ उदा. हिरवी विलायची, लवंग, तेजपान, हळद, मिरची इ.वापरणेत येत असून त्यामध्ये देखील वरील प्रमाणे प्रक्रीया केली असता काही प्रमाणात घट येत असते.

याबाबत सन-२००५-२००६ मध्ये प्रसादालयाचे लेखापरिक्षणामधील मुद्दा व मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.४०५ नूसार, सन २००७-०८ पासून पुढे श्री लोंगाणी, स्थानिक अंतर्गत लेखापरिक्षक यांचे सुचनेनूसार शासकीय डिपार्टमेंटकडून माहीती घेवून श्री लोंगाणी यांचे मार्गदर्शनाने नियमावली करुन घट-तुट दर्शविण्याची कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली होती. घट-तुटीबाबत शासनाची निश्चित अशी नियमावली नसल्यामुळे त्याकरीता **शासकीय संस्था, इतर देवस्थान, सरकारी कारागृह, मिलीटरी कॅम्प, सरकारी अन्नधान्य महामंडळ अशा १० संस्थांना प्रशासन शाखा जा.नं.७८३७ दि.२१/०५/२००७ पत्र पाठवून त्यांचेकडे असलेली धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीची पध्दती लिखीत स्वरुपात मागविणेत आलेली होती.**

**त्यानूसार धान्य कडधान्य व किराणा मालाचे घट-तुटीबाबत खालील तीन शासकीय व धार्मिक देवस्थानांकडून धान्य कडधान्य व किराणा मालाचे प्रचलीत घट-तुटीबाबत माहीती प्राप्त झाली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे**

| अ.नं. | संस्थेचे नांव | तपशिल (प्रति क्विंटल घट-तुट) |
|---|---|---|
| ०१. | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | ज्वारी-४%, बाजरी-५%, गहू-५%, तांदूळ-२%, सर्व प्रकारच्या डाळी-२%, फळभाजी-५%, पालेभाजी-१०%, ज.लाकूड/कोळसा-५% |
| ०२. | मध्यवर्ती कारागृह, नासिकरोड | साखर व वन.तुप या खाद्यतेलास घट नाही मात्र कडधान्य व डाळी-२% |
| ०३. | गजानन महाराज संस्थान, शेगांव | प्रती क्विंटल ३% ते ५% एवढी घट-तुट दर्शविलेली आहे. |

उपरोक्त सदर पध्दतीचा विचार करुन मा.श्री अभय शास्त्री (सी.ए.), मा.श्री.ए.जी.लोंगाणी, (सी.ए.) हे संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक व मुख्य लेखाधिकारी यांनी खालीलप्रमाणे संस्थानची घट-तुटीबाबतची नियमावली बनविणेत आलेली असून त्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०७/२००८ रोजीचे सभेत निर्णय क्रं.५६० नूसार मान्यता मिळालेली आहे तेंव्हापासून प्रचलीत नियमावलीप्रमाणे आजतागायत प्रसादालयातील धान्य-कडधान्याची घट-तुट दर्शविणेबाबत कार्यवाही चालू आहे.

१. सन २००७ -२००८ मध्ये प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट इतर देवस्थान व संस्था यांचेकडील प्रचिलत घट-तुटीचे प्रमाण पाहता आपलेकडील आलेली सरासरी घट-तुट योग्य असून इतरांचे तुलनेने कमी असलेने दर सहा महिन्यानंतर प्रस्तावित घट-तुट नांवे टाकणेत यावी.

२. दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष मालाचा साठा व रजिष्टरप्रमाणे दिसणारा मालाचा साठा याची पडताळणी करावी.

३. दर सहा महिण्यानंतर प्रत्यक्ष शिल्लक माल व रजिष्टरप्रमाणे दिसणारा साठा याची तपासणी केल्यानंतर तपासणी अंती आलेली घट-तुट प्रस्तावित सरासरी पेक्षा कमी आढळल्यास त्याबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल मा. व्यवस्थापन समिती समोर अवलोकनार्थ सादर करावा. मात्र प्रस्तावित सरासरी पेक्षा आलेली घट-तुट जादा असेल तर त्यास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी.

**उपरोक्त नियमावलीनुसार व मा.व्यवस्थापन समिती निर्णयानूसार प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालाची घट-तुट खर्ची टाकणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयातील धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये खालीलप्रमाणे घट-तुट आलेली आहे. याबाबतचा अहवाल मान्यतेसाठी सादर करणेत येत आहे.**

अ) <u>सन २०१७-२०१८ मध्ये धान्य-कडधान्य व किराणा मालामध्ये आलेल्या घट-तुटीचा तपशिल</u>

| अ.नं. | मालाचा तपशिल | दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर प्रत्यक्ष खर्च झालेला माल | दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर प्रत्यक्ष आलेली घट-तुट | घट-तुटीचे प्रमाण | मान्य झालेल्या घट-तुटीचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | किलो/ग्रॅम | किलो/ग्रॅम | टक्केवारीमध्ये | टक्केवारीमध्ये |
| १ | गहु | १२६३६६०.५०० | २८९२९.००० | २.२९ | ३.०० |
| २ | तांदूळ | ८९०८७४.४०० | २९०८.५०० | ०.३३ | १.०० |
| ३ | तुरदाळ | ११२२८४.५०० | २१८.००० | ०.१९ | १.०० |
| ४ | हरबरा दाळ | ४२४८४.५०० | २४३.७५० | ०.५७ | २.०० |
| ५ | मुगदाळ | ९०९३२.५०० | ३१७.५०० | ०.३५ | १.०० |
| ६ | गुळ | ३६३८४.५०० | ८३.५०० | ०.२३ | १.०० |
| ७ | रवा | ६११६०.१०० | ६५.५०० | ०.११ | १.०० |
| ८ | शेंगदाणे | ४३०१९.४५० | २१७.००० | ०.५० | १.०० |
| ९ | अखंड मिरची | १३७४७.८४० | ३८०.००० | २.७६ | ४.०० |
| १० | अखंड हळद | १०४१३.००० | २६४.५०० | २.५४ | ४.०० |
| ११ | मोहरी | ४६०४.५०० | २८.००० | ०.६१ | २.०० |
| १२ | जिरे | ६२६३.५०० | ४२.५०० | ०.६८ | २.०० |
| १३ | अखंड मसाला | २३६५.३५० | ३३.००० | १.४० | २.२५ |
| १४ | अखंड धने | १४७०५.५०० | २१७.००० | १.४८ | २.५० |
| १५ | खोबरेवाटी | १६९९५.७५० | ९६.२५० | ०.५७ | १.०० |
| १६ | हरबरा | ६९८३६.२५० | १९३.००० | ०.२८ | १.०० |
| १७ | वाटाणा | ४७५३२.८०० | १०९.००० | ०.२३ | १.०० |
| १८ | मुग | ८७८६९.५०० | ४१३.००० | ०.४७ | १.०० |
| १९ | मठ | ७२०५९.८०० | २३५.००० | ०.३३ | १.०० |
| २० | मेथी | ३६४.४५० | २.८५० | ०.७८ | २.२५ |
| २१ | सुंठ (अखंड) | १९९.७५० | ९.२५० | ४.६३ | ५.२५ |
| २२ | मैदा | ३०३१०.००० | ३६.००० | ०.१२ | ०.५० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | भगर | २७७.५०० | १.५०० | ०.५४ | २.०० |
| २४ | साबुदाणा | २१४३७.७५० | ९६.२५० | ०.४५ | १.२५ |
| २५ | कच्चे पोहे | १२७५.००० | ६.१०० | ०.४८ | १.०० |
| २६ | भाजके पोहे | २८०९.००० | ८६.००० | ३.०६ | ४.०० |
| २७ | डाळया | ५७३.७५० | २.००० | ०.३५ | १.२५ |
| २८ | चवळी | १८०८०.००० | ११४.००० | ०.६३ | १.०० |
| २९ | काबुली चना | ११९३१.००० | ४८.००० | ०.४० | १.०० |

३ इकडील विभागामार्फत वरीलप्रमाणे आलेली घट-तुटीबाबत प्रस्ताव मान्यतेची टिपणी सादर करणेत आलेली होती. त्यावर मा.मुख्यलेखाधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी साहेब यांनी 'घट-तुट काढण्यासाठी कोणती कार्यपध्दती अवलंबविण्यात येत आहे, ते नमूद करुन सादर करण्यात यावे.' असे निर्देश दिलेले आहेत. **त्यानूसार मुख्य भांडारमधून श्री साई प्रसादालयात येणारा किराणा माल व त्याची घट-तुटीबाबत असणारी कार्यपध्दती खालीलप्रमाणे सादर करीत आहोत.**

| मुख्य भांडारकडून प्रसादालयात येणारा माल | घट-तुट कार्यपध्दती |
|---|---|
| गहु, तांदुळ, तुरदाळ, हरबरादाळ, मुगदाळ, गुळ, रवा, शेंगदाणे, मोहरी, जिरे, खोबरेवाटी, हरबरा, वाटाणा, मुग, मठ, मेथी, सुंठ, मैदा, भगर, साबुदाणा, कच्चे पोहे, भाजके पोहे, डाळया, चवळी, काबुली चना इत्यादी. | प्रथमत: सदरचा माल मुख्य भांडारमध्ये उतरविला जातो. तदनंतर आवश्यकतेनुसार प्रसादालयातील उपभांडारमध्ये आणला जातो. उपभांडारमध्ये आणल्यानंतर तो मनुष्यबळाव्दारे निवडला जातो. त्यातील खडे, कांडे, काडी, कचरा इत्यादी निवडले जाते. निवडलेले गहु पुन्हा डिस्टोनर मशिनमध्ये टाकून मशिनव्दारे त्यातील खडे, कांडे, काडी, कचरा, लोहकिस काढून पुर्णत: साफ सफाई केली जाते. साफ-सफाई केलेले गहु गिरणीमध्ये दळणेसाठी दिले जातात. गहु दळल्यानंतर चाळणीव्दारे चाळण (कोंडा) निघतो व निघालेल्या पीठाचा ४० किलो वजनाप्रमाणे गोण्या भरुन ठेवण्यात येतात. उपरोक्तप्रमाणे केलेल्या वजनानूसारच सदरचे पीठ मुख्य किचनमध्ये चपाती/पुरी तयार करणेसाठी खर्ची टाकणेत येते व त्यानूसारच उपभांडारमधील आवक-जावक रजिस्टरला नोंदी घेण्यात येतात.<br>मुख्य भांडारमधून श्री साई प्रसादालयात आणले जाणारे गहु, तांदुळ, तुरदाळ, हरबरादाळ, मुगदाळ, गुळ, रवा, शेंगदाणे, मोहरी, जिरे, खोबरेवाटी, हरबरा, वाटाणा, मुग, मठ, मेथी, सुंठ, मैदा, भगर, साबुदाणा, कच्चे पोहे, भाजके पोहे, डाळया, चवळी, काबुली चना इत्यादी धान्य कडधान्य हे मनुष्यबळाव्दारे निवडून, डिस्टोनर मशिनव्दारे साफ-सफाई करुनच मुख्य किचनमध्ये वापरण्यासाठी देण्यात येतो. ही सर्व प्रक्रिया करत असतांना मुख्य भांडारकडून आलेले वजन व साफ-सफाई करुन झाल्यानंतरचे वजन यामध्ये काही प्रमाणात घट-तुट येत असते. त्यामुळे दर सहा महिन्यानंतर आलेली घट-तुट जमा-नांवे टाकणेबाबत मा.व्य.समितीची मान्यत घेण्यात येत असते. |
| अखंड मिरची, अखंड हळद, अखंड मसाला | प्रथमत: मुख्य भांडारमध्ये आल्यानंतर आवश्यकतेनुसार प्रसादालयातील उपभांडारमध्ये प्रत्यक्ष वजनानूसार आणणे, आणलेल्या स्थितीतच आहे त्या वजनानूसार त्याची आवक रजिस्टरला नोंदी घेणे. तदनंतर उन्हामध्ये वाळवणे, वाळून झाल्यानंतर ग्राईंडरमध्ये बारीक (पावडर) करणेसाठी तीन वेळेला दळणे. दळण झाल्यानंतर स्टॉक करणे व मुख्य किचनमध्ये वापरणेकामी देणे. ही सर्व प्रक्रिया करत असतांना मुख्य भांडारकडून आलेले वजन व उन्हामध्ये वाळून झाल्यानंतरचे वजन तसेच तीन वेळा ग्राईंडर मध्ये दळून झाल्यानंतरचे वजन यामध्ये काही प्रमाणात घट-तुट येत असते. त्यामुळे दर सहा महिन्यानंतर आलेली घट-तुट जमा-नांवे टाकणेबाबत मा.व्य.समितीची मान्यत घेण्यात येत असते. |

वरीलप्रमाणे काही किराणा मालामध्ये वातावरणातील बदलामुळे व पावसाळयामध्ये काही वेळेला उपरोक्त मालापैकी काही माल ओलसर असतो, त्यामुळे तो खराब होऊ नये याकरीता तो उन्हामध्ये वाळवून वापरावा लागतो. तसेच काही माल उदा.अखंड हळद, अखंड धने, अखंड मिरची हे ग्राईंडरव्दारे एकदाच जादा प्रमाणात दळणेत येऊन सदर माल उपभांडारमध्ये स्टॉक करावा लागतो. त्यामुळे दळतांना त्यामध्ये काही प्रमाणात घट येते व प्रत्यक्षात मालाची मोजदाद करतांना त्याप्रमाणात माल कमी भरतो. करीता आलेली घट-तुट खर्च टाकणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता असणे गरजेचे आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- तरी उपरोक्तप्रमाणे सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात प्रत्यक्ष आलेली घट-तुट ही संस्थानने निश्चित केलेल्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणात आहे.

प्रस्ताव:- सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात धान्य-कडधान्य किराणा माल यामध्ये आलेल्या घट-तुटीचा अहवाल मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.५४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात धान्य, कडधान्य, किराणा माल यामध्ये आलेल्या घट-तुटीच्या अहवालाचे अवलोकन करुन, त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)**

---

विषय नं.११ **शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानासाठी आवश्यक साहित्य (क्वायर फोम मॅट्रेस, उशी, उशीकव्हर व कॉट) बाबत दि. १९/०९/२०१६ मधील २३४ नग कॉट खरेदी प्रक्रिया प्रस्ताव निरस्त करणेबाबत.**

प्रस्ताव- ०१. अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांसाठी निवासव्यवस्था व अनुषंगीक सुविधा पुरविण्यात येते.

०२. प्रस्तावीक – शिर्डी येथे नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या बसस्थानकात संस्थानचे तळमजल्यावर तीन गाळे असून पहिला व दुसरा संपुर्ण मजला संस्थानचे ताब्यात आहे. पहिल्या मजल्यावर ०७ रुम व ०७ हॉल तसेच दुस-या मजल्यावर ०७ रुम व ०७ हॉल असे एकूण १४ रुम्स व १४ हॉल्स तेथे आहेत. यामधील रुम्स करिता संडास बाथरुमची व्यवस्था अॅटॅच आहे व हॉल करिता संडास बाथरुमची व्यवस्था जनरल (कॉमन) आहे.

दि.१९/०९/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६३९ नुसार शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे साहित्य खरेदी करणेकामी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे आवश्यक कॉट्स खरेदीकामी बांधकाम विभागास कळविणेत आले होते. बांधकाम विभागामार्फत सदर खरेदीची कार्यवाही सुरु करण्यात येवून अलीकडेच सदर कार्यवाही बांधकाम विभागाकडून मेकॅनिकल विभागाकडे वर्ग केली आहे.

तथापि, साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती ऑक्टोंबर २०१७ व नोव्हेंबर २०१७ मध्ये नवीन दर्शनलाईन प्रकल्प उभारणीकामी पाडण्यात आल्या आहेत. त्यामधील ३५६ कॉट्स विभागाकडे उपलब्ध झालेने आवश्यकतेनुसार साईउद्यान इमारती मधील रुम्स, हॉल्स व शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात साईभक्तांच्या वापराकरीता ठेवण्यात आले आहेत.

**०३. <u>विभागाचा स्पष्ट अभिप्राय/स्पष्ट मत</u>**–त्यामुळे शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाकरीता तुर्त कॉट खरेदीची आवश्यकता नाही. भविष्यात तेथे कॉटची आवश्यकता भासल्यास साई धर्मशाळेकडील नुकतीच एक इमारत वरिष्ठ महाविद्यालयासाठी देण्यात आली आहे. तेथील कॉट उपलब्ध करुन घेता येतील.

तरी दि.१९/०९/२०१६ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६३९ मधील क्वायर फोम मॅट्रेस, उशी, उशीकव्हर वगळून प्रस्तावीत केलेनुसार सध्या कॉटची आवश्यकता नसल्याने शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानात लागणारे आवश्यक २३४ नग कॉट खरेदी प्रक्रिया प्रस्ताव निरस्त करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

निर्णय क्र.५४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी बसस्थानकावरील संस्थान निवासस्थानाकरीता तुर्त कॉट खरेदीची आवश्यकता नसल्याने तसेच भविष्यात तेथे कॉटची आवश्यकता भासल्यास साई धर्मशाळेकडील नुकतीच एक इमारत वरिष्ठ महाविद्यालयासाठी देण्यात आली आहे. तेथील कॉट उपलब्ध करुन घेता येतील. त्यामुळे दि.१९/०९/२०१६ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.६३९ मधील क्वायर फोम मॅट्रेस, उशी, उशीकव्हर वगळून २३४ नग कॉट खरेदीचा निर्णय निरस्त करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,साई प्रसाद निवासस्थान)**

---

विषय नं.१२ **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅन्ड बाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रेक्ट सन २०१९ साठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **प्रस्तावना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव**:-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम भक्तनिवास ए.सी. या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून २४ तास ते ४८ तास देखील वीजपुरवठा बंद ठेवला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे व गर्दीत, अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनरेटर कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस डिलर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते.

जनरेटसेटचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | ०१ नग. |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | ०१ नग. |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | ०१ नग. |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | ०१ नग. |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | ०१ नग. |
| ११) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १२) | साईआश्रम भक्तनिवास | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १३) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १४) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | ०१ नग. |
| १५) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १६) | साईआश्रम भक्तनिवास ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | ०१ नग. |
| १७) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए.३-६४ | ०१ नग. |
| १८) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | ०१ नग. |
| १९) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | ०१ नग. |
| २०) | इर्मजन्सी (श्री फेज) (स्पेअर) | १० केव्हीए | SC2130064 | X13 G2 | ०१ नग. |
| २१) | शांतिनिकेतन | १५ केव्हीए | D21022-0300022 | DM 20 | ०१ नग. |

पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट संस्थान जा.नं.एसएसएसटी/विद्युत/५२७७/२०१७ दि.०१-०१-२०१८ अन्वये रक्कम रु.३७,००,०००/- मात्र रकमेस जनसेट उत्पादक कंपनी मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि.१-०१-२०१८ ते दि.३१-१२-२०१८ या कालावधीकरीता देण्यात आलेले होते.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हीस सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३१-१२-२०१८ रोजी संपत आहे.

तसेच यावर्षी सदर जनसेटच्या संख्येत वाढ झालेली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटसेट ठिकाण | जनसेट क्षमता | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | बसस्थानक | ६२.५ केव्हीए | ७२०३११८४ | ४११ बीटीएए ३.३ जी ११ | ०१ नग. |
| ०२) | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ५० केव्हीए | ७२०३७५२१ | ४११ बीटीएए ३.३ जी ११ | ०१ नग. |

उपरोक्त सर्व २३ नग जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

**मागणी:-** आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). नविन धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भक्तनिवास, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). साईआश्रम ए.सी. या वेगवेगळया परीसरातील २३ नग जनरेटरसेटच्या इंजिनचे दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी रक्कम रुपये ३८,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३८,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये अडोतीस लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन मे.कमिन्स कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय २३ नग जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३८,००,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)**

---

विषय नं.१३ **एअर सर्किट ब्रेकर्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) सन २०१९ साठी देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **प्रस्तावना:-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय+व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा याठिकाणीच्या इमारतींना वीज पुरवठयाकरीता स्वतंत्र आठ ठिकाणी सबस्टेशन उभारुन विद्युतपुरवठा करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर करावयाच्या तातडीच्या वीजपुरवठयासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरचे जनरेटर सेट ऑपरेटींग करणेकरीता स्वतंत्र ए.एम.एफ.पॅनेल बसविण्यात आलेले आहे. प्रत्येक सबस्टेशन मध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा व जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमार्फत येणारा वीजपुरवठा वरील इमारतींना पुरविणेकरिता मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल बसविण्यात आलेले आहेत. संस्थानमध्ये आजपर्यंत विविध ठिकाणच्या ए.एम.एफ.पॅनेल व मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमध्ये ८०० ॲम्पीअर ते २०००ॲम्पीअर कॅपॅसिटीचे

एल.अँड.टी.कंपनीचे व सिमेन्स कंपनीचे **प्रत्येकी रु. १,३०,०००/- ते रु. ४,५०,०००/- किंमतीचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकर बसविण्यात आलेले आहेत.**

जनरेटरच्या ए.एम.एफ.पॅनेलमधील एअर सर्कीट ब्रेकर हे वीजपुरवठा चालू बंद होण्याच्या वेळेस म्हणजेच जनरेटर सेट चालू बंद होण्याच्या वेळेस कंट्रोल सर्किटव्दारे ऑटोमॅटीक ON / OFF होतात. त्याचप्रमाणे मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेलमधील एअर सर्किट ब्रेकर हे Mannually ON / OFF करावे लागतात. सततच्या ON / OFF होण्याच्या क्रियेमुळे कॉन्टॅक्ट ब्रेकरचे स्क्रू, नट, बोल्ट, कनेक्टर स्प्रिंग हे लूज होत असतात. तसेच ब्रेकर ज्याठिकाणी सप्लायला जोडला जातो त्याठिकाणी स्पार्किंग होऊन कॉन्टॅक्टवर कार्बन जमा होत असतो. त्यामुळे कधी कधी ब्रेकर चालू / बंद होण्यास व सप्लाय त्यामधून पास होण्यास अडथळा येऊ शकतो. त्याचप्रमाणे एखादया मेन डिस्ट्रिब्युशन पॅनेल अथवा ए.एम.एफ.पॅनेल मधील एअर सर्किट ब्रेकर पासून पुढे जोडलेला एखादा मेनस्वीच अथवा विद्युत उपकरण अथवा मेनस्वीच भूसंपर्कित झाल्यास ज्या एअर सर्कीट ब्रेकर मधून क्षमतेपेक्षा जास्त वीज प्रवाह वाहुन पुढील हानी व धोका टळण्यासाठी एअर सर्कीट ब्रेकरमधील Over current & Earth fault सेंन्सर कार्यान्वित होऊन वीजपुरवठा खंडीत होतो. त्यामुळे पुढील हानी अथवा धोका टळत असतो. **संस्थानमधील काही ठिकाणचे एअर सर्किट ब्रेकर हे २३ वर्षापुर्वी बसविलेले आहेत.** वरील सर्व कारणांमुळे एअर सर्किट ब्रेकरमार्फत वीजपुरवठा करण्यास काही अडथळा येऊन नये. याकरीता सदरच्या एअर सर्किट ब्रेकरची नियमित सर्व्हिसिंग करावी लागते. सर्व्हिसिंगचे वेळेस खराब झालेले कॉन्टॅक्ट व ब्रेकरच्या आतील मेकॅनिझमचे सदोष पार्ट बदलून एअर सर्किट ब्रेकरची सर्व्हिसिंग करण्यात येते. एअर सर्कीट ब्रेकरचा तपशिल खालीलप्रमाणे.

01). L & T कंपनीचे Air Circuit Breaker

| Sr.No. | Description | Nos. |
|---|---|---|
| Regular Preventive Maintence of following low Voltage Air Circuit Breaker | | |
| 01) | L & T Make 800 A 3 Pole Air Circuit Breaker | 50 Nos. |
| 02) | L & T Make 1000 A 3 Pole Air Circuit Breaker | 10 Nos. |
| 03) 0 | L & T Make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 04) | L & T Make 1600 A 3 Pole Air Circuit Breaker | 11 Nos. |
| | Total :- | 75 Nos. |

02). Siemens कंपनीचे Air Circuit Breaker

| Sr.No. | Description | Nos. |
|---|---|---|
| Regular Preventive Maintence of following low Voltage Air Circuit Breaker | | |
| 01) | Siemens Make 800 A 4 Pole Air Circuit Breaker | 11 Nos. |
| 02) | Siemens Make 1000 A 4 Pole Air Circuit Breaker | 04 Nos. |
| 03) | Siemens Make 1600 A 4 Pole Air Circuit Breaker | 07 Nos. |
| 04) | Siemens Make 2000 A 4 Pole Air Circuit Breaker | 05 Nos. |
| | Total :- | 27 Nos. |

उ

परोक्त प्रमाणे एल ॲण्ड टी मेक कंपनीचे ७५ नग एअर सर्कीट ब्रेकरचे तसेच सिमेन्स मेक एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट संस्थानचे जा.नं.एसएसएसटी / विद्युत / ५२७४ / २०१७ दिनांक ०१-०१-२०१८ अन्वये रक्कम रु. १३,५१,०००/- मात्र रकमेस मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई यांना दि.०१-०१-२०१८ ते दि.३१-१२-२०१८ या कालावधीकरीता देण्यात आलेले आहे. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये मे.टेक इंडिया इंजिनिअर्स प्रा.लि., मुंबई हे उत्तमरित्या सर्व्हीस देत असून सर्व एअर सर्कीट ब्रेकर सुरळीत कार्यान्वित आहेत. सदरच्या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक ३१-१२-२०१८ रोजी संपत आहे.

**मागणी** :- उपरोक्तप्रमाणे सर्व ठिकाणचे एल.अँड टी. आणि सिमेन्स कंपनीचे एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दयावयाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 01) | Regular Preventive Maintence low Voltage L&T make Air Circuit Breaker | 75 Nos. |
| 02) | Regular Preventive Maintence low Voltage Siemens make Air Circuit Breaker | 27 Nos. |
| | Total :- | 102 Nos. |

वरीलप्रमाणे एल.अँड टी कंपनी व सिमेन्स कंपनी अशा दोन्ही कंपन्याचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता देणेकामी सरासरी अंदाजे रु.१३,५०,०००/- इतक्या खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय+व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विविध ठिकाणी कार्यान्वित असलेल्या एल.अँड टी कंपनी व सिमेन्स कंपनी अशा दोन्ही कंपन्याचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता देणेकरीता अंदाजे रक्कम रुपये १३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तेरा लाख पन्नास हजार) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे. तरी श्री साईबाबा संस्थानचे सर्व एअर सर्कीट ब्रेकरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दि.०१-०१-२०१९ ते दि.३१-१२-२०१९ या कालावधीसाठी देणेकरीता येणा-या खर्चास व शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदा प्रकाशित करुन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हीस डिलर व इतर यांचेकडून ई-निविदा मागविणेस तसेच मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.५४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे मंदिर परीसर, साईनगर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय+व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साई प्रसादालय, साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या विविध ठिकाणी कार्यान्वित असलेल्या एल.अँड टी कंपनी व सिमेन्स कंपनी अशा दोन्ही कंपन्याचे एकुण १०२ नग एअर सर्कीट ब्रेकरचे दिनांक ०१-०१-२०१९ ते दिनांक ३१-१२-२०१९ या कालावधीकरीता वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग )

---

विषय नं.१४ **महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांनी पत्र क्र.सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८.०५.२०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतुदींचा विचारकरता साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या फेर प्रस्तावास मा.छाननी समितीचे निर्णयानुसार मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव- प्रस्ताव- महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१) कलम १७ (१) मध्ये, "राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा

धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये ‘‘विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही’’, अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना**:-दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये,श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्येसंस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे असेचचालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता,‘‘राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यामाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहिका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहिका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी’’ असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन/४४५५/२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

त्यानंतर दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये ‘‘महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा’’, असे ठरले.

सदर निर्णयानुसार,दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

‘‘वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साई-रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-III बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

सर्वसहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्रान्वये, साई रुग्णवाहिका प्रकल्पास व या बाबतचे मा.व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता,"भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी", असे कळविलेले होते.

यानुसार सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ चे सभेत सादर केला असता. यावर सविस्तर चर्चा होऊन, "राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा", असे ठरले.

या निर्णयानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९०९/२०१७ दि.२३/०५/२०१७ चे पत्रान्वये संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड. नितीन आर. भवर, औरंगाबाद यांना शासनाचे पत्र संस्थान अधिनियम याचा अभ्यास करुन साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत उचीत मार्गदर्शन करणे बाबत कळविलेले आहे. त्यांचेकडून अद्याप अभिप्राय अप्राप्त आहे.

कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र. ११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्र इकडील कार्यालयास दि.२८/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये,"श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत", असे कळविलेले आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन पुढील सुनावणी दि.१८/०७/२०१८ रोजी होती.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्रातील व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेतील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन शासनास देणेचे अभिप्राय बाबत निर्णय होणे करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०५, निर्णय क्र.२०४ "साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Aggregator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किंमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणा-या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.

प्रथम महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.

सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे. त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सदर करणेत यावा, असे ठरले.

यानंतर दि.०४/०४/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.२२४ (५) नुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

दि.०७/०३/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२०४ या मध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.

साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.

या सभेत दिलेल्या निर्देशानुसार वाहन विभागाकडील दि.०५/०४/२०१८ चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस/वाहन/९९/२०१८ दि.१२/०४/२०१८ चे आदेशान्वये साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत साईभक्तांकडून स्विकारण्यात येणारी देणगी पुढील आदेश पावेतो स्थगित करण्यात आलेली आहे. त्यानुसार साई रुग्णवाहिका प्रकल्पाचे निधीमध्ये संस्थानखाती दि.१३/०४/२०१८ अखेर एकुण रु.६,२४,३४,४६१/- (अक्षरी रु. सहा कोटी चौविस लाख चौतीस हजार चारशे एकसष्ट मात्र) जमा आहेत.

यानंतर दि.०२/०५/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३८ व दि.०१/०६/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

“रुग्णवाहिकांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री केळकर व सनदी लेखापाल श्री चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याऐवजी सदर निधीचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहिकेवर साई रुग्णवाहिका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहिका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणा-या सेवाभावी संस्था / ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुग्णवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहिकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणा-या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील”, असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयानुसार, साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या रुग्णवाहिका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुषंगीक खालील बाबी संस्थानवर बंधनकारक राहतील.

१) सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता १०० रुग्णवाहिका कंपनी व मॉडेल निश्चित करुन विहीत पध्दतीने खरेदी करणेस तसेच या कामी येणा-या खर्चास शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

२) साई रुग्णवाहिकांचा प्रथम RTO रजिस्ट्रेशन व इतर अनुषगीक खर्च संस्थानला करावा लागेल.

३) एखाद्या रुग्णवाहिकेस अपघात झालेस तसेच या अपघातात दुर्दैवी मृत्यु झाल्यास त्या संबंधीतकायदेशीर प्रक्रिया संस्थानला पारपाडाव्या लागतील. त्यासंबंधीत काही कायदेशिर बाबी निर्माण झाल्यास त्यावेळी संबंधीत न्यायालयात संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थान प्रतिनिधी हजर ठेवुन वेळोवेळी माहिती द्यावी लागेल.

४) अपघातग्रस्त साई रुग्णवाहिका दुरुस्ती करीता येणा-या खर्चाचा तसेच अपघातातील जखमी अथवा मयत व्यक्तींनी किंवा त्यांचे नातेवाईकांनी नुकसान भरपाईची मागणी केल्यास त्यासंबंधी विमा क्लेम संबंधीत विमा कंपनीकडे संस्थानला सादर करावा लागेल. तसेच यासंबंधीत कायदेशिर बाबींचे पुर्ततेकरीता संबंधीत न्यायालयात संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थान प्रतिनिधी हजर ठेवुन कार्यवाही करावी लागेल.

५) साई रुग्णवाहिका प्रकल्पातील रुग्णवाहिकेचा अपघात झाल्यास तीचे दुरुस्ती करीता झालेला खर्च संबंधीत संस्था सेवाभावी संस्था / ट्रस्ट आदा करणार आहेत. मात्र साई रुग्णवाहिका संस्थानचे नावावर असलेने अपघातग्रस्त रुग्णवाहिकेस दुरुस्ती करीता आलेल्या खर्चाची विमा कंपनीचे नियमानुसार विमा क्लेम पोटी मिळणारी परतावा रक्कम प्रथम संस्थान खाती जमा होईल. अशी संस्थान खाती झालेली जमा झालेली रक्कम संबधीत संस्थांना परत करणे अडचणीचे होईल.

६) साई रुग्णवाहिकांचाप्रतीवर्षी टॅक्स माफ करुन घेणे करीता सर्व सेवाभावी संस्थाना रुग्णवाहिका व आवश्यक कागदपत्रांसह शिर्डी येथे बोलावुन टॅक्स माफ करणेची अनुशंगिक कामे संस्थानला करावे लागतील. टॅक्स माफी न मिळाल्यास नियमानुसार RTO कार्यालयात टॅक्सची रक्कम भरावी लागेल.

७) साई रुग्णवाहिकांचा प्रती वर्षी सर्व वाहने फिटनेस करीता सर्व सेवाभावी संस्थाना रुग्णवाहिका व आवश्यक कागदपत्रांसह शिर्डी येथे बोलावुन सदरच्या रुग्णवाहिका विहीत फॉर्म व फी भरुन RTO कार्यालयाकडे

तपासणी कामी पाठवाव्या लागतील. विहीत कालावधीत फिटनेस न झालेस या कामी RTO कार्यालयाच्या नियमानुसार दंड संस्थानला भरावा लागेल.

८) फिटनेस कामांकरीता सर्व रुग्णवाहिका एकाच वेळी उपलब्ध होतील असे नाही त्यामुळे सदर कामेवेळोवेळी करावे लागतील.

९) साई रुग्णवाहिका आठ वर्ष जुन्या झाल्यानंतर नंतर RTO कार्यालयाच्या नियमानुसार पर्यावरणकर संस्थानलाभरावा लागेल.

१०) साईरुग्णवाहिका प्रकल्पातील सर्व रुग्णवाहिकांचा प्रति वर्षीविमा नुतणीकरण संस्थानमार्फत वेळेत करावा लागेल. याकामी विमा हप्त्याची रक्कम संबधीत संस्थेकडून परत घ्यावी लागेल.

११) या सर्व रुग्णवाहिकेवर व त्यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे करीता एक स्वतंत्र साई रुग्णवाहिका या नावाने नवीन विभाग तयार करावा लागेल. या करीता आवश्यक कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील. या कामी लागणा-या कर्मचा-यांची संख्येची संस्थान आकृतीबंधात वाढ करणे बाबत शासन मान्यता घ्यावी लागेल.

१२) सदर रुग्णवाहिकांवर नियंत्रण ठेवणे करीता वाहनांमध्ये कॅमे-यासह जीपीआरएस सिस्टीम बसवावी लागेल. तसेच इतर अनुशंगिक साधन सामुग्री संस्थानचे सीसीटीव्ही विभागामार्फत उपलब्ध करुन त्यांचे दैनंदिन नियंत्रण व दुरुस्ती देखभाल सीसीटीव्ही विभागामार्फत करावी लागेल.

उपरोक्त बाबी विचारात घेता सदर रुग्णवाहिका प्रकल्पाची अंमलबजावणी करणे अव्यवहार्य आहे, असे प्रशासनाचे मत आहे.

तथापि ज्या स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट यांना रुग्णवाहिका द्यावयाच्या आहेत, त्यांचे निकष / नियमावली निश्चित करुन त्यानुसार त्यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवुन त्या संस्था निश्चित करुन त्यांना ठरावीक रक्कम अनुदान म्हणुन देवुन त्या रक्कमेतुन त्यांनी रुग्णवाहिका खरेदी केल्यास त्या रुग्णवाहिकांची कायदेशीर जबाबदारी त्यांची राहील.

संस्थान अधिनियमातील कलम २१ (२) (१) नुसार पात्र संस्थांची निवड करुन मा.छाननी समितीच्या मान्यतेने शासनाला प्रस्ताव सादर करता येईल. शासन मान्यता मिळालेनंतर संबधीत संस्थाना एकरकमी अनुदान अटी व शर्तींच्या अधिन राहुन देता येईल. यामुळे संस्थानवर भविष्यात कोणतीही कायदेशिर जबाबदारी येणार नाही.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत वेळोवेळी झालेल्या सर्व निर्णयांचे अवलोकन होऊन शासनास पाठवावच्या अंतिम प्रस्तवाचा मसुदा निश्चित करुन निर्णय होणे बाबतचा प्रस्ताव दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

**दि.२६/०७/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.२० निर्णय क्र.४८० नुसार, सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

१) ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.

२) याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ (पाच) लाख उपलब्ध करुन द्यावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.

३) संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.

४) रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे BS-VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.

५) प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.

६) रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.

७) रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने श्री साई शताब्दी रुग्णवाहीका असे नमुद करण्यात यावे.

उपरोक्त निर्णयानुसार, सदर फेर प्रस्तावास मान्यता मिळणेस बाबतचा प्रस्ताव दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

त्यानुसार, दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, यावर सविस्तर चर्चा होऊन, विषय नं.६ वर प्रशासकीय अडचणी पाहिल्यानंतर पुढे येणाऱ्या अडचणी व कायदेशीर बाबी लक्षात घेता, शिर्डी संस्थानतर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील नोंदणीकृत प्रत्येकी एक या प्रमाणे ५०० सामाजीक संस्थाना (मुंबई सार्वजनिक संस्था कायदा १९५० किंवा सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकासाठी संस्थानतर्फे रु.५.०० लक्ष कायमस्वरुपी अनुदान म्हणून देण्यात यावी. अशी रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणाऱ्या संस्थेने महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे आगाऊ रक्कम (५ लक्ष वजा करुन) भरावी व कागदोपत्री पुर्तता करावी अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर

संस्थानतर्फे रु.५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला / कंपनीला देण्यात यावे. रुग्णवाहिकेची मालकी ही स्वयंसेवी संस्थेची राहील. मात्र त्यांना संस्थानच्या नावाने हमीपत्र द्यावे लागेल, की ते सदर रुग्णवाहिका विकणार नाही व सर्व कार्यवाही संस्थानचे नियमाप्रमाणे करतील, सदर छाननी समितीची शिफारस व्यवस्थापन समिती पुढे ठेवून तदनंतर शासनाकडे पाठवावी, असे ठरले.

**प्रस्ताव**:- ०१) दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतीचे विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता मिळणेस.

०२) मा.छाननी समितीने शिफारस केलेनुसार सदर प्रस्तावास मान्यता मिळणे कामी व त्यानंतर विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यता मिळणेस सादर करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.२२/०८/२०१८ चे मा.छाननी समितीचे सभेतील विषय क्र.०६, निर्णय क्र.४० नुसार, ५०० रुग्णवाहिकांना प्रत्येकी रु.५ लक्ष याप्रमाणे अनुदान देणे करीता रु.२५ कोटी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग/मुख्यलेखाधिकारी)**

---

विषय नं.१५ **Trademark व Copy Right रजिस्टेशन संदर्भात ॲड प्रशांत माळी यांनी Copy Right Office, Delhi येथे सुनावणीकामी उपस्थित राहणेकरीता मागणी केलेल्या खर्चाचे रकमेवर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:-कलम१७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४.

प्रास्ताविक:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०३.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४ अन्वये संस्थानचे अधिकृत वेबसाईट संदर्भात Trademark व Copy Right रजिस्ट्रेशन करणेकामी Cyber Crime क्षेत्रातील नामवंत ॲड. प्रशांत माळी (Cyber Crime/Law, Cyber Security, Privacy Law, Financial Crime & IPR Specialist) मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडून करुन घेणेकामी त्यांना उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

उपरोक्त कार्यादेशानुसार पुढील प्रमाणे संस्थानचे नाव, वेबसाईट, बोधचिन्ह व प्रकाशने इत्यादींचे Copy Right व Trademark संदर्भात कार्यवाही करणेस कळविणेत आलेले आहे.

| Sr No | Nature of Work | Unit Rate | Qty | Amount | Legal Charges | Total Charges |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Trust Name Word mark | 3500 | 2 | 7000 | 4000 | 11,000 |
| 2 | Website Copyright: Shrisaibabasansthan.org Online.sai.org.in | 4000 | 2 | 8000 | 8000 | 16,000 |
| 3 | Sansthan, ITI, Hospital Logo | 3500 | 2 | 7000 | 4000 | 11,000 |
| 4 | Books and Photo | 500 | 125 | 62500 | 39000 | 1,01,500 |
| 5 | Shraddha Saburi Slogan | 3500 | 1 | 3500 | 2000 | 5,500 |
| 6 | Function of Sansthan | 5000 | 3 | 15000 | 8700 | 23,700 |
| 7 | Aarti of ShriSaibaba | 500 | 4 | 2000 | 1000 | 3,000 |
| | | | | | | 1,71,700 + Tax |
| In Words One Lacks Seventy One thousand Seven Hundred + Taxes as Applicable | | | | | | |

उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे अदा करावयाची रक्कम रुपये १,७१,७००/- + टॅक्स ॲड. प्रशांत माळी यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेत आलेली आहे. श्री प्रशांत माळी यांनी याकामी एकुण ५ ट्रेडमार्क, ९ वर्ड मार्क व ६२ कॉपीराईटसाठी Copyright Office, Government of India येथे नोंदणी केलेली आहे. आजमितीस यापैकी एकूण१३पुस्तकांचे Copyright Certificate ची स्कॅन कॉपी ई-मेल द्वारे इकडील विभागास प्राप्त झाली आहे.

संदर्भ क्र.०२ अन्वये, Copyright office Delhi यांचे कडून ॲड.प्रशांत माळी यांना एकूण ०७ पुस्तकांच्या (श्री साईनाथ स्थवन मंजिरी (कन्नड), श्री साईचरित्र (सिंधीअरबी), श्री साईलिलामृत (मराठी), श्री साईनाथ स्थवनमंजिरी (गुजराथी), श्री साईचरित्र (इंग्लिश), श्री साईचरित्र (उर्दू), श्री साईरुद्राध्याय (अध्याय-११)) Copyright संदर्भातील सुनावणीकामी Registrar of Copyrights यांचे दिल्ली येथील कार्यालयात दि.३०ऑगष्ट, २०१८ रोजी उपस्थित राहणेकामी पाठविणेत आलेल्या नोटीसांच्या प्रतीइकडील विभागास प्राप्त झालेल्या आहेत.

संदर्भ क्र.०३ अन्वये ॲड. प्रशांत माळी यांचे कडून प्राप्त झालेल्या ई-मेलद्वारे त्यांनी सदर सुनावणी कामी Copy right office, Delhi येथे उपस्थित राहणेकरीता रक्कम रुपये ८०,०००/- व प्रवास खर्चासाठी रक्कम रुपये२०,०००/-असे एकूण रक्कम रुपये १,००,०००/-मात्र खर्च एकावेळेच्या सुनावणीकामी कळविला आहे. तसेच सदरचे ई-मेलमध्ये त्यांनी रक्कम लवकरात लवकर ट्रान्सफर करणे संदर्भात नमुद केले असून सदर रकमेचा त्यांना याकामी याअगोदर अदा केलेल्या रकमेमध्ये समावेश नाही असेही नमुद केलेले आहे.

परंतू ॲड.प्रशांत माळी यांना संदर्भ क्र.०१ अन्वये देण्यात आलेल्या कार्यादेशा मध्ये नमुद कार्यवाहीसाठी रक्कम रुपये १,७१,७००/-+कर यामध्ये Copy Right व Trademark प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या सर्व रकमेचा समावेश आहे, असे नमुद करणेत आलेले आहे. सबब, ॲड. प्रशांत माळी यांनी मागणी केलेप्रमाणे याकामी एका सुनावणीसाठी रक्कम रुपये१,००,०००/- त्यांना अदा करणे योग्य वाटत नाही.

उपरोक्त प्रमाणे Copy Right व Trademark याबाबतची उर्वरीत कार्यवाही लवकरात लवकर होणेच्या दृष्टीने यासंदर्भात आजपावेतो झालेली व प्रस्तावीत कार्यवाही तसेच Copyright office, Delhi येथे सुनावणीसाठी उपस्थित राहणे करीता त्यांनी कळविलेल्या रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चाबाबत चर्चाकरणे कामीॲड.प्रशांत माळी यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:-प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे Copy Right व Trademark याबाबतची उर्वरीत कार्यवाही लवकरात लवकर होणेच्या दृष्टीने यासंदर्भात आजपावेतो झालेली व प्रस्तावीत कार्यवाही तसेच याकामी त्यांना कार्यादेशाप्रमाणे अदा करणेत आलेली रक्कम हि सर्वसमावेशक असल्याचे कार्यादेशामधे नमुद असल्याने Copyright office, Delhi येथे एका सुनावणीसाठी उपस्थित राहणेकरीता त्यांनी दि.१४.०८.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेल्या रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चाबाबत चर्चाकरणे कामी ॲड.प्रशांत माळी यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणेस मान्यता असावी,हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठरावयानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक इ. छाननी करुन अनुमान :-प्रशासकीय व तांत्रिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- Copy Right व Trademark याबाबतची उर्वरीत कार्यवाही लवकरात लवकर होणेच्या दृष्टीने यासंदर्भात आजपावेतो झालेली व प्रस्तावीत कार्यवाही तसेच याकामी त्यांना कार्यादेशाप्रमाणे अदा करणेत आलेली रक्कम हि सर्वसमावेशक असल्याचे कार्यादेशामधे नमुद असल्याने Copyright office, Delhi येथे एका सुनावणीसाठी उपस्थित राहणेकरीता त्यांनी दि.१४.०८.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेल्या रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चाबाबत चर्चाकरणे कामी ॲड.प्रशांत माळी यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणे कामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

प्रस्ताव:- Copy Right व Trademark बाबतची उर्वरीत कार्यवाही लवकरात लवकर होणेच्या दृष्टीने यासंदर्भात आजपावेतो झालेली व प्रस्तावीत कार्यवाही तसेच याकामी त्यांना कार्यादेशाप्रमाणे अदा करणेत आलेली रक्कम हि सर्वसमावेशक असल्याचे कार्यादेशामधे नमुद असल्याने Copyright office, Delhi येथे एका सुनावणीसाठी उपस्थित राहणेकरीता त्यांनी दि. १४.०८.२०१८ रोजीचे ई-मेलद्वारे कळविलेल्या रक्कम रुपये १,००,०००/- चे खर्चाबाबत निर्णय घेणेस्तव, चर्चाकरणे कामी ॲड.प्रशांत माळी यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविणे कामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.५५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, Trademark व Copy Right रजिस्टेशन संदर्भात ॲड प्रशांत माळी यांना कार्यादेशाप्रमाणे रक्कम रु.१,७१,७००/-+ टॅक्स ॲड. प्रशांत माळी यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेत आलेली आहे.**

**ॲड. प्रशांत माळी यांचे कडून प्राप्त झालेल्या ई-मेलद्वारे त्यांनी सदर सुनावणी कामी Copy right office, Delhi येथे उपस्थित राहणेकरीता रक्कम रुपये ८०,०००/- व प्रवास खर्चासाठी रक्कम रुपये२०,०००/- असे एकूण रक्कम रुपये १,००,०००/-मात्र खर्च एका वेळेच्या सुनावणीकामी कळविला आहे. तो संयुक्तीक वाटत नाही असे सर्व समिती सदस्यांचे मत झाले. याबाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी ॲड.प्रशांत माळी यांचेशी चर्चा करावी त्यानंतर प्रस्तुत विषयाबाबत निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१६** **मे.केपीएमजी, मुंबई यांचेकडून दि.२०.०७.२०१८ रोजीचे प्राप्त झालेले त्यांचे बिलाची रक्कम रु.९,६३,६६०/- अदा होणेच्या पत्रावर निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम१७(१)भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:-०१. दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२९, ०२. दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२, ०३. दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९, ०४.दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८.

प्रास्ताविक :-मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२९ नुसार साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञानसंचालनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कन्सल्टंन्सी कंपनीकडुन अंतिम करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५७२ अन्वये,याकामी M/s. KPMG Advisory Services Private Limited, Mumbaiयांना एक वर्ष कालावधीसाठी जा.नं.एसएसएसटी/आयटी/२५७५/२०१६ दि.२३.०८.२०१६ ने कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मे.के.पी.एम.जी,मुंबई यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये एक वर्ष कालावधीत करावयाच्या कार्यवाहीचे पाच (५) टप्प्यांमध्ये विभागणी करणेत आलेली होती. तसेच, त्यांना देय असलेली रक्कम रुपये ३८,४०,०००/- मात्र समान चार हप्त्यांमध्ये अदा करणेत येईल, असे कार्यादेशामध्ये नमुद करणेत आलेले होते. मे.के.पी.एम.जी,मुंबई यांचेकडून आजपावेतो तीन बीले इकडील विभागास प्राप्त झालेली असून त्यापैकी दोन बीलांची रक्कम रुपये १९,२०,०००/- मात्र त्यांना अदा करणेत आलेली आहे. उपरोक्त संदर्भ क्र.०२ नुसार मे.के.पी.एम.जी,मुंबई यांचेकडून प्राप्त झालेले तृतीय तीमाहीचे बील क्रं. ४०३२८७६, दि.२९.०६.२०१७ अदा करणेत आलेले नाही. मे.के.पी.एम.जी,मुंबई यांना देणेत आलेला कार्यादेश, प्रत्यक्षात झालेले काम व अदा करावयाची रक्कम याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| Stage No | Stages of the consultancy services | Work done | Payment |
|---|---|---|---|
| 01 | Current as IS and TO BE study | Completed | As per work order payment of Rs.38,40,000/- to be made on quarterly basis. M/s KPMG submitted 3 invoices, amount of 2invoices Rs.19,20,000/- among these had been paid by Sansthan. |
| 02 | DPR Preparation & Presentation | Completed | |
| 03 | RFP Preparation & Finalization | Completed | |
| 04 | Bid Management (Publish of RFP to Selection of SI) | Partialy done<br>Tender was published but as per queries received from various bidders tender did not described scope clearly. There was no response to tender even if publishing of 3 corrigendum & appropriate extensions. | |
| 05 | Project Management (Implementation as per schedule, as per technology) | Not Done | |

मे.के.पी.एम.जी,मुंबई यांचेकडून प्राप्त उपरोक्तसंदर्भ क्र.०३ चे पत्राद्वारे सदरच्या बीलाची रक्कम त्यांना अदा करणेबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

मे.के.पी.एम.जी,मुंबई यांना दिलेल्या कार्यादेशाप्रमाणे त्यांनी ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी कार्यान्वीत प्रकल्पाचा अभ्यास, येणा-या अडचणी तसेच भविष्यात करावयाचे बदल/सुधारणा याबाबत अभ्यास करुन आवश्यक निविदेचा मसुदा संस्थानला सादर केलेला होता. त्यानुसार "साईटेक प्रकल्प-२" साठी ई-निविदा दि.२०.०३.२०१७ ते दि.१९.०४.२०१७ अखेर प्रसिद्ध करणेत आलेली होती. परंतू निविदेबाबत विविध

कंपन्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचे प्रमाण जास्त असल्याने सदर ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत तीन वेळेस शुद्धीपत्रक प्रसिद्ध करुन, निविदा सादर करणेस दि.१२.०७.२०१७ अखेर मुदतवाढ देणेत आलेली होती. परंतू सदरचे कालावधीमध्ये ई-निविदा प्रक्रियेस पुरेसा प्रतिसाद मिळालेला नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५९ अन्वये "साईटेक प्रकल्प टप्पा-२" निविदा मा.प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) मार्गदर्शनाप्रमाणे तयार करणेत यावी,असे निर्देश देण्यात आलेले होते. सदर निर्देशान्वये, "साईटेक प्रकल्प टप्पा-२" निविदा प्रक्रियेविषयी मार्गदर्शन घेणेकामी,मा. प्रधान सचिव यांचे कक्षामध्ये मे.केपीएमजी व संस्थानचे आयटी विभाग यांची संयुक्त बैठक दि.२२.०९.२०१७ रोजी आयोजीत करणेत आलेली होती. सदर बैठकीमध्ये मा.प्रधान सचिव यांनी निविदा प्रक्रियेविषयी झालेल्याकार्यवाहीचा आढावा घेऊन प्रक्रियेविषयी काही मार्गदर्शक सुचना केलेल्या होत्या. त्यानुसार मे.केपीएमजी यांनी "साईटेक प्रकल्पटप्पा-०२" निविदा प्रक्रियेविषयक तपशिलवार माहितीचे सादरीकरण मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेसमोर केलेले आहे.

सदरहु सादरीकरण पाहुन असे ठरले की, मे. केपीएमजी यांनी सादरीकरणाचे अनुषंगाने नविन डीपीआर व टेंडर तयार करुन, त्याचा अहवाल सभेसमोर सादर करावा. त्यानंतर मे. केपीएमजी यांचे उर्वरीत बील अदा करणेत यावे. तसेच मे. केपीएमजी यांची मुदत संपुष्टात आलेली असल्यामुळे सदरहु ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन,"साईटेक प्रकल्पटप्पा-०२"साठी नविन कंपनीची नेमणुक होईपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात यावी. "साईटेक प्रकल्पटप्पा-०२"साठी हार्डवेअर,OFCकेबल, टॅली सिस्टीम इंटीग्रेशन, आवश्यक तेथे ईआरपी ओरॅकल सॉफ्टवेअर असा कमी खर्चाचा प्रकल्प अहवाल तयार करावा. सदर प्रकल्प अहवालास शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाची मान्यता घेण्यात यावी व त्यानंतर निविदा प्रक्रिया सुरु करणेत यावी.

मे.केपीएमजी यांना ई-निविदा प्रक्रियेविषयी चर्चा करणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०३.२०१८ रोजीचे सभेमध्ये बोलविणेत आलेले होते. यावेळी सविस्तर चर्चेअंती मे.केपीएमजी यांना प्रकल्प अहवालामध्ये असलेल्या त्रुटी दुरूस्त करुन सुधारीत प्रकल्प अहवाल व निविदा मसुदा लवकरात लवकर सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

मे.केपीएमजी यांनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालामध्ये Oracle Licensesचे तफावतीबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नसल्याचे आढळून आल्याने मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये नाराजी व्यक्त करणेत आली होती, व याबाबत त्यांना वेळोवेळी झालेल्या चर्चेच्या दरम्यान अवगतही करणेत आलेले होते.

मे.केपीएमजी यांचेकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त संदर्भीय पत्रामध्ये Oracle Licensesचे तफावतीबाबत पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे. "Oracle Databaseसाठी Standard Editionखरेदी करणेत आलेले आहे, परंतू प्रत्यक्षात Enterprise Editionचा वापर होत आहे. तसेच Golden Gateचे 13Licenseची आवश्यकता असताना प्रत्यक्षात 04 Licenseखरेदी करणेत आलेले आहेत. वापरात असलेल्या सर्व License चे AMCएप्रिल-२०१७ पासून भरणे बाकी आहे. तसेच सदरची तफावत शोधणे हे त्यांना देणेत आलेल्या कार्यादेशाप्रमाणे कामाचा भाग नाही असे कळविलेले आहे. सदरची तफावत प्रत्यक्षात प्रणाली विकसीत करणारी संस्था अथवा Oracleयांनाच माहित असू शकते, असेही पत्रामध्ये नमुद केलेले आहे. याबाबत त्यांना इच्छूक निविदाधारकाकडून माहिती मिळालेनंतर त्यांनी संस्थानला त्वरीत अवगत केल्याचे पत्रामध्ये नमुद केलेले आहे."

मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे पहिले तीन टप्प्याचे कामकाज (Current as IS and TO BE study, DPR Preparation & Presentation, RFP Preparation & Finalization)पुर्ण झालेले आहे. टप्पा क्रं. ०४ (Bid Management (Publish of RFP to Selection of SI)) अंतर्गतप्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदेविषयी विविध कंपन्यांकडून फार मोठ्या प्रमाणात शंका प्राप्त झाल्याने प्रक्रियेअंतर्गत तीन वेळेस शुद्धीपत्रक प्रसिद्ध करणेत येऊन, सुरवातीस दि.२०.०३.२०१७ ते दि.१९.०४.२०१७ अखेर प्रसिद्ध करणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस दि.१२.०७.२०१७ अखेर मुदतवाढ देणेत आलेली होती. सदरचे कालावधीत ई-निविदा प्रक्रियेस कंपन्यांकडून प्रतिसाद मिळालेला नसल्याने, टप्पा क्रं. ०४ ची कार्यवाही पुर्ण झालेली नाही. सबब, कार्यादेशातील टप्पा क्रं. ०५ चे कार्यवाहीस सुरुवातही झालेली नाही. उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे एकुण रक्कम रु. ३८,४०,०००/- पैकी रक्कम रु. १९,२०,०००/- अदा करणेत आलेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २७५ अन्वये मे.टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलेप्रमाणे प्रकल्पाअंतर्गतची कार्यप्रणालीबाबतची कार्यवाही त्यांचेमार्फत मोफत स्वरुपात करुन घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदर निर्णयान्वये मे.टाटा सन्स यांचेमार्फत M/s.Tata Consultancy Services यांनी प्रत्यक्ष कार्यवाहीस सुरुवात केलेली आहे. सबब, मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशातील टप्पा क्रं. ०४ व ०५ प्रमाणेची कार्यवाही करणेची आवश्यकता भासणार नाही.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मे.केपीएमजी, मुंबई यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे एकुण पाच टप्प्यांपैकी प्रथम ०३ टप्प्यांची कार्यवाही पुर्ण व टप्पा क्रं. ०४ ची कार्यवाही अंशत: पुर्ण झालेली असून टप्पा क्रं. ०५ कार्यवाही झालेली नाही. त्यांना आजपावेतो एकुण रक्कम रु. ३८,४०,०००/- पैकी रक्कम रु. १९,२०,०००/- अदा करणेत आलेली आहे. कार्यादेशात नमुद कार्यवाही पुर्ण न झाल्याने मे.केपीएमजी, मुंबई यांचेकडून दि.२९.०६.२०१७ रोजीचे प्राप्त झालेले तृतीय तीमाहीचे बीलाची रक्कम रुपये ९,६३,६६०/- मात्र त्यांना अदा करणे योग्य वाटत नाही. सबब, संदर्भीय पत्रामध्ये मे.केपीएमजी, मुंबई यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बीलाची रक्कम त्यांना अदा होणेबाबत निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे "साईटेक प्रकल्प-०२" ई-निविदेविषयक कार्यवाही पुर्ण झालेली नाही, तसेच त्यांनी याकामी सादर केलेला प्रकल्प अहवाल व निविदेमध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. मे.केपीएमजी, मुंबई यांना आजपावेतो याकामीचे एकुण रक्कम रु. ३८,४०,०००/- पैकी रक्कम रु. १९,२०,०००/- अदा करणेत आलेली आहे, कार्यादेशामध्ये नमुद केलेलप्रमाणे एकुण ०५ टप्प्यांपैकी ०३ टप्प्यांची कार्यवाही पुर्ण व टप्पा क्रं. ०४ ची कार्यवाही अंशत: पुर्ण झालेली असून, टप्पा क्रं. ०५ ची कार्यवाही झालेली नसल्याने संदर्भीय पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बीलाची रक्कम त्यांना अदा करणे योग्य वाटत नाही, असे नम्र मत आहे. सबब, संदर्भीय पत्रामध्ये मे.केपीएमजी, मुंबई यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बीलाची रक्कम त्यांना अदा होणेबाबत निर्णयघेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- आर्थिक,तांत्रिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाप्रमाणे "साईटेक प्रकल्प-०२" ई-निविदेविषयक कार्यवाही पुर्ण झालेली नाही, तसेच त्यांनी याकामी सादर केलेला प्रकल्प अहवाल व निविदेमध्ये अनेक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. मे.केपीएमजी, मुंबई यांना आजपावेतो याकामीचे एकुण रक्कम रु. ३८,४०,०००/- पैकी रक्कम रु. १९,२०,०००/- अदा करणेत आलेली आहे, कार्यादेशामध्ये नमुद केलेलेप्रमाणे एकुण ०५ टप्प्यांपैकी ०३ टप्प्यांची कार्यवाही पुर्ण व टप्पा क्रं. ०४ ची कार्यवाही अंशत: पुर्ण झालेली असून, टप्पा क्रं. ०५ ची कार्यवाही झालेली नाही. सबब, संदर्भीय पत्राद्वारे त्यांनी मागणी केलेप्रमाणे त्यांचे बीलाची रक्कम त्यांना अदा करणे योग्य वाटत नाही, असे नम्र मत आहे.

**प्रस्ताव:** मे.केपीएमजी, मुंबई यांनी दि.२०.०७.२०१७ रोजीचे पत्राद्वारे मागणी केलेप्रमाणे त्यांचे दि.२९.०६.२०१७ चे बीलाची रक्कम रु. ९,६३,६६०/-त्यांना अदा होणेबाबत निर्णय घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.५५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.केपीएमजी यांना देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये नमुद केलेप्रमाणे एकुण ०५ टप्प्यांपैकी ०३ टप्प्यांची कार्यवाही पुर्ण व टप्पा क्रं. ०४ ची कार्यवाही अंशत: पुर्ण झालेली असून, टप्पा क्रं. ०५ ची कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे करारनाम्यातील टप्प्याप्रमाणे राहिलेले काम व अदा करावयाची रक्कम याबाबत समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी तपासून याबाबत अभिप्राय द्यावेत. त्यानंतर समितीने निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक (सन २०१८-१९) या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य व On Consignment Material खरेदीस व रक्कम रु.५७,६२,०२,५१७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** <u>अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण</u>

<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- नवीन प्रस्ताव</u>

<u>प्रास्ताविक:-</u> श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन २०१८-१९ या वर्षाकरीता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब-ब्लड बँक केमीकल्स, क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एम.आर.आय. फिल्म्स, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओ.टी. मटेरीयल, न्युरो ओ.टी. मटेरीयल, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रशासकीय कार्यालयात सभा बोलविण्यात येऊन Specification निश्चित करण्यात येऊन दि.०२/०४/२०१८ रोजीचे परिपत्रकान्वये दोन्ही रुग्णालयातील वॉर्ड/विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकही वॉर्ड/विभागाची मागणी प्राप्त न झाल्याने दि.१०/०५/२०१८ अन्वये स्मरणपत्र क्र.०१ अन्वये फेर मागणी मिळणेकामी तगादा करण्यात आला होता. त्यानुसार काही वॉर्ड / विभागांनी मागणी सादर केली होती,

परंतु त्यामध्ये देखील काही वॉर्ड/विभागाची मागणी प्राप्त न झाल्याने उर्वरीत वॉर्ड/विभागांना दि.११/०६/२०१८ अन्वये स्मरणपत्र क्र.०२ अन्वये फेर मागणी मिळणेकामी तगादा करण्यात आला. तसेच दि.१८/०६/२०१८ अन्वये साईनाथ सबस्टोअर विभागास स्मरणपत्र क्र.०३ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व वॉर्ड/विभागांची मागणी एकत्रित करुन वार्षिक मागणी देणेबाबत तगादा करण्यात आला होता. त्यानुसार साईनाथ सबस्टोअर विभागाने दि.३०/०६/२०१८ रोजी सर्व वॉर्ड / विभागांची मागणी एकत्रित करुन दिलेली आहे. तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागाची मागणी दि.२४/०७/२०१८ रोजी प्राप्त झालेली आहे. म्हणजेच खरेदी विभागाने दि.०२/०४/२०१८ रोजीचे परिपत्रकान्वये वार्षिक मागणी केलेली आहे, परंतु ३-४ महिन्यांचा कालावधी मागणी प्राप्त होण्यासाठी लागलेला आहे.

खरेदी विभागाने स्टोअर विभागातील वेगवेगळया प्रकारच्या हेड असणा-या फार्मासिस्टकडून वार्षिक मागणीकामी दैनंदिन खपाचा विचार करुन मागील दिड वर्षाच्या औषधे / सर्जिकल साहित्याच्या वापरावरुन वार्षिक मागणी ठरविण्यात आलेली आहे. त्यामध्ये त्यांनी केलेल्या मागणीनुसार व ज्या औषधांची रुग्णालयात आवश्यकता आहे, अशा औषधांची मागणी केलेली आहे, तर काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव / शिल्लक असलेला साठा यांचा विचार करुन तसेच डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नवीन औषधे / सर्जिकल साहित्य इत्यादींचा यादीत समावेश करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे सर्व बाबींचा विचार करुन केलेल्या मागणीचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **तपशिल** | **सन २०१८-१९ करीता मागणीप्रमाणे अंदाजे खर्च रु.** |
|---|---|---|
| १ | गोळ्या (Tablet) | 47821627.56 |
| २ | इंजेक्शन व आय.व्ही.फ्ल्युड्स (Injection & I.V.Fluids) | 82812739.87 |
| ३ | लिक्वीड ओरल्स (Syrup) | 3157248.23 |
| ४ | मलम (Ointment) | 717197.27 |
| ५ | आय, इअर व नोझल ड्राप्स (Drops) | 1299801.79 |
| ६ | डेंटल मटेरीयल (Dental Material) | 650145.63 |
| ७ | क्ष-किरण, सि.टी.स्कॅन, एमआरआय फिल्म्स व इतर साहित्य | 45409781.14 |
| ८ | लॅब केमीकल्स (श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा हॉस्पिटल, ब्लड बँक) | 70042924.51 |
| ९ | Miscellaneous (इतर किरकाळ साहित्य) | 4121875.85 |
| १० | ओ.टी. आणि इतर सर्जिकल मटेरीयल | 60063721.64 |
| ११ | कॅथलॅब, कार्डीयाक ओ.टी. व परफ्युजनीस्ट मटेरीयल व सर्जिकल साहित्य | 84054211.10 |
| १२ | डायलेसीस युनीट | 2471402.86 |
| १३ | न्युरो ऑपरेशन थिएटर विभाग सर्जिकल साहित्य | 1940067.73 |
| १४ | आयुर्वेदीक औषधे | 14152821.69 |
| १५ | कॅटगट ॲन्ड सुचर्स मटेरीयल (श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील सर्व ओ.टी.) | 57486949.62 |
| १६ | On Consignment Basis Items (Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices / Ortho & Neuro Surgery Items etc.) | 100000000.00 |
| | **एकुण रक्कम रु.-** | **57,62,02,516.50** |
| | **पुर्णांकित एकूण रक्कम रु- .** | **57,62,02,517.00** |

सदरची मागणी तयार करताना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत-

०१) दोन्ही रुग्णालयात वाढ झालेली रुग्णांची संख्या, शस्त्रक्रियांची संख्या इत्यादीचा तपशिल खालीलप्रमाणे-

श्री साईनाथ रुग्णालयातील अंतरुग्ण व बाहयरुग्णांची संख्या-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09 | सन 2009 -2010 (01.04.09 ते 31.03.10 | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.1 | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.1 | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.1 | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) | सन 2017-2018 (01.04.17 ते |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ) | ) | | | 3) | 4) | 5) | | 31.03.18) |
| ०१ | अंतर्रुग्ण संख्या | 9365 | 11573 | 11639 | 11900 | 15220 | 14075 | 12279 | 8628 | 15945 |
| ०२ | बाहय रुग्ण संख्या | 240890 | 223844 | 261321 | 260414 | 303668 | 298226 | 297184 | 213134 | 341402 |

श्री साईबाबा रुग्णालयात कॅथलॅब ऑपरेशन थिएटर,दोन्ही कार्डीयाक ऑपरेशन थिएटर, जनरल ऑपरेशन थिएटर, न्युरो ऑपरेशन थिएटर, आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तसेच सि.टी.स्कॅन, एमआरआय,२-डी इको, डायलेसीस हे विभाग सुरु होऊन जवळजवळ १०-१२ वर्ष झालेले आहेत. तेथे आतापर्यंत झालेल्याशस्त्रक्रियांचा / तपासण्यांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ. नं. | तपशिल | सन 2008 - 2009 (01.04.08 ते 31.03.09) | सन 2009 - 2010 (01.04.09 ते 31.03.10) | सन 2010 - 2011 (01.04.10 ते 31.03.11) | सन 2011 - 2012 (01.04.11 ते 31.03.12) | सन 2012 - 2013 (01.04.12 ते 31.03.13) | सन 2013 - 2014 (01.04.13 ते 31.03.14) | सन 2014 - 2015 (01.04.14 ते 31.03.15) | सन 2015 - 2016 (01.04.15 ते 31.03.16) | सन 2017 - 2018 (01.04.17 ते 31.03.18) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॅथलॅब प्रोसिजर | 4616 | 4922 | 5482 | 7332 | 9254 | 9805 | 5915 | 4577 | 5530 |
| ०२ | ह्दय शस्त्रक्रिया | 721 | 1023 | 1216 | 1491 | 1579 | 1700 | 1716 | 1665 | 1380 |
| ०३ | ऑप्थॅलमिक शस्त्रक्रिया | 289 | 542 | 699 | श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतर | | | | | |
| ०४ | आर्थोपेडीक शस्त्रक्रिया | 710 | 728 | 763 | 817 | 925 | 1030 | 936 | 548 | 1134 |
| ०५ | जनरल शस्त्रक्रिया | 817 | 1535 | 1664 | 2249 | 2221 | 1984 | 1565 | 1036 | 1235 |
| ०६ | न्युरो शस्त्रक्रिया | 253 | 489 | 571 | 611 | 586 | 337 | 383 | 565 | 680 |
| ०७ | युरोलॉजी शस्त्रक्रिया | 328 | 397 | 440 | 548 | 570 | 615 | 643 | 556 | 552 |
| ०८ | सि.टी.स्कॅन | 8091 | 8024 | 9995 | 9656 | 9546 | 8780 | 7827 | 7851 | 8887 |
| ०९ | एम.आर.आय. | 7943 | 8777 | 10060 | 15596 | 13050 | 13317 | 13244 | 12084 | 16194 |
| १० | 2 - डि इको | 6402 | 6785 | 8793 | 11960 | 14113 | 16591 | 15692 | 14971 | 16517 |
| ११ | डायलेसीस | 1777 | 1850 | 1960 | 2078 | 2516 | 2337 | 2611 | 2162 | 2900 |
| १२ | अंतर्रुग्ण संख्या | 11147 | 12689 | 13489 | 15533 | 17266 | 17226 | 12792 | 11033 | 13267 |
| १३ | बाहयरुग्ण संख्या | 66543 | 73068 | 102478 | 130105 | 147147 | 153034 | 146526 | 127668 | 162927 |
| | **एकुण संख्या** | **109890** | **120986** | **150213** | **189153** | **207940** | **226756** | **209850** | **184716** | **224293** |

**विभागाचे अभिप्राय** - श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात खालील सर्व बाबींचा विचार करता रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे औषधे / सर्जिकल साहित्यांचा सुध्दा खप वाढणार आहे.

१) दि.०१/०१/२०१७ ते दि.३०/०६/२०१८ या कालावधीतील झालेला खप, सध्या औषध भांडारात असलेला औषध साठा, त्याचा होणारा खप तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील रुग्णांची संख्या देखील दिवसेंदिवस वाढू शकते.

२) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानमध्ये कंत्राटी पध्दतीने ५ वर्षे पुर्ण झालेले कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठी रुग्णसेवा पुर्णपणे मोफत करणेत आलेली आहे तर ज्या कंत्राटी कर्मचा-यांना ५

वर्षे पुर्ण झालेली नाहीत असे कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबित यांचेसाठीविशिष्ट रक्कमेपर्यंत उपलब्ध असलेली औषधे व सुविधा देणेबाबत निर्णय झालेला आहे व त्याची अंमलबजावणी देखील चालू झालेली आहे. त्यामुळे रुग्णांसाठी लागणा-या औषधांमध्ये वाढ सुचविण्यात आलेली आहे.

३) महाराष्ट्र शासनाने दि.१६/११/२०१३ पासून सुरु केलेल्या जीवनदायी आरोग्य योजना, राजीव गांधी आरोग्य योजना तसेच सध्याचे महात्मा फुले आरोग्य योजनेअंतर्गत श्री साईबाबा रुग्णालयात होणा-या शस्त्रक्रिया कराव्या लागतात व त्यामध्ये रुग्णांना ॲडमिट आहे तोपर्यंत व डिसचार्ज दिल्यानंतर पुढील १० दिवसांची औषधे मोफत द्यावी लागतात. तसेच पुढील तपासणीसाठी रूग्ण आल्यानंतर त्यास ३ महिने औषधे मोफत द्यावी लागतात. त्यामुळे देखील औषधांचे मागणीत खूपच वाढ झालेली आहे. त्यासाठी देखील अंदाजे रुग्णांची संख्या विचारात धरुन अंदाजे औषधे मागणी केलेली आहे. सदर मागणी प्रत्यक्ष आलेल्यारुग्णानुसार कमी जास्त होऊ शकते.

४) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा, मायक्रोबायोलॉजी, हिस्टोपॅथोलॉजी इत्यादी विभागासाठी लागणारे केमिकल्स यांचा गतवर्षाचा झालेला खप,महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रुग्णांच्या तपासण्या इत्यादी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात वाढणारी संभाव्य रुग्णांची संख्या यांचा विचार करुन मागणी सुचविलेली आहे.

५) दोन्ही रुग्णालयामध्ये होणारी विविध प्रकारची शिबिरे, संस्थानतर्फे राबविले जाणारे इतर उपक्रम, महामार्गावरील अपघात इत्यादीमुळे वाढणारी गर्दी व महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत दाखल होणारे वाढत्या रुग्णांची संख्या (उदा. किडनी स्टोन शिबिरे, उत्सव, कार्डीयाक वर्कशॉप, आध्यात्मिक शिबिरे, पालखी सोहळा इत्यादी).

६) श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालय मिळून १३ ऑपरेशन थिएटर कार्यान्वित आहेत. सदरचे थिएटरमध्ये होणा-या विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व त्यासाठी लागणारे सर्जिकल साहित्य इत्यादीचा विचार करण्यात आलेला आहे. श्री साईनाथ रुग्णालयात दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ अखेर १०१३९ तर श्री साईबाबा रुग्णालयात दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीत १०५११ इतक्या शस्त्रक्रिया झालेल्या आहेत.

७) विविध प्रकारचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर इत्यादी महागडी साहित्य ही On Consignment Basis वर खरेदी करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे. ते साहित्य रुग्णांना वापरल्यानंतर पुरवठा धारकांचे बील अदा करत असतो. त्यासाठी दरमहा गतवर्षाचा अनुभव विचारात घेऊन अंदाजे रक्कमेची तरतूद केलेली आहे. मागील वर्षाच्या टेंडरमध्ये खरेदी नियमानुसार सर्व Product हे निम्नतम दराने घेण्यात आलेले होते. प्रत्यक्षात बघता सदरचे दर हे बाकीच्या कंपनीचे दरापेक्षा ब-याच ठिकाणी निम्यानी कमी आहे. त्यामुळे सोबतच्या तक्त्यात औषधांची रक्कम धरतांना गतवर्षातील मंजूर दराने संस्थानने जी औषधे खरेदी केलेले आहे त्या दरावर १० टक्के साधारणता दर वाढ करणे आवश्यकतेनुसार वाढ करुन व ज्या Product करीता दर प्राप्त झालेले नाहीत त्या Productकरीता ऑनलाईन सध्याचे बाजारभावाप्रमाणे दर घेऊन केवळ हिशोबासाठी अंदाजे दर धरणेत आलेले आहे. प्रत्यक्षात निविदेमध्ये प्राप्त होणारे दर हे हयापेक्षा वेगळे येण्याची शक्यता आहे. सध्या औषधांचे बाबतीत Branded औषधे जरी खरेदी करावयाचे ठरले तरी त्यांच्या उत्पादीत कंपन्याचा विचार करता त्यांचे कमीत कमी ५० ते ६० Brand असलेल्या कंपन्याचे एकाच Content ची औषधे आज बाजारात उपलब्ध आहे, त्यांचे खरेदी किंमतीचा विचार करता त्यामध्ये बरीच तफावत आढळते.त्यामुळे औषधे खरेदीकामी जर एखादे कंपनीचे दर धरुन खरेदी केल्यास आपणास निविदेव्दारे मिळणारे दर व आपले निविदासाठी घेतलेले अंदाजे दर यातील तफावत पाहता खरेदी प्रक्रियेस अडथळा येईल त्यामुळे औषधे खरेदी करता येणार नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होऊन हॉस्पिटलला लागणारे औषधे उपलब्ध होणार नाही.

यासाठी प्राप्त दर व आपण निविदा खर्चामध्ये दिलेल्या दरामध्ये तफावत येणार हे विचारात धरुनच खरेदी करावेलागणार आहेत. सध्या एकच Content असलेल्या औषधांच्या वेगवेगळया कंपन्यांचे दर उदाहरणार्थ सादर केलेले असून ते खालीलप्रमाणे –

1) Tab. Deplat CV 10 mg –

USV – 84.76
Mankind – 71.25
Sun – 48.00
Intas – 62.00

2) Tb. Telma 20 mg –

USV – 6.93
Aristo – 4.99

Ezis – 6.93
Mankind – 3.26
Lupin – 6.68

3) Inj. Supacef –

Macledoes – 226.00
Lupin – 226.00
GSK – 260.00
Fountil – 260.00
Glenmark – 349.00

4) NIV Mask –

BMC – 1850.00
Philips – 4000.00
Medical Bulkbag – 2899.00
BMC – 4700.00
Haffrichfer – 6500.00

5) I.V.Set –

Oyster – 8.70
Poly Medicure – 8.70
Romson – 8.97
B.Braun – 15.50

त्यामुळे औषधे खरेदी करताना अंदाजे खर्चाचा विचार करता येणार नाही.

सन २०१३-१४ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/१०/२०१३ रोजीचे आदेशान्वये सदरचे खरेदीकामी प्राप्त होणा-या निविदांवर अंतीम निर्णय घेणेकरीता सरकारी सहा.वकील श्री. पी. पी. मोरे, जिल्हा शल्यचिकीत्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक यांची समिती गठीत करुन सदर समितीने औषधे खरेदीची प्रक्रिया पूर्ण करावी असे आदेश पारीत केले होते, त्यानुसार सन २०१३-१४ या वर्षाकरीता लागणारी औषधे खरेदी करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ या वर्षाकरीता आवश्यक असणा-या वार्षिक औषधे खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने दि.१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये निविदाधारकांकडून निविदा मागवितांना प्रत्येक आयटमची MRP मागवून त्यानंतर खरेदीची कार्यवाही करणेस मान्यता मिळालेली आहे.

तथापि सन २०१७-१८ मध्ये औषधे खरेदीकामी कोणतीही कमिटी स्थापन करण्यात आलेली नव्हती. सन२०१७-१८ चे निविदामध्ये खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार निम्नत्तम दराने खरेदी करणेत आलेली होती, त्यामध्ये हलक्या प्रतीच्या कंपन्यांना भाग घेता येऊ नये म्हणून ठराविक Turnover व Standard Certificates ची मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार ज्या कंपन्याचा Turnover आपल्या मागणीप्रमाणे नाही व ज्या कंपन्यांकडे आपल्या मागणीप्रमाणे Certificatesनाहीत, अशा कंपन्यांना अपात्र करुनच निम्नत्तम दराने खरेदी करणेत आलेली होती, परंतु त्यामध्ये वापरणा-या डॉक्टर यांना पाहिजे असलेल्या कंपन्यांचे औषधे न मिळाल्यामुळे खरेदी विभागाला ब-याच डॉक्टरांचा रोष सहन करावा लागलाआहे.

औषधे वेळोवेळी नियमित उपलब्ध होणेचे दृष्टीने खालील कार्यपध्दत अवलंबविण्यात यावी असे नम्र मत आहे-

१) महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पुरविण्यात येणा-या औषधांबाबत –

महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पेशंटला औषधे / सर्जिकल साहित्य पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी रुग्णालयाची असल्याने त्यांना ती औषधे कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन दयावी लागतात. कधी-कधी त्या मटेरीयलचा वार्षिक औषध खरेदीमध्ये समावेश नसतो किंवा तर ते मटेरीयल फेर कोटेशन/ निविदा मागवून खरेदीची कार्यवाही चालू असते अथवा त्याचा पुरवठाधारकाने वेळेवर पुरवठा न केल्याने तुटवडा भासतो. अशा वेळी महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पेशंटचे नातेवाईक औषधांसाठी वरिष्ठांकडे तथा वर्तमान पत्राव्दारे तक्रार नोंदवितात तसेच महात्मा फुले योजनेच्या वेबसाईटला देखील तक्रारी नोंदवितात, अशा तक्रारी प्राप्त झाल्यामुळे याआधी काही रुग्णालयामध्ये सदरहू योजनेची मान्यता रद्द करणेत आलेली आहे. त्यासाठी काही औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून सदर औषधे नजीकच्या पुरवठा धारकाकडून वाजवी दराने तातडीने मा.वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात खरेदी करुन देता येईल.

२) औषधे अतिरीक्त खरेदीबाबत –

नवीन नियमावलीनुसार वार्षिक औषधांचे पुरवठा आदेश दिल्यानंतर पुढील सहा महिन्यातच अतिरिक्त औषधे खरेदी करता येणार आहे. परंतु ब-याच वेळा वार्षिक औषधे खरेदीचा कालावधी संपून पुढील वार्षिक खरेदीस काही तांत्रिक कारणास्तव विलंब लागल्याने वार्षिक औषधांची वर्षाची मागणी संपते यासाठी कमीत कमी एक वर्षाचा कालावधी पुर्ण होऊन जातो. तसेच शिबीरे व कधी कधी संसर्गजन्य रोगांची लागण झाल्यामुळे सुध्दा वार्षिक मागणी संपून अतिरीक्त मागणी करावी लागते. तेंव्हावार्षिक खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभेने दिलेल्या रक्कमेच्या मंजूरीतंर्गत ती औषधे / सर्जिकल साहित्य मंजूर दराने अतिरिक्त खरेदीस मंजूरी मिळावी.

३) सन २०१८ – २०१९ च्या वार्षिक खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या वार्षिक मागणीमध्ये ब-याशा डॉक्टरांनी Branded Company तसेच Specific Company च्या औषधांची मागणी केली आहे. त्यामुळे Branded औषधेच खरेदी करणेत यावीत.

४) शिबीरासाठी लागणारे औषधे / सर्जिकल साहित्याबाबत – संस्थानव्दारे शिर्डी परिसरात येवला, मनमाड, राहुरी, वैजापूर व इतर ठिकाणी महिना / दोन महिन्यांत प्राथमिक तपासणी शिबिराचे आयोजन केले जाते. तसेच रक्तदान शिबिर व युरोलॉजी / ऑप्थल कॅम्पचे आयोजन करण्यात येते. त्यासाठी लागणारे औषधे ही वार्षिक मागणीतील औषधांमधूनच पुरविण्यात येतात. त्यामुळे सुध्दा वार्षिक मागणीवर परिणाम होतो, तेंव्हाअतिरीक्त खरेदीकामी मंजूर बजेट रक्कमेतून खरेदीस मान्यता मिळाल्यास ते पुरविणे शक्य होईल व जी औषधे आपल्या पुरवठा आदेशामध्ये नसतील ती औषधे वाजवी दराने तातडीने मा.वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात खरेदी करता येईल.

५) संसर्गजन्य रोगांचे प्रादुर्भाव वाढल्याने पुरविण्यात येणा-या औषधांबाबत –

ब-याच वेळा डेंग्यु, मलेरीया, गोचीड ताप, चिकनगुण्या, स्वाईन फ्ल्यु तसेच रक्तपेशी वाढणे अथवा कमी होणे या प्रकारचे संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पेशंटची वाढती संख्या त्यांच्या करण्यात येणा-या Lab Test तसेच त्यांचे उपचारासाठी लागणारे औषधे यांची मागणी वार्षिक मागणीच्या दुप्पट / तिप्पट असते तेंव्हा याकामी सुध्दा अतिरिक्त खरेदीकामी नवीन खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंजूर बजेटच्या रक्कमेतून ती खरेदी करण्यास मान्यता असावी तसेच काही मटेरीयल हे वार्षिक मागणीमध्ये नसते तेंव्हा ते मा. वैद्यकीय संचालक यांचे अधिकारात तातडीने वाजवी दराने खरेदी करुन देता येईल.

६) हिमोफिलिया फॅक्टर खरेदीकामी मागील तीन वर्षापासून निविदा प्राप्त न झाल्याने आपण Factor VIII हे हिमोफिलिया सोसयटीकडून रु.१०/- प्रती युनीटप्रमाणे खरेदी करत आहोत, तसेच मागील वर्षात आपणास दर प्राप्त न झाल्याने रु.१०/- प्रती युनीटप्रमाणे उपलब्ध कंपनीचे खरेदीस मान्यता मिळालेली आहे, त्यानुसार सन २०१८-१९ मध्ये जर Factor VIII कामी दर प्राप्त झाले नाही तर ते मागील प्रमाणे खरेदीस मान्यता असावी.

७) शासन कर प्रणालीमध्ये बदल झाल्यास –

शासन नियमावलीनुसार औषधे / सर्जिकल साहित्याकमी कर प्रणालीत वाढ / कमी झाल्यास त्याकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मंजूरीने त्याबाबत पुरवठाधारकांना पत्र पाठवून कर प्रणालीप्रमाणे झालेला बदल अंमलात आणून त्याप्रमाणे बिले वित्त विभागामार्फत अदा करण्यात येतील.

८) संस्थान कर्मचा-यांना तसेच त्यांचे अवलंबितांना पुरविण्यात येणा-या औषधांबाबत –

संस्थानचे कायम / कंत्राटी कर्मचारी व त्यांचे अवलंबितास आपले स्टोअर विभागामार्फत लागणारे औषधे पुरविले जातात. परंतु, जे औषधे आपणाकडे शिल्लक नसतात ती औषधे बाहेरुन विकत घेऊन वैद्यकीय बील परताव्याव्दारे त्यांना ती रक्कम परत भेटते. त्यामध्ये बाहेरुन घेतलेल्या औषधांसाठी MRPदर आकारले जातात. त्यामुळे जास्तीची रक्कम द्यावी लागते. त्याकरिता वार्षिक खरेदीमध्ये संस्थानचे कर्मचा-यांना लागणा-या सर्व औषधांची मागणी करण्यात येऊन कर्मचा-यांना शक्यतो आपणाकडे असलेले औषधे डॉक्टारांनी लिहून द्यावीत म्हणजे संस्थान कर्मचा-यांना औषधांची उपलब्ध होऊन वैद्यकीय बील परतावा देणेकामी संस्थानचे आर्थिक नुकसानीचे प्रमाण कमी करता येईल.

९) औषधे वापरणारे डॉक्टर/तंत्रज्ञ यांच्या शिफारसीन्वये मागणी करण्यात येते, परंतु ब-याच वेळी असा अनुभव येतो की, सदर शिफारसी केलेले डॉक्टर / तंत्रज्ञ सोडून गेल्यास ते औषधांचा वापर बंद केला जातो तसेच काही औषधांबाबत मागणी वर्षाचा खप पाहून मागणी केले जाते प्रत्यक्षात चालू वर्षात त्या औषधांचा खप इतका कमी होतो की, ते मटेरियल कधी – कधी मुदतबाह्य सुध्दा होते अथवा पुरवठाधारक परत घेत नाही त्यामुळे संस्थानचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपणाकडे बरेच पुरवठाधारक संस्थान खातर सेवाभावी म्हणून दर भरतात परंतु, त्यांचे मटेरियल न वापरताच त्यांना परत केल्यामुळे त्यांचे नुकसान होते त्यामुळे बरचसे पुरवठाधारक आपणाकडे निविदा भरण्यास तयार होत नाही. काही डॉक्टर / तंत्रज्ञ हे Specific कंपनीच्या औषधांची मागणी करतात त्यामुळे सुध्दा आपणाकडील औषध साठ्यांचा वापर न झाल्याने ते पुरवठाधारकास परत करावे लागते अथवा पुरवठाधारकांने परत न घेतल्यास ते मुदतबाह्य होऊन संस्थानचे आर्थिक नुकसान होते

तेंव्हा सदर कामी संस्थानचे डॉक्टर / तंत्रज्ञ यांना प्रथमतः औषध भांडारमधील असलेला साठ्यांचा वापर करावा जेणेकरुन आपणास पुरवठाधारकास औषध परत करणे अथवा औषध मुदतबाह्यता टाळता येऊन संस्थानचे आर्थिक नुकसान टाळता येईल.

१०) काही पुरवठाधारक मटेरियल वेळेत पुरवठा न केल्यामुळे सदर मटेरियल हे संस्थान नियमाप्रमाणे इतर पुरवठाधारकांकडून जास्तीची रक्कम अदा करुन खरेदी करावे लागते तेंव्हा जास्तीची रक्कम त्यांचे सुरक्षा रक्कमेतून किंवा चालू बिलांमधून वसूल करण्यात येत असते.

११) जर एखादे कंपनीस पुरवठा आदेश दिला व त्या कंपनीने पुरवठाकरणेकामी एखाद्या नजीकच्या विक्रेतामार्फत पुरवठा करणेकामी मान्यता घेतली असता कधी कधी सदर कंपनीधारक काही तांत्रिक कारणामुळे दुस-या विक्रेत्यांकडून पुरवठा करतो. त्यासाठी लागणारी मंजुरी ही मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने देण्यात यावी कारण याव्दारे संस्थानचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नसून त्याव्दारे मटेरिअल मागविण्यास अडचण येणार नाही.

१२) ब-याच वेळेस काही मटेरिअल हे पुरवठा आदेशाच्या मागणी पेक्षा जास्त प्राप्त होते अथवा काही मटेरिअल हे पुरवठा आदेश नसतानाही कंपनीकडून पाठविले जाते. त्याबाबत पुरवठा धारकांना वारंवार फोन तथा पत्र करुन सुध्दा पुरवठा धारक परत घेऊन जात नाही कधी-कधी ते मटेरिअल आपणाकडे पडून मुदतबाह्य सुध्दा होते. यामध्ये संस्थानचा कोणताही संबंध नसताना सदर बाबत लेखापरिक्षण मध्ये मुद्दा उठविला जातो. तेव्हा सदर कामी प्राप्त मटेरिअल हे जर पुरवठाधारकांनी परत नेले नाही तर ते मुदतबाह्य झाल्यास ते विहीत पध्दतीने नष्ट करण्यास वैद्यकीय संचालक यांना कार्यवाही करण्यास अधिकार देण्यात यावेत.

१३) औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्यासाठी बाहेरील राज्यातील वर्तमान पत्रात ई-निविदेची जाहिरात देण्यात येऊन ई-निविदेव्दारे खरेदी करण्यात यावी.

१४)

| Sr.No. | Name of Item Head | Quotation Items | Tender Items |
|---|---|---|---|
| 1 | Ayurvedic | 210 | |
| 2 | Miscellaneous | 64 | |
| 3 | Neuro OT Material | 26 | |
| 4 | Ointment | 23 | |
| 5 | Dental | 76 | |
| 6 | Drop | 34 | |
| 7 | Syrup | 50 | |
| 8 | Dialysis | 7 | 3 |
| 9 | Cardiac & Cathlab Material | | 338 |
| 10 | X-ray | | 11 |
| 11 | Injection | | 170 |
| 12 | Tablet | | 214 |
| 13 | Laboratory Material | | 298 |
| 14 | OT & Other Surgical Material | | 457 |
| 15 | Suture Material | | 183 |
| 16 | On Consignment Material | | 303 |
| | Total | 490 | 1977 |
| | | | |
| | Total Medicine Purchase Items - | | 2164 |
| | Total On Consignment Items - | | 303 |
| | | Total All Item - | 2467 |

उपरोक्त मागणी पाहता अ.नं.१ ते ७ मधील ४८३ आयटम व अ.नं.८ मधील ७ आयटम असे एकुण ४९० आयटमकरीता कोटेशन मागणी केलेली आहे. सदर मागणी ही नविन शासन खरेदी नियमावलीनुसार रु.३,००,०००/- पर्यंतचे खरेदीस असणा-या तरतुदीनुसार कोटेशन्स मागवून खरेदी करता येतील. तसेच मागील वर्षीच्या अनुभवावरुन सदरचे औषधे / सर्जिकल साहित्य आपण ई-निविदा व्दारे मागविण्यात आले होते, परंतु त्यातील ब-याचश्या मटेरीयलकरीता ३-४ वेळा ई-निविदा प्रक्रिया राबवून सुध्दा सदरचे औषधे / सर्जिकल

साहित्यासाठी दर प्राप्त झाले नव्हते आणि सदर औषधे / सर्जिकल साहित्याची खरेदी नझाल्यामुळे त्याकाळात पेशंटची फारच गैरसोय होऊन डॉक्टरांचा तसेच स्थानिक वृत्तपत्रांचा रोष सहन करावा लागला होता. त्यानंतर आपण मागील वर्षी सदरचे औषधे / सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करुन दिलेले आहेत. तसेच सदर औषधे / सर्जिकल साहित्यांची वार्षिक खरेदी किंमत पाहता निविदाधारकांस सुध्दा निविदा फी व अनामत रक्कम भरणे शक्य होत नसल्याने ई-निविदा प्रक्रियेस आवश्यक प्रतिसाद मिळत नसल्याने सदरहू औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी वारंवार ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागते.

तेंव्हा वरील सर्व बाबींचा विचार करता आणि हॉस्पिटलची दैनंदिन गरज पाहता रु.३,००,०००/- लाखापर्यंतचे  औषधे / सर्जिकल साहित्याकामी नविन खरेदी नियमावलीनुसार कोटेशन मागणी करुन खरेदी करता येईल. त्यासाठी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात संस्थानचे संकेतस्थळावर टाकण्यात येईल तसेच जास्त खपाच्या वर्तमान पत्रात जाहिरात देता येईल आणि जास्तीत जास्त पुरवठाधारकांना ई-मेल तथा पत्राव्दारे कोटेशन्स मागणी करता येऊन आपले डॉक्टरांना त्याबाबत माहिती देण्यात येऊन त्यांचेकडे येणा-या प्रतिनिधींना माहिती देता येईल, तसेच उपरोक्त तक्त्यातील ४९० आयटमकरीता स्वंतत्रपणे कोटेशन न मागविता एकत्रित कोटेशन मागविण्यास व पुरवठा आदेश देतेवेळेस एकत्रित पुरवठा आदेश देण्यास प्रस्तावित केले आहे.

तसेच Tablet, Injection, OT & Other Material, Cardiac & Cathlab Material, Laboratory Material, Consignment Material इत्यादी पार्टसाठी याआधी चांगला प्रतिसाद मिळालेला असून त्यामध्ये प्रत्येक पुरवठाधारकाकडे त्या त्या पार्टमधील जास्तीत जास्त मटेरीयल असते. त्यामुळे त्यामध्ये १९७७ औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी ई-निविदा करणेबाबत तसेच सदरच्या ई-निविदा प्रत्येकी दोन पार्टसाठी एकावेळेस घेण्यात येऊन त्यासाठी ८ दिवसांचे अंतर ठेवून ई-निविदा काढण्याचे प्रस्तावित करणेत आलेले आहे.

तसेच कोटेशन मागणी करतेवेळेसच्या अटी व शर्ती तसेच ई-निविदा मागवितेवेळेस Turnover व Certificate तसेच अटी व शर्ती अंतिम करण्यासाठी संबंधित कमिटीमध्ये निर्णय घेता यईल.

१५)	सदर खरेदीमध्ये औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामीची स्वतंत्र ई-निविदा तर On Consignment Basis वरील Stent / Valve / Balloon / Pacemaker / Devices इत्यादी आयटमची स्वंतत्र ई-निविदा करण्यात यावी. तसेच सन २०१५ पर्यंत On Consignment Material बाबत प्राप्त निविदांन्वये सर्व निविदाधारकांचे दर स्विकारण्यात येऊन त्यांचे वर्गीकरण राजीव गांधी पेशंट तथा Paid Patient मध्ये करण्यात येऊन वापरण्यात येत होते. म्हणजेच प्रत्येक मटेरीयल खरेदीकामी १ पेक्षा जास्त पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात येत होता. त्यामुळे On Consignment Basis मटेरीयलचा कधीच तुटवडा भासत नव्हता, तसेच पेशंटची गैरसोय टाळता आलेली आहे. परंतु मागील तीन वर्षात शासन नियमावलीप्रमाणे फक्त निम्नत्तम दरधारकांचे दर स्विकारुन एकाच पुरवठा धारकांस पुरवठा आदेश देण्यात येतो. त्यामध्ये ब-याच वेळा प्राप्त मटेरीयल मध्ये सर्व साईजेस नसतात. तसेच पुरवठाधारकांकडून मटेरीयलच्या उपलब्धतेबाबत मुद्दा वारंवार उठतो तसेच सध्या एकाच पुरवठाधारकांस दिलेल्या पुरवठा आदेशामुळे त्याच्या साईजेस च्या उपलब्धतेमुळे ब-याच वेळा पेशंटची गैरसोय होत असून डॉक्टरांच्या व स्थानिक वृत्तवाहिन्याच्या रोषांस सामोरे जावे लागते. त्यामुळे सर्व On Consignment Basis मटेरीयल तथा दैनंदिन खरेदीमधील Oxygenator खरेदीकामी कमीत कमी दोन पुरवठाधारकांकडून घेण्यात यावे व समप्रमाणात वापरण्याची जबाबदारी ही संबंधित डॉक्टर यांना देण्यात यावी असे मत आहे. त्यामुळे पेशंटची गैरसोय व डॉक्टरांचा रोष तथा वृत्तवाहिन्यामुळे संस्थानची बदनामी टाळता येईल.

१६)	बरेचसे लॅब मटेरीयल तथा ओटी.मधील सर्जिकल साहित्य हे आपण पुर्वी खरेदी केलेल्या कंपन्याच्या मशिनसाठी लागतात व ते पण त्याच कंपनीचे खरेदी करावे लागते म्हणजेच त्यासाठी Monopoly आयटम म्हटले तरी चालेल त्यासाठी फक्त एकच निविदा प्राप्त होते त्यामुळे त्या प्राप्त एकाच निविदेचा विचार होऊन त्याची बाजारभावाशी तुलना करुनच ते मटेरीयल खरेदी केल्यास पेशंटची होणारी गैरसोय टाळता येईल.

१७)	सन २०१८-१९ मधील खरेदी प्रक्रिया ही सन २०१८ मध्ये पूर्ण होणार असून त्यामध्ये देण्यात येणा-या पुरवठा आदेशातील माल पुढील वर्षामधील खरेदी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खरेदी करण्यास मान्यता असावी.

१८)	DMER,Mumbai यांचे कार्यपध्दतीनुसार खरेदीकामी प्रथम निविदा प्रसिध्द करुन २१ दिवस निविदाधारकांना ई-निविदा भरण्यासाठी मुदत देण्यात येऊन देखील जर तीन पेक्षा कमी निविदाधारकांनी निविदा अपलोड झालेल्या असल्यास एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात यावी आणि तरी देखील तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात यावी आणि तरी देखील एकच निविदा प्राप्त झाली तर विभागाची (रुग्णालयाची) गरज पाहता एकच निविदा ग्राह्य धरुन तांत्रिक निविदा उघडण्यात येऊन खरेदीची कार्यवाही पूर्ण करता येईल.

१९) आतापर्यंतच्या खरेदीतील अनुभवानुसार असे निदर्शनास आले आहे की, औषधे खरेदीच्या निविदेला आपल्याला खुप चांगला प्रतिसाद मिळतो, म्हणजेच मागील सन २०१७-१८च्या वार्षिक खरेदी वेळेस प्रथम ई-निविदेला १६० पेक्षा जास्त कंपन्यांनी सहभाग घेतला होता. परंतु टेक्निकल मध्ये ब-याच निविदाधारकांचे १ ते २ कागदपत्र कमी असल्यामुळे जवळपास ४० निविदा बाद ठरविण्यात आल्या होत्या. त्यामुळे ब-याच आयटमसाठी ३ पेक्षा कमी निविदा मिळाल्यामुळे फेर ई-निविदा मागवाव्या लागल्या. सदरबाबत कागदपत्रांची पुर्तता करुन घेणेकामी नविन खरेदी नियमावलीमध्ये तरतुद नाही, परंतु त्यामुळे वारंवार फेर निविदा मागवाव्या लागतात. याऐवजी आपण DMER व Haffkine यांचे कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केल्यास पहिल्याच ई-निविदेमध्ये जास्तीत जास्त आयटमकरीता पुरवठा आदेश देता येतील.याबाबत DMERव Haffkineमध्ये करण्यात येणारी प्रक्रिया खालीलप्रमाणे –

DMERव Haffkine,Mumbai यांचे कार्यपध्दतीनुसार खरेदीकामी निविदाधारकांनी ऑनलाईन निविदा भरल्यानंतर तांत्रिक ऑनलाईन काही दस्तऐवज (Document) दयावयाचे राहील्यास व तसेच तांत्रिक निविदा तपासताना ते लक्षात आल्यास संबंधित निविदाधारकांना दुरध्वनीव्दारे किंवा ई-मेल व्दारे कळविण्यात येते की, तुम्ही अपलोड केलेल्या ऑनलाईन निविदेमध्ये काही दस्त (Document) दिलेले नाही ते आम्हाला पुढील सात दिवसात देण्याचे करावे सरकारी सुट्टी (Government) Holiday) वगळता सात दिवसात देण्याचे करावे असे कळविले जाते व सात दिवसात जे पुरवठाधारक उर्वरीत दस्त (Document) देतील त्यांचीच फक्त Commercial Bid उघडण्यात येईल व जे पुरवठाधारक दस्त (Document) देणार नाहीत त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल, असे कळविले जाते. संस्थानने DMERव Haffkine ची कार्यपध्दती राबविल्यास ब-याच प्रमाणात निविदाधारक पात्र होऊन त्यांच्या कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा उघडून वार्षिक औषधे / सर्जिकल साहित्याची खरेदी होईल, जेणेकरुन औषधांअभावी रुग्णांची होणारी गैरसोय टाळता येईल. DMERव Haffkine,Mumbaiचे कार्यपध्दतीने अपुर्ण कागदपत्रे मागवून निविदाधारकाची पुर्तता करुन घेतल्यास आपणास जास्तीत जास्त निविदा प्राप्त होऊन शासन नियमाप्रमाणे आपणास लागणा-या तीन निविदा धारकांचे दर मिळतील व त्यामुळे मटेरीयल खरेदीस मदत होईल.

२०) श्री साईबाबा व श्री सार्दनाथ रुग्णालयातील काही डाक्टर औषधे खरेदी प्रक्रिया पुर्ण झा ाल्यानंतर नविन मटेरीयलची मागणी करतात. परंतु खरेदी नियमावलीनुसार सदरहू मटेरीयल ची किंमत रु.३,००,०००/- पेक्षा कमी किंवा रु.३,००,०००/- पेक्षा जास्त असल्यास शासन नियमावलीनुसार कोटेशन किंवा निविदा मागवूनच खरेदी करण्यात येईल. त्यामुळे नविन मागणी कमीत कमी दोन ते तीन महिने अगोदर करावी जेणेकरुन नियमावलीनुसार खरेदी करता येईल.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस–२०१४/प्र.क्र.८२/भाग–३/उद्योग–४, दि.०१ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२.१/२ – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रु.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तू निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवर खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकूण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

प्रस्ताव- सोबतच्या तक्त्यातील Annual Tender Req. 2018-19 या कॉलममध्ये केलेल्या मागणीनुसार औषधे/सर्जिकल साहित्य,केमिकल्स,किरकोळ साहित्य, ऑपरेशन थिएटरसाठीचे सर्जिकल साहित्य इत्यादी खरेदीकामी अंदाजे एकूण रु.५७,६२,०२,५१७/- इतका खर्च अपेक्षित आहे. गतवर्षाचा अनुभव विचारात घेता प्रत्यक्षात एक वर्षात होणारा खर्च त्यापेक्षा कमी किंवा जास्त होऊ शकतो.तरी वरीलप्रमाणे औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५७,६२,०२,५१७/- (अक्षरी रु.सतावन्न कोटी बासष्ठ लाख दोन हजार पाचशे सतरा मात्र) चे खर्चास तसेच औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते २० चे प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षिक (सन २०१८-१९) या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य व On Consignment Material उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.१ ते २० मध्ये नमुद केलेल्या कार्यपध्दतीनुसार खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.५७,६२,०२,५१७/- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पीटल मधील न्युरोसर्जन व इंटरव्हशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर वैद्यकीय अधिका-यांच्या तात्पुरत्या स्वरुपात केलेल्या नेमणूकीचा कालावधी संपुष्टात येत असलेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम कलम २००४ तरतुद– कलम १३(४) मधील समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यांव्यतिरिक्त) व कर्मचा-याची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-यांची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही. आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ –"सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी." तसेच अट शर्त क्र. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

शासन निर्णय क्र सासंवि-१०१७/१४३२/प्र.क्र.१५२/का.१६ दि. ०८/०५/२०१८.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ च्या कलम १३(४) अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा रूग्णालयासाठी हृदयविकार तज्ञ (Interventional Cardiologist) या संवर्गातील (वेतनश्रेणी रू.१५६००-रू.३९१०० ग्रेड पे रू.६६००) दोन काल्पनिक पदे तात्पुरत्या स्वरूपात निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

अ. सदर पदे निव्वळ काल्पनिक स्वरूपातील असून श्री साईबाबा रूग्णालयाच्या ३०० खाटांच्या सुधारित आकृतीबंधाला शासन मान्यता प्राप्त होईपर्यंतच कार्यरत राहतील.

ब. श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीद्वारे काल्पनिक पदावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी पात्र हृदयविकार तज्ञांची नियुक्ती, समिती निश्चित करेल अशा मानधन अथवा वेतनावर करण्यात येईल.

क. सदर पदांवर कंत्राटी पध्दतीने हृदयविकार तज्ञांची नियुक्ती करताना सदर पदे ही निव्वळ काल्पनिक स्वरूपातील असून स्थायी अथवा कायम स्वरूपातील नाहीत याची पुरेपूर कल्पना नियुक्तीस पात्र ठरणा-या हृदयविकार तज्ञांना व्यवस्थापन समितीद्वारे देण्यात येईल.

ड. श्री साईबाबा रूग्णालयाच्या सुधारित आकृतीबंधामध्ये हृदयविकार तज्ञ संवर्गात दोन वाढीव पदांचा समावेश करण्यात येईल. मात्र सदर शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेल्या काल्पनिक पदांवर कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येईल, अशा हृदयविकार तज्ञांना भविष्यात निर्माण करण्यात येणा-या कायम / स्थायी पदावर नियुक्तीसाठी कोणताही दावा करता येणार नाही अथवा अशा हृदयरोग तज्ञांना त्या पदावर नियुक्तीचा अधिकार असणार नाही या अटींचा समावेश नियुक्ती आदेशात आणि करारपत्रात करण्यात येईल.

इ. श्री साईबाबा हॉस्पिटलच्या सुधारित आकृतीबंधाद्वारे नव्याने निर्माण करण्यात येतील अशा सर्व स्थायी पदांवर सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, विहित कार्यपध्दतीचा अवलंब करूनच पात्र हृदयरोग तज्ञांची नियुक्ती व्यवस्थापन समितीला करता येईल.

शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/९८०/प्र.क्र.१०८/का.१६ दि. २७ जून २०१८.

१) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबत व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रूग्णालयाप्रमाणे श्री साईनाथ रूग्णालयांतील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) दोन्ही रूग्णालयातील डॉक्टर्सना प्रोत्साहन भत्ता अदा करण्याबाबतची नियमावली / अटी व शर्ती तसेच प्रोत्साहन भत्याचे दर व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात यावेत.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.-

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०३/०६/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३२८ (२).

कॅथलॅब व हृदय शस्त्रक्रियेकरीता खालीलप्रमाणे दर निश्चीत होऊन वैद्यकीय अधिका-यांना द्यावयाचे चार्जेस व संस्थानचे चार्जेस निश्चित करणेत आले.

| Services | Proposed | | Sanctioned by Sub Committee | |
|---|---|---|---|---|
| CATH LAB | Sansthan | DoctorsCharges | Sansthan | Doctors Charges |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Coronary Angiography | 6000 | 1000 | 6000 | 1000 |
| Coronary Angioplasty | 50000-75000 | 8000 | 50000-75000 | 8000 |
| Renal & Peripheral Angiogr. | 6000 | 1000 | 7500 | 750 |
| Renal & Peripheral Angioplasty. | 50000 | 8000 | 50000 | 8000 |
| BMV | 25000 | 7500 | 25000 | 7500 |
| Permanent Pacemaker Charges | 125000-200000 | 2000 | 125000-200000 | 2000 |
| Temporary Pacing | 4000 | 500 | 4000 | 500 |
| CVTS | | | | |
| CABG | 80000 | 8000 | 60000 | 8000 |
| Single Valve Replacement | 100000 | 12000 | 100000 | 12000 |
| Double Valve Replacement | 150000 | 18000 | 150000 | 18000 |
| ASD/VSD/TOF | 110000 | 12000 | 100000 | 12000 |
| BT shunt | 25000 | 2500 | 25000 | 2500 |
| PDA Ligation | 25000 | 5000 | 25000 | 5000 |

Note:Anaesthist's share-30% of the surgeon's charges 2. Assistant Surgeon 10% of the surgeon's charges.

सर्जिकल ऑपरेटीव्ह चार्जेस पॅकेजमध्ये ३०% रूग्णालय आकार गृहीत धरलेला आहे. सदर आकाराच्या ५० % हिस्सा सर्जनला देण्यात यावा. तसेच भूलतज्ञ यांना नफ्याच्या १५ % हिस्सा त्यांचे वेतनानंतरच्या रकमेवर द्यावा.

२) मा व्यवस्थापन समिती दि. २२/०९/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७७०.

पूर्वीच्या दरपत्रकात कन्सलटेशनवर लागू असलेल्या ७०% दर ६०% वर, जनरल सर्जरीवर डॉक्टर ५५.५५%, भुलतज्ञ १६.६६% वरुन डॉक्टर ४५%, भुलतज्ञ १३%, पूर्वी कन्सलटेशनचे दर वॉर्डप्रमाणे वाढत जात होते ते सर्व वॉर्डमध्ये जनरल वॉर्डप्रमाणे कमी राहतील. डिलक्सचे रुमचा दर रु. ८००/- वरुन रु. ५००/- व ह्दय शस्त्रक्रिया विभागात अॅन्जीओग्राफी रु. ६,०००/- वरुन रु. ५,०००/- तर परफ्युजनिस्ट व कॅथलॅब ऑपरेटरला प्रति केस नुसार मसिक वेतनाव्यतिरीक्त मोबदला, इंन्सेटीव्हीस्ट यांना मासिक रु. २०,०००/- ऐवजी प्रति केस नुसार मोबदला, पॅथॉलॉजिस्ट यांना २% वरुन ५% वाढ असे ठळक बदल करण्यात आलेले आहेत.

३) मा व्यवस्थापन समिती दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९३.

ज्यु रेडीओलॉजीस्ट टिकवुन ठेवण्याचेदृष्टीने रेडीओलॉजी विभागातील इतर तपासण्यांवर पुर्वीइतकाच १०% इंन्सेंटीवह ठेवुन सोनोग्राफी वकलर डॉप्लर तपासण्यांवर २०% इंन्सेंटीव्ह देणेस मान्यता देणेत आली.

४) मा व्यवस्थापन समिती दि. १२/०४/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र २७५.

कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि. ०१/०४/२०१४ पासून प्रति एन्जीओग्राफीसाठी रू. ३००/-, अॅन्जीओप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रू. ३०००/- आणि ओपीडी, टीएमटी, २-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेंटीव्ह देणेत यावा, असे ठरले.

५) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र ३७५ (५)

संस्थान रूग्णालयांमध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची ईच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

६) मा व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२३.

प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, डॉ किशोर उध्दवराव गोडगे यांचा न्युरोसर्जन पदाचा नेमणूक कालावधी दि. २१/०९/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा न्युरोसर्जन या पदावर दि.२२/०९/२०१७ पासून पुढे एक वर्ष अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी Adhoc Basis पध्दतीने, तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना न्युरोसर्जन पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणीनुसार होणारे सुरूवातीचे वेतनाचे जवळपासचे मानधन रू.६५,९००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले.

७) मा व्यवस्थापन समिती दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९९७.

डॉ मनोहर शिंदे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांची दि. ०१/११/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत असल्यामुळे, त्यांना दि. ०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी, दरमहा मासिक मानधन रू. ६१,०००/- मात्र व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येऊन, कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी, असे ठरले.

प्रस्ताविक- अ) मा व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ७२३ नुसार, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, डॉ किशोर उदध्दराव गोडगे यांचा न्युरोसर्जन पदाचा नेमणूक कालावधी दि. २१/०९/२०१७ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांना पुन्हा न्युरोसर्जन या पदावर दि.२२/०९/२०१७ पासून पुढे एक वर्ष अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी Adhoc Basis पध्दतीने, तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली. तसेच त्यांना न्युरोसर्जन पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणीनुसार होणारे सुरूवातीचे वेतनाचे जवळपासचे मानधन रू.६५,९००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात यावा, असे ठरले. सदर निर्णयास अनुसरून डॉ किशोर गोडगे यांना जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१३३५/२०१७ दि. २६/०९/२०१७ अन्वये श्री साईबाबा रूग्णालयात न्युरोसर्जन पदावर Adhoc Basis पध्दतीने दि. २२/०९/२०१७ पासुन पुढे एक वर्ष अथवा स्थायी स्वरूपात उमेदवार मिळेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेत आली असुन त्यांना रू. ६५,९००/- मात्र एकित्रत मासिक मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे.

डॉ किशोर गोडगे यांचा दि. ०९/०६/२०१८ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

"I Dr Godage Kishor Uddhawrao, working as full time consultant since last 2ys in department of neurosurgery. My adhoc basis order will end on sept2018 & want to make extension / next order in advance to continue work. So kindly consider & do needful".

डॉ गोडगे यांना यापुर्वी पहिल्यांदा दि. २२/०९/२०१६ व दुस-यांदा दि.२६/०९/२०१७ रोजी नेमणूक दिलेली आहे. दि. २६/०९/२०१७ रोजी, दि.२२/०९/२०१७ पासून एक वर्ष कालावधीसाठी दिलेल्या नेमणूकीचा एक वर्षाचा कालावधी दि. २१/०९/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे.

न्युरोसर्जन पदासाठी मा डीन बी जे मेडीकल कॉलेज यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता व मंजुर आकृतीबंधानुसार साईबाबा हॉस्पिटलमधील सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदाचे नाव | बी जे एम सी पुणे यांनी प्रस्तावीत केलेली शैक्षणिक पात्रता | सन २००९ चे आकृतीबंधातील मंजुर पदसंख्या | सध्या कार्यरत | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | अस्थायी | व्हिजीटींग |
| न्युरोसर्जन | 1) MBBS.<br>2) MCH/DNB Neurosurgery.<br>3) MS-CIT.<br>4)MMC/MCI Registration with renewal is mandatory. | ०२ | ०० | ०२<br>डॉ गोडगे<br>डॉ संजेलिया | ०१<br>डॉ म्हात्रे |

**ब)** मा व्यवस्थापन समिती दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ९९७ नुसार, डॉ मनोहर शिंदे, इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट (कंत्राटी), श्री साईबाबा हॉस्पिटल यांची दि. ०१/११/२०१७ रोजी मुदत संपुष्टात येत असल्यामुळे, त्यांना दि. ०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी, दरमहा मासिक मानधन रू. ६१,०००/- मात्र व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येऊन, कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी, असे ठरले. सदर निर्णयानुसार डॉ मनोहर शिंदे यांची जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/१७४०/२०१७ दि. ०६/१२/२०१७ अन्वये इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर दि. ०२/११/२०१७ पासून पुढे ११ महिने अथवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी दरमहा मासिक मानधन रू. ६१,०००/- मात्र व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येऊन, कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देणेत आली आहे. सदर नेमणुक कालावधी दि. ०१/१०/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे.

डॉ शिंदे यांना यापुर्वी पहिल्यांदा दि. ३०/०४/२०१४ (६ महिने कालावधी), दुस-यांदा दि. १९/०१/२०१५ (१ वर्ष कालावधी), तिस-यांदा दि. १९/०१/२०१६(१ वर्ष कालावधी), चौथ्यांदा दि. ०७/०१/२०१७ (१ वर्ष कालावधी), पाचव्यांदा दि. ०६/१२/२०१७(११महिने कालावधी) रोजी दि. ०२/११/२०१७ पासून ११ महिने कालावधीसाठी दिलेली नेमणूक दि. ०१/१०/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी मंजुर आकृतीबंधानुसार इंटरव्हेंशनल कार्डीओलॉजीस्ट पदांची मंजुर संख्या व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | मंजूर पदसंख्या | भरलेली पदसंख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | अस्थायी | व्हिजीटींग | |
| इंटरव्हेंशनल कार्डीओ-लॉजीस्ट | ०२ | ०२<br>डॉ हरिष बजाज,<br>डॉ गौरव वर्मा | ०२<br>डॉ देवरे<br>**डॉ शिंदे** | ०४<br>डॉ मुकुंद बजाज, डॉ देवराव ठेंगे, डॉ काळे, डॉ थोपटे | डॉ हरिष बजाज व डॉ गौरव वर्मा सध्या सेवानिलंबित आहेत. |
| क्लिनीकल असिस्टंट | १० स्पेशालिटी नुसार | ०० | ०१<br>डॉ महाले | ०० | डॉ महाले हे क्लिनीकल असिस्टंट (कार्डीओलॉजी) पदावर ११ महिने कालावधीसाठी बाह्ययंत्रणेद्वारे सेवा देत आहे. |

**मागणी**– श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ किशोर उध्दवराव गोडगे यांची न्युरोसर्जन पदावर ॲडहॉक बेसिस पध्दतीने दि.२२/०९/२०१७ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी व डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांची इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०२/१०/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करणेबाबत.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –**

| | |
|---|---|
| वेतनश्रेणी | १५६००-३९१०० |
| बेसिक | १८७५० |
| ग्रेड पे | ६६०० |
| डीए (१३९%) | ३५२३७ |
| एनपीए(३५%) | ८८७३ |
| एकुण वेतन | ६९,४६० |
| (मासिक एकत्रित देय मानधन) | ६९,००० |

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांना न्युरोसर्जन पदावर ॲडहॉक बेसिस पध्दतीने दि.२२/०९/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी व डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांना इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०२/१०/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देता येईल तसेच त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित रू. ६९,०००/- मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देता येईल.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.५५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.किशोर उध्दवराव गोडगे यांना न्युरोसर्जन पदावर ॲडहॉक बेसिस पध्दतीने दि.२२/०९/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी व डॉ मनोहर विश्वासराव शिंदे यांना इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट पदावर कंत्राटी पध्दतीने दि. ०२/१०/२०१८ पासून पुढे ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक देण्यात यावी, तसेच त्यांना अनुक्रमे मासिक एकत्रित रू.६९,०००/- मात्र मानधन व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल )**

---

विषय नं.१९ **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,५६,४४७/- मात्र अदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद –

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक– खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थानच्या रुग्णालयात उपचार होऊ शकत नसल्याने संस्थान मान्य यादीतील बाहेरील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते | | | | | | | चालु आर्थिक वर्षात यापुर्वी अदा केलेली रक्कम खालील प्रमाणे आहे. |
| १ | श्री.शिंदे भाऊसाहेब बाबुराव विभाग-ज्यु. कॉलेज हुद्दा- ग्रंथपाल | वडिलां | D.M Nephropathy | डॉ.जाधवर | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ६७३२८.०० | ६०२५५.०० | ७३६६ .०० |
| २ | श्री.अभयकुमार शांताराम दुनाखे विभाग-औ. प्र. संस्था हुद्दा-निर्देशक | पत्नी | Colonopy Chemo/Radiation | डॉ.बो-हाडे | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | ४०३१६१.०० | ३६३८३७.०० | १०४६५४.०० |
| ३ | श्री.कल्पना रघुनाथ मुसमाडे विभाग-परिचारिका हुद्दा – साईनाथ रूग्णालय | पती | Acute MI | डॉ. मनोहर शिंदे | रुबी हॉल क्लीनीक,पुणे | २४९८१०.०० | २४६४३०.०० | ५३१.०० |
| ४ | शकुंतला शंकर मोहिते हुद्दा- परिचारिकाविभाग- साईनाथ रूग्णालय | आई | Ca | डॉ.बो-हाडे | टाटा हॉस्पिटल,मुंबई | ८५९२५.०० | ८५९२५.०० | १२९५५.०० |
| | | | | | **एकूण** | **८०६२२४.००** | **७५६४४७.००** | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.७,५६,४४७/- इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही, असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ५ कर्मचारी / कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.७,५६,४४७ /- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.५५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील ४ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु. ७,५६,४४७/-मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक,श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.२० **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै २०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या रु.८९,२४,२५४/- सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार

उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **जुलै २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१४,७३०** व **१,०४१** आयपीडी रुग्णांपैकी **३,७९७** ओपीडी व **५७०** आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.८३,३७,७०४/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३५६** रुग्णाना रक्कम **रु.५,८६,५५०/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १५४ | १२,७८,१५५/- | - | १२,७८,१५५/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३३५ | २७,९८,६४७/- | १२,४९,८५४/- | १५,४८,७९३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १६ | ७०,८३०/- | ८,७८१/- | ६२,०४९/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ७०१ | ४६,१०,६२४/- | २७,९९,५३८/- | १८,११,०८६/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ३१३ | १,४४,४४,३११/- | १,२४,२५,०००/- | २०,१९,३११/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,८४८ | १६,१८,३१०/- | - | १६,१८,३१०/- |
| | **एकुण** | **४,३६७** | **२,४८,२०,८७७/-** | **१,६४,८३,१७३/-** | **८३,३७,७०४/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४३ | ६०,८००/- | - | ६०,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १८ | १५,६००/- | - | १५,६००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ३६ | ४,६००/- | - | ४,६००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४० | ३,४२,१००/- | - | ३,४२,१००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | २ | २,४००/- | - | २,४००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ४ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ११३ | १,५६,२५०/- | - | १,५६,२५०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | एकुण | ३५६ | ५,८६,५५०/- | - | ५,८६,५५०/- |
| | एकुण अ+ब | ४,७२३ | २,५४,०७,४२७/- | १,६४,८३,१७३/- | ८९,२४,२५४/- |

**प्रस्ताव** - उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **जुलै २०१८** मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या **रु.८९,२४,२५४/-** सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.५५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुलै-२०१८ या महिन्यात वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या सवलतीची रक्कम रु.८९,२४,२५४/- मात्रचे अवलोकन करण्यात येऊन त्यास चॅरिटी खाती खर्ची टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१ सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीस मान्यता बाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनिय २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** :- दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

**प्रास्तविक** :-मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/१२/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.१४ निर्णय क्र.१०६४, यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, आर्थिक अनुदानाअभावी गोर-गरीब रुग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता उपरोक्त विभागाच्या अभिप्रायामधील तक्त्यात नमुद केलेल्या रुग्णालयांपैकी अ.नं.१, २ व ५ रुग्णालये वगळता उर्वरित रुग्णालयांमधील प्रस्तावित प्रलंबीत प्रकरणांपैकी पात्र प्रकरणांचे वैद्यकिय आर्थिक अनुदान देण्यात यावे.

याचवेळी अशीही चर्चा झाली की, बऱ्याचशा आजारांसाठी राजीवगांधी जीवनदायी योजनेमार्फत रुग्णांना वैद्यकिय आर्थिक अनुदान मिळत असते. त्यामुळे ज्या आजारांचा राजीवगांधी जीवनदायी योजनेमध्ये समावेश नाही, फक्त अशा आजारांसाठी संस्थानमार्फत वैद्यकिय आर्थिक अनुदान दिले जावे, असे समितीचे मत झाले व याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.

उपरोक्त निर्णयान्वये, व दि.०५/०१/२०१८ रोजीचे टिपणीस अनुसरुन, जा.नं.एसएसएस/एसएसएच/अनुदान/४३५/२०१८, दि.२६/०१/२०१८ चे आदेशान्वये,

१) उप जिल्हाधिकारी, २) उपकार्यकारी अधिकारी,
३) मुख्य लेखाधिकारी, ४) वैद्यकीय संचालक,
५) उपवैद्यकीय संचालक, ६) वैद्यकीय अधिक्षिका व दोन डॉक्टर यांची कमिटी स्थापन करणेत आली.

याबाबत दि.१५/०२/२०१८ रोजी मा.उप जिल्हाधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली, उपरोक्त विषयांस अनुसरुण मिटिंग आयोजित करुन प्रस्तावित नियमावलीतील **अ.क्र.**

१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,
२) किडनी डायलेसिस व नंतरचे उपचार,
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,
७) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजांवरील शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, हे श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयात होत असल्याने, हे आजार वगळुन.

नियमावलीतील

**अ.क्र.** ४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,
५) रक्तासंबंधी आजार, ( उदा.हिमोफेलिया इ.)
६) जी.बी.एस ( Gullian Barre Sundrome),
८) कॉक्लीअर इंम्प्लांट,या आजारांना व

सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,

या आजारांचा समावेश करुन,वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीतील आजारांचे यादीत फेर बदल करणेबाबत मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०५/२०१८,विषय नं.३७ सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.३२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत उपरोक्त प्रस्तावात नमुद केले प्रमाणे, १) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, २) रक्तासंबंधी आजार, ( उदा.हिमोफेलिया

इ.) ३) जी.बी.एस ( Gullian Barre Sundrome), ४) कॉक्लीअर इंम्प्लांट, ५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार, या आजारांचा समावेश करणेत यावा. तसेच सध्या देण्यात येत असलेल्या रु.२५,०००/- मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या रकमेत वाढ करुन अनुदानाची रक्कम रु. ५०,०००/- मात्र करण्यात यावी. तसेच याबाबत सुधारित नियमावली तयार करुन ती मान्यतेसाठी सभेसमोर सादर करावी, असे ठरले.मा.व्यवस्थापन समिती निर्णयास अनुसरुन, सुधारित नियमावली.

| अ.नं. | प्रचलित नियमावली | सुधारित नियमावली | शेरा |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येते.<br>१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार<br>२) किडनी डायलेसिस, प्रत्यारोपन व नंतरचे उपचार.<br>३) मेंदुची शस्त्रक्रिया नंतरचे उपचार<br>४) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>५) रक्तासंबधीचे आजार (उदा.हिमोफेलिया)<br>६) जी.बी.एस.(Guillain Barre Syndrome)<br>७) मनका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार.<br>८) कॉक्लीअर इन्प्लॅट | वैद्यकीय आर्थिक अनुदान हे खालील शस्त्रक्रिया / उपचारासाठी देण्यात येईल.<br>**१) कर्करोगासंबधी उपचार, शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार,**<br>**२) रक्तासंबंधी आजार, (उदा.हिमोफेलिया इ.)**<br>**३) जी.बी.एस(Gullian Barre Sundrome),**<br>**४) कॉक्लीअर इंम्प्लांट,**<br>**५) सर्व प्रकारच्या ट्रान्सप्लॅन्ट (Transplant), शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार** | मा.व्यस्थापन समिती सभा दि.०२/०५/२०१८ विषय नं.३७, निर्णय क्र.३२३. |
| २. | रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख किंवा त्यापेक्षा कमी असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पान्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्ण वा / आणि रुग्णांचा पालक नोकरी करत असल्यास ज्याचेकडे नोकरी करत असेल / असतील त्या संस्थेने / व्यक्तीने रुग्णांला वा / आणि रुग्णाच्या पालकाला देण्यात येत असलेल्या पगारासंबंधीचे (वेतन / भत्ते इ. सर्व मिळुन एकुन उपलब्धीचे) प्रमाणपत्र / पगाराची स्लीप आणि इतर मार्गाने (म्हणजे शेती / गुंतवणीकीवरील व्याज / घरभाडे इ.) रुग्णाला / रुग्णाच्या पालकाला उत्पन्न आहे वा नाही. याबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit)<br>आ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय वा व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>ब) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण जर शेती करत असेल तर त्याचे एकुण उत्पन्नाचे तहसिलदाराकडुन प्रमाणपत्र येते. परंतु त्याशिवाय तो ज्यांचेवर अवलंबुन आहे. त्या मुलाचे / मुलीचे वा पालकाचे एकुण लक्षात घेणे जरुरी आहे म्हणुन कुटुंबातील सर्वाच्या एकत्रित एकुण उत्पन्नाचे वा पालकाच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र द्यावे.मात्र रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल | **पिवळे रेशन कार्ड रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये एक लाख साठ हजार (१,६०,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी व केसरी रेशन कार्ड रुग्ण व त्यांचे कुटुंबिय यांचे सर्व मार्गाने मिळणारे एकुण वार्षिक उत्पन्न रुपये पंच्याऐंन्शी हजार (८५,०००/-) किंवा त्यापेक्षा कमी** असल्यास अर्जदाराचा अर्ज अनुदानासाठी ग्राह्य समजण्यात येईल. उत्पन्नाचे प्रमाणपत्र खालीलप्रमाणे असावे.<br>अ) रुग्णाचा / पालकाचा व्यवसाय / शेती वा नोकरी / व्यापार असेल तर रुग्णाने वा / आणि त्याचे पालकाने त्यांच्या सर्व मार्गानी मिळणा-या उत्पन्नाबाबत प्रतिज्ञापत्र (Affidavit) द्यावे.<br>ब) रुग्ण वा / आणि त्याच्या पालकांचे एकुण उत्पन्नाबाबत त्या भागातील तहसिलदार यांनी दिलेले उत्पान्नाचे प्रमाण पत्र द्यावे.<br>क) रुग्ण ६० वर्षाच्या वर असेल तर केवळ त्याच्या<br>क) वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान<br>ख) देण्यात येईल. | **महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांची दि. २३/०२/२०१८ रोजीची अधिसुचना.**<br>यापुर्वीच्या नियमावलीतील जाचक अटी काढून टाकुन गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा विचार केलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | तर केवळ त्याच्या वैयक्तिक उत्पन्नाचा विचार करुन अनुदान देण्यात येईल. | | |
| ३) | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युन्सीपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल. | अनुदान हे केवळ भारतातील सरकारी, जिल्हा परिषद वा म्युन्सीपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा **शासकीय वैद्यकीय महाविद्यालय** यांनी चालविलेले रुग्णालय, यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी देण्यात येईल.परंतु अशा रुग्णालयाची नोंद संस्थानच्या अनुदान यादीत असणे आवश्यक. | वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा दुरुपयोग होऊ नये व गरीब व गरजु रुग्णांना लाभ घेता यावा. |
| ४) | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येत नाही. | संस्थानचे रुग्णालयात ज्या रुग्णांच्या शस्त्रक्रिया/ उपचार, होणार / झालेले असतील अशा रुग्णांना संस्थान मार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | संस्थानमध्ये कमीत कमी दरात शस्त्रक्रिय केल्या जातात व पेशंटला बिलात देखिल सवलत दिली जाते. त्यामुळे संस्थान रुग्णालयात शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. |
| ५) | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत उपचार / शस्त्रक्रियेसाठी लागणा-या खर्चाचे व शस्त्रक्रिया अंदाजे (Tenative) तारीख दर्शविणारे संबधित वैद्यकीय अधिकारी यांचे सही, पदवी, रजिस्टेशन नंबर सह रुग्णालयाचे लेटरहेडवर प्रमाणपत्र आवश्यक आहे. | अनुदान योजनेचा दुरुपयोग होऊ नये याकरीता आवश्यक. |
| ६) | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १०,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | औषधांच्या उपचाराच्या वाढत्या किंमती व खर्च लक्षात घेता अनुदान हे शस्त्रक्रिया उपचारासाठी येणारे एकुण खर्चाचे २५% अगर रुपये ५०,०००/- पैकी जी कमी पुर्णांकित रक्कम असेल तेवढी रक्कम, देण्यात येईल.मात्र शस्त्रक्रिया उपचाराचा खर्च रुपये १५,०००/- अगर त्याहुन कमी असल्यास अनुदान देण्यात येणार नाही. | मा.व्यस्थापन समिती सभा दि.०२/०५/२०१८, विषय नं.३७, निर्णय क्र.३२३. |
| ७) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने डी.डी.अथवा क्रॉस चेकने पाठविण्यात येईल. (अकौंटपेयी) | अनुदानाची रक्कम परस्पर संबंधीत रुग्णालयाच्या नावाने **आर.टी.जी.एस. द्वारे** पाठविण्यात येईल. | जेणे करुन लवकर अनुदान रक्कम रुग्णा पर्यंत पोहचणे करीता अवश्यक |
| ८) | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्णाचे वैयक्तिक नावाने डी.डी. / चेक देण्यात येणार नाही. | रुग्ण दुरुपयोग करु शकतात. |
| ९) | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार | रुग्णाची शस्त्रक्रिया ज्यातारखेस आहे.तत्पुर्वी अगर जास्तीस जास्त एक महिना नंतर अनुदान मिळु शकेल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता |

| | | | |
|---|---|---|---|
| | करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल.त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | करणेत येणार नाही. मात्र अर्ज अपुर्ण कागदपत्रांची पुर्तता करणेसंबंधी रुग्णास पत्र पाठविल्यास असे पत्र पाठविलेपासुन पुढे एक महिन्याची मुदत सदर रुग्णास सर्व आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणेकामी देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या अर्जाचा मात्र विचार करणेत येणार नाही. | यावा. |
| १०) | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालय खाते (अकौंट) बंद होणेचे आत अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तताकरुन अर्ज सादर करावा.जेणेकरुन त्यास संस्थानने पाठविलेल्या रकमेचा उपयोग होईल. | अर्जदाराने अनुदान मागणीचा संपुर्ण अर्ज शस्त्रक्रियेपुर्वी साधरणत: एक महिना अगोदर जमा केल्यास शस्त्रक्रियापुर्वी अनुदानाची रक्कम रुग्णालयात पोहोच होईल, तसेच तातडीच्या (इर्मजन्सी) प्रकरणात शस्त्रक्रियेनंतर परंतु रुग्णालयातुन रुग्णास डिसचार्ज देणेपुर्वी अर्जदाराने सर्व कागदपत्राची पुर्तता करुन अर्ज सादर करावा. | अनुदान मागणी अर्ज देणेकामी काही ठराविक कालावधी आवश्यक असल्यामुळे ही अट आहे. |
| ११) | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु अशा गंभीर आजारासाठी **पाच वर्षानंतर** पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येईल. | प्रत्येक रुग्णांस गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्यात येते. परंतु अशा गंभीर आजारासाठी **तीन वर्षानंतर** पुन्हा रुग्णाने मागणी केल्यास वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येईल. | गरीब व गरजु रुग्णांना जास्तीत जास्त लाभ घेता यावा यासाठी अट शिथिल केलेली आहे. |
| १२) | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | अनुदान मागणी अर्जासोबत रेशनकार्डची व पेशंटची आधारकार्डची प्रमाणित केलेली झेरॉक्स प्रत देणे आवश्यक आहे. | आधार कार्ड हा युनिक आय डी नंबर असल्यामुळे सदर कार्डची झेरॉक्स आवश्यक आहे. |
| १३) | शासनाच्या जिवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असणा-या रुग्णांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येत नाही. | केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या जिवनदायी / महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजना,तत्सम योजने अंतर्गत असलेल्या रुगणांना संस्थानमार्फत अनुदान देण्यात येणार नाही. | काही रुग्ण या दोन्ही योजनेचा लाभ घेऊ शकतात यासाठी सदर अट घातली आहे. |
| १४) | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्वकागदपत्राची सक्षम अधिकारी यांनी साक्षांकित केलेली प्रमाणित प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | अर्जासोबत जोडाव्या लागणा-या सर्व कागदपत्राची **स्वत: (Self Attested)प्रमाणित** प्रति लिपी (ॲटस्टेट प्रती ) असावी. | कोणत्याही योजनेचा लाभ घेणेकामी नियमानुसार साक्षांकित प्रती असणे आवश्यक आहे |
| १५) | स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राबाबत. | अनुदान प्राप्त होणा-या रुग्णालयांनी पाठविण्यात आलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचा त्याच रुग्णासाठी वापर करावा, रुग्ण डिसचार्ज झाला असल्यास सदरच्या रुग्णाला दिलेल्या रकमेची स्टॅम्प रिसीट व उपयोगिता प्रमाणपत्राची माहिती तात्काळ इकडील कार्यालयास सादर करावी. | उपयोगिता प्रमाणपत्र अत्यावश्यक केल्यामुळे दिलेले अनुदान त्या रुग्णाला वापरले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | दिलेल्या वैद्यकीय आर्थिक अनुदानाचे रकमेचा उपयोग त्या रुग्णासाठी न झाल्यास ती रक्कम संस्थान खाती त्वरीत जमा करणे आवश्यक आहे. | किंवा कसे ? याबाबत माहिती उपलब्ध होईल. |
| १६) | श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याच्या नियमावलीत रुग्णालयाचा समावेश, करावयाचा झाल्यास रुग्णालयाने सादर करावयाची कागदपत्रे. | श्री साईबाबा संस्थानच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्याच्या नियमावलीत रुग्णालयाचा समावेश, करावयाचा झाल्यास रुग्णालयाने खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.<br>१) मा. धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात रजिस्टर ट्रस्ट असलेबाबत नोंदणी प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.<br>२) ट्रस्ट नियमावली. (Trust Byelaws)<br>३) आयकर ८० जी, १२ ए प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. मागील तीन वर्षाचे ऑडीट रिपोर्ट.<br>४)रुग्णालयात कोणकोणत्या आजारावरील शस्त्रक्रिया / उपचार केले जातात याबाबतची माहिती. (दरपत्रकासह)<br>५) रुग्णालय हे धर्मदाय असलेबाबतचे हमी पत्र. (रुग्णालयाचे लेटरहेडवर नोंदणी क्रमांकासह.)<br>६) रुग्णालयास शासनाचे महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची मान्यता आहे किंवा कसे ? याबाबत रुग्णालय प्रमुखाचे प्रमाणपत्र.<br>७) रुग्णालय हे धर्मदाय संस्थेच्या स्वमालकीचे आहे किंवा करारावर अथवा भाडेतत्वावर चालविणेस घेतलेले आहे, याबाबतचा खुलासा.<br>तसेच रुग्णालयाबाबतची इतर अनुषंगीक माहिती सादर करणे.<br>ही सर्व कागदपत्रे अनुदान विभाग व वित्त विभाग अथवा लेखाशाखा अथवा ऑडिटर यांचे कडुन तपासणी केल्यानंतर, मा.व्यवस्थापन समितीचे मान्येतेने रुग्णालय पॅनलवर घेणेत येईल. | जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सावर्जनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) अथवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी चालविलेले रुग्णालय, याबाबत पुरावा घेणे अवश्यक आहे. |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:-** श्री साईबाबा संस्थानने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणेकामी स्वतंत्र नियमावली तयार केलेली असुन,त्यास शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८२ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०५/२०१८, विषय नं.३७ निर्णय क्र.३२३, अन्वये, वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीतील आजारांचे यादीत फेरबदल करणेबाबत मान्यता मिळालेली आहे. त्या नुसार, सुधारित नियमावली,मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर,मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर, शासन मान्यतेसाठी पाठविता येईल,शासन मान्यतेनंतर नियमावली लागु करता येईल. तो पर्यन्त पुर्वीच्या प्रचलित पध्दतीने अनुदान देता येईल.

**प्रस्ताव:-** सुधारित नियमावलीचा प्रस्ताव मा.व्यस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५५६ यावर सविस्तर चर्चा होऊन, सुधारीत वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. ज्या आजारांसाठी वारंवार उपचार करावे लागतात उदा. कॅन्सर इ. अशा आजारांसाठी दरवर्षी अनुदान देण्यात यावे या दुरुस्तीसह वैद्यकीय आर्थिक अनुदानाच्या सुधारित नियमावलीस मान्यता देण्यात आली.
२. वैद्यकीय आर्थिक अनुदानाची सुधारित नियमावली शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत यावी.
३. शासन मान्यतेनंतर सुधारित नियमावली लागु करणेत यावी.
४. शासनाची मान्यता मिळेपर्यंत पुर्वीच्या प्रचलित पध्दतीने वैद्यकीय आर्थिक अनुदान देणे सुरु ठेवावे.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

आयत्या वेळेचा
विषय नं.०१ दिनांक ०३.०९.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.५५७ दिनांक ०३.०९.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

१. **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षामध्ये दि. २९ सप्टेंबर, २०१८ या दिवशी प.पू.विष्णू महाराज पारनेरकर यांचे प्रवचन व त्यांचे हस्ते श्री साईबाबा मंदिर सुवर्णकलशाचे पूजन करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

१) अधिनियम कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यववस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**प्रस्तावनाः**- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत आहे.

मंदिर विभागामार्फत श्री. सुनिल नारायण जोशी, पंचवटी, नाशिक यांनी दि.२९ सप्टेंबर हा दिवस प्रतिवर्षी श्री साईबाबा समाधी मंदिर सुवर्ण कलशारोहण स्मृतीदिन म्हणून साजरा करावा तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात पूर्णवाद-वर्धिष्णू आदरणीय विष्णू महाराज पारनेरकर, रा. पारनेर, जि. अहमदनगर यांचे "पूर्णवाद तत्वज्ञान" व "श्री साईबाबा यांचे तत्वज्ञान" यावर कार्यक्रम ठेवणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ६९८ खालीलप्रमाणे झालेला आहे:

*"श्री सुनिल नारायण जोशी, पंचवटी नाशिक यांचे विनंती मधील सन-२०१८ चे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात समाधी शताब्दी कक्षाचे उपलब्ध तारखेप्रमाणे पूर्णवाद-वर्धिष्णू आदरणीय विष्णू महाराज पारनेरकर, रा. पारनेर जि. अहमदनगर यांचे मार्गदर्शनाखाली "श्री साईबाबा यांचे तत्वज्ञान" यावर कार्यक्रम ठेवणेस हरकत नाही, परंतू श्री साईबाबा समाधी शताब्दी कार्यक्रमांस बराचसा कालावधी असल्यामुळे सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवणेत यावा."*

आता श्री. राजीव माधव मुठाळ, शिर्डी यांनी मा. अध्यक्ष महोदय यांना अग्रेषीत केलेल्या पत्रामध्ये कळविले आहे की, आम्ही खाली सह्या करणारे समस्त शिर्डी ग्रामस्त वरील विषयास अनुसरून आपणास निवेदन सादर करत आहोत.

"दि. २९ सप्टेंबर, १९५२ या दिवशी प.पू. रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे हस्ते श्री साईबाबांच्या आज्ञेवरून सुवर्णकलशारोहण (कळस) करण्यात आले. आज या घटनेला ६६ वर्षे पुर्ण होत आहेत. या घटनेचा

इतिहास खूप मोठा आहे व तो सर्वश्रृत आहे. जुन्या पिढीतील सर्व शिर्डी ग्रामस्थांना तो माहित आहे. हा सर्व इतिहास या निवेदनाद्वारे दाखवत आहोत.

त्यामुळे या घटनेचे स्मरण करण्यासाठी व येणा-या नविन पिढीला हा इतिहास माहित व्हावा या उद्देशाने प.पू. रामचंद्र महाराज पारनेरकर यांचे पुढील वंशज श्री. प.पू. विष्णुमहाराज यांना सुवर्णकलशाचे पूजन व प्रवचन या कार्यक्रमांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेने आंमत्रित करावे हि विनंती.

तसेच श्री साई समाधी शताब्दी सोहळयाचे उद् घाटन कार्यक्रमास त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल कृत्रज्ञता व्यक्त करणेसाठी आमंत्रित करण्यात यावे, ही विनंती.

या निवेदनाच्या आगोदरही साधारण मार्च-२०१७ मध्ये श्री सुनिल जोशी, नाशिक यांनी वरील विषयांचे पत्र आपणास दिले होते.

प्रस्तावना :- अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ३५९९ शाळांमधून सुमारे २,४२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक वाढी बरोबर त्यांच्या शारीरीक, मानसिक व भावनिक विकास होण्याकरिता विविध उपक्रम जिल्हा परिषद शाळांमधून राबविले जातात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शाळांना पायाभुत सुविधा पुरविणे आवश्यक असते. त्यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत. या गरजा जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेच्या उपलब्ध निधीमधून पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि शाळांची व वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता सदरचा निधी अपुरा पडत आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा, समाज मंदीर किंवा सामाजिक संस्थानी देऊ केलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात भरत आहेत. दरवर्षी वादळासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळेही शाळेचे खूप आर्थिक नुकसाना होत असते. तेथेही उपलब्ध निधीतून खर्च करावा लागतो. परिणामी नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी निधी कमी पडतो असे कळविले आहे.

मागणी:- जिल्हा परिषद शाळांना ५०० वर्ग खोल्यांची आवश्यकता असून सन २०१६-१७ च्या डीएसआर नुसार एका खोलीला रक्कम रु.७,२०,०००/- मात्र एवढा, अशी एकूण रु.३६ कोटीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- दि. ०८.०९.२०१७ रोजीचे बैठकीतील निर्णय क्रं. ७५६ अन्वये या विषयावर सविस्तर चर्चा होऊन "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि. ०१.ऑक्टोंबर २०१७ पासून प्रारंभ होत आहे. त्या अनुषंगाने, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु, सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभुत सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून, संस्थानला निधीची

कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभुमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना उपरोक्त विषयांकित आर्थिक मदत देणे उचित होणार नाही.” असा निर्णय झालेला आहे.

मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अध्यक्षतेखालील बैठकीतील निर्देश:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्या कामकाजासंदर्भात वर्षा, मा. मुख्यमंत्री महोदय यांचे शासकीय निवासस्थान येथे दि. ०१ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीतील मुद्दा क्रं. १ खालीप्रमाणे आहे.

| अ. क्र. | विषय | बैठकीत घेण्यात आलेले निर्णय | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर जिल्हयातील नवीन शाळा/खोली बांधकामासाठी निधी मिळण्याबाबत | १.नविन वर्ग खोल्यांची आवश्यकता असलेल्या शाळांची तालुका निहाय यादी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना सादर करावी.<br>२. तद् नंतर जिल्हाधिकारी, अहमदनगर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांची समिती गठीत करण्यात यावी. तसेच समितीची कार्यकक्षा निश्चित करून देण्यात यावी.<br>३. उपरोक्त समितीचे निकष निश्चित करून त्याप्रमाणे शाळांची यादी अंतिम करून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना द्यावी.सदर यादीप्रमाणे संस्थानने अनुदान उपलब्ध करून द्यावे.<br>४. सदर अनुदान टप्प्या– टप्प्याने वितरीत करण्यात यावे<br>५. शाळांचे/वर्ग खोल्यांचे बांधकाम/उभारणी/दुरूस्ती इ. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात यावी. | १. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर<br>२. जिल्हाधिकारी अहमदनगर<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी |

उपरोक्त निर्देशास अनुसरून जिल्हा परिषद अहमदनगर च्या प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी रु. ३६ कोटी अनुदान देणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे फेरनिर्णयार्थ व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला. सदर बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या बैठकीचे पत्र जा. क्रं. कार्या४/बांध/४२१/२०१८ दि. ०३.०४.२०१८ नुसार पाठविलेल्या इतिवृत्ताच्या प्रती मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना वाटप करण्यात आल्या. सदर इतिवृतात १०९२ वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी एकूण रु. ६८,१६,४०,०००/- मात्र इतका निधी मिळणेबाबतची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच इतिवृत्तात शाळांची नावे व नवीन बांधावयाच्या खोल्यांची संख्याही नमूद केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- दि. ०४.०४.२०१८ चे सभेतील निर्णय क्रं. २५१ अन्वये चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांकडील बैठकीतील निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी, अहमदनगर व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर यांनी जिल्हयातील एकूण ३५९९ शाळा व १०९२ नवीन खोल्या बांधकाम/उभारणी/दुरस्तीची रक्कम रु. ६८,१६,४०,०००/- मात्रचा प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन, अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नवीन वर्गखोल्या इमारती बांधकामासाठी अनुदान देणेस तत्वतः मान्यता देण्यात आली. सदरहू अनुदान टप्प्याटप्याने देण्यात यावे, पहिल्या टप्प्यासाठी रु. १० कोटी मात्र अनुदान देण्यात यावे. याकरिता जिल्हाधिका-यांच्या यादीतून शाळांची निवड स्थानिक उपसमितीने करावे, असे ठरले.

मा. स्थानिक उपसमितीचा निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सदरचा प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर केला असता दि. १९.०५.२०१८ रोजी झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त कायम करतांना निर्णय क्र. ३४८/२६ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून १०९२ नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी निधी मिळणेकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्या नाही तसेच विद्यार्थी संख्या वाढली याबाबी विचारात घेऊन प्रत्येक तालुक्याकरिता १० खोल्यांची निवड करण्यात यावी. कोपरगांव व राहूरी तालुक्यातील २० खोल्यांची निवड करण्यात यावी, तसेच शाळांची निवड करून अंतिम यादी उपसमितीच्या पुढील बैठकीत निश्चित करावी, अशी या उपसमितीची शिफारस होती.

सदरहू इतिवृत्त कायम करतांना असे ठरले की, जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून १०९२ नवीन शाळा खोल्या बांधकामासाठी निधी मिळणेकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावामधून विद्यार्थ्यांसाठी वर्गखोली नाही तसेच विद्यार्थी संख्या वाढली याबाबी विचारात घेऊन कोपरगांव तालुक्यातील २०, राहूरी तालुक्यातील १५,

श्रीरामपूर तालुक्यातील १५ व उर्वरीत तालुक्याकरीता प्रत्येकी १० खोल्यांची निवड करण्यात येऊन, अंतिम यादी उपसमितीच्या पुढील बैठकीत निश्चित करावी.

शासन निर्णय :- विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि. २६ जून २०१८ अन्वये खालीलप्रमाणे शासन निर्णय झालेला आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ण) मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळेच्या नविन खोल्या बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यात रुपये १० कोटी इतके अनुदान श्री साईबाबा संस्थानद्वारे देण्यास खालील अटींच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१) उपरोक्त मंजूर निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत जिल्हा परिषद अहमदनगर यांना उपलब्ध करून देण्यात यावा.

२) जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या अखत्यारीतील शाळांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत करण्यात यावे.

३) जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेमार्फत कामाच्या प्रगतीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्याकडे निधी वर्ग करण्यात यावा.

४) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सादर केलेल्या यादीतील शाळांची निवड श्री साईबाबा संस्थानच्या स्थानिक समितीमार्फत करण्यात यावी.

प्रस्ताव - उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीच्या निर्णय व शासन निर्णयान्वये कार्यवाही होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. स्थानिक उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन,**

**१. उपरोक्त मंजूर निधी जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे वर्ग करणेत यावा व वर्ग खोल्यांचे बांधकाम शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.**

**२. संबधीत तालुक्याचे उपअभियंता व गट शिक्षणाधिकारी यांनी मा. स्थानिक विश्वस्तांशी विचार विनिमय करुन भुमिपुजनाचे कार्यक्रम आयोजित करावे.**

**३. वर्ग खोलीवर " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे सन २०१८-१९ मध्ये प्राप्त निधीतून बांधण्यात आलेली वर्ग खोली" असे नमुद करावे.**

**अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**तसेच जिल्हा परिषदेच्या १६० खोल्यांसाठी सदर रु. १० कोटी इतके अनुदान देण्यात येत आहे, सदर खोल्यांसाठी अनुदान कमी पडल्यास जास्तीची रक्कम जिल्हा परिषद / ग्रामपंचायत यांनी त्यांचेकडील उपलब्ध अनुदानातून खर्च करावी, तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या समितीने विहीत केलेल्या मानांकानुसार अनुदान खर्च करावे, असे ठरले.**

**दि. ०४.०४.२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. २५१ अन्वये अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमीक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारत बांधकामासाठी रक्कम रु. ३० कोटी अनुदान देणेस तत्वत: मान्यता देण्यात आली सदरहू अनुदान टप्प्याटप्प्याने देण्यात यावे असे ठरले. उपरोक्त पहिल्या टप्प्यातील रु. १० कोटी अनुदान वगळता जिल्हा परिषद शाळा खोल्या बांधकामासाठी उर्वरीत रु.२० कोटी मात्र अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली तसेच त्यासाठी जिल्हा परिषदेकडून जिल्हाधिकारी यांच्या समितीची मान्यता घेऊन सुधारीत यादी मागवावी, असे ठरले तसेच अनुदान मंजूरीचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

२१ मा.सदस्यांच्या सुचनांबाबत.

स्थानिक उपसमिती सभेमध्ये विविध चर्चेच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारसी करणेत आल्या. त्यास मान्यता देण्यात आली.

**(१) साई आश्रम धर्मशाळा येथे टेन्साईल फॅब्रीक मंडप उभारण्यासाठी तपशीलवार अंदाजपत्रकासह आवश्यक खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर त्वरीत सादर करावा.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग)**

---

**(२) शिर्डी नगरपंचायत, श्री साईबाबा संस्थान व कोपरगाव नगरपालिका साठी निळवंडे धरणामध्ये पाणी आरक्षीत करुन मिळण्याचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबीत आहे.**

**सदर प्रस्ताव हा शासनाच्या अमृत योजनेच्या दरडोई, दरदिवशी १३५ लिटर या मानंकाप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.**

**तथापी धरणातील पाणी आरक्षणासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमाक प्राधिकरणाचे (MWRRA) दरडोई, दरदिवशी १०० लिटर असे मानक निश्चीत आहे.**

**त्यामुळे शिर्डी नगरपंचायत, श्री साईबाबा संस्थान व कोपरगाव नगरपालिका यासाठी अमृत योजनेच्या दरडोई, दरदिवशी १३५ लिटर या मानकाप्रमाणे आरक्षण मंजुर व्हावे यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमाक प्राधिकरणाकडे अपिल दाखल करण्यास व अपिलाच्या मसुद्यास मान्यता द्यावी, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र. अधिक्षक, पाणी पुरवठा विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **शासन पत्राचे / निर्णयाचे वाचन करणे.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.२२/०८/२०१८ ते दि. ०५/०९/२०१८ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन परिपत्रक क्र.संकिर्ण - १११८/प्र.क्र.३७८/१६-अ/ सामान्य प्रशासन विभाग दि.२७/०८/२०१८ | २८/०८/२०१८ | केरळ राज्यात पाऊसामुळे उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्ती ग्रस्त नागरिकांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से., भा.व.से. व महाराष्ट्र राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे माहे सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातील एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देगणी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत |
| ०२ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१०२५/प्र.क्र. ११४/का.१६ दि.२३/०८/२०१८ | ०३/०९/२०१८ | श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथील जुन्या जीर्न २००० नग रबराईज्ड क्वायर फोम मॅट्रेसची वार्षिक उच्चतम दर कराराने विक्री करण्यास मान्यता देण्याबाबत |

**निर्णय क्र.५५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेल्या उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मागासवर्ग कक्ष)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त श्रींचे आराधना विधी पुजेची जागा निश्चीत होणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे निर्वाणानंतर प्रति वर्षी विजयादशमीचे दिवशी श्रींचा समाराधना विधी (आराधना विधी) करण्याची प्रथा आहे. श्रींचे आराधना विधीचे यजमान म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे विद्यमान अध्यक्ष महोदय (सपत्नीक) भुषवितात. श्रींचे आराधना विधीची पूजा समाधी मंदिराचे समोरील गाभा-यात करत असे, गर्दीचे प्रमाणात वाढ होत असल्याने जास्तीत-जास्त साईभक्तांचे दर्शन व्हावे याकरीता ही पूजा पहिल्या माळयावर करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर श्रींचे समाधी मंदिराचे पहिल्या माळयावर गर्दीचे प्रमाण जास्त होत असल्याने व श्रींचे समाधी मंदिराचे वास्तूचे जतन करणे या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्र.३९४ नुसार असे ठरले आहे की, “आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे त्याच ठिकाणी करण्यात यावा, सदरहू आराधना विधीचे थेट प्रक्षेपण (Live Telecast) टिव्हीवर व इतर माध्यमांना करण्यात यावे, यामुळे मंदिर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपूर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदिर (बुटी वाडयास १०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली आहे. त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत यावे. आराधना विधीकरीता

जे यजमान (पतीपत्नी) असतात ते व मंदिरातील ब्राह्मण व सुवासिनी (त्यांच्या पत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था समाधी मंदिराचे पहिल्या माळ्यावरील हॉल येथे करणेत यावी. त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदिर हॉलवर प्रवेश नसावा. जे भोजन यजमान, ब्राह्मण सुवासिनींना दिले जाते तेच भोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयाच्या व्ही.आय.पी.हॉलच्या बाजुला असलेल्या दोन हॉल्समध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे- व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्रीसाईप्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसाद भोजन संस्थानतर्फे मोफत देण्यात यावे.तसेच श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत वर्षातून तीन सण रामनवमी, गुरुपौर्णिमा व विजयादशमी हे उत्सव म्हणून साजरे केले जातात. या तीनही उत्सवात साईभक्तांचा समावेश असतो म्हणून मा.त्रिसदस्यीय समितीची अशी इच्छा आहे की, या तीनही उत्सवांना गावकरी व श्रीसाईबाबांच्या सर्व भक्तांना संस्थानमार्फत मोफत प्रसाद भोजन देण्यात यावे. या उत्सव कालावधीमध्ये गावकरी व भक्तांची प्रचंड गर्दी लक्षात घेता, प्रसाद भोजन सुटसुटीतपणे व चांगल्या पध्दतीने देता यावे याकरिता विशिष्ट प्रकारचे पदार्थ भोजनामध्ये चांगल्या पध्दतीने देता येतील, हे ठरविण्याकरीता मा.कार्यकारी अधिकारी(आता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी), प्रसादालयाचे संबंधीत प्रशासकीय अधिकारी, प्रसादालय विभागप्रमुख तसेच गावक-यांतर्फे नगराध्यक्ष किंवा त्यांचे ऐवजी त्यांनी सुचविलेली एकच व्यक्ती, (उपनगराध्यक्ष अथवा नगरपंचायत सदस्य एक व्यक्ती) यांची एकत्रीत बैठक आयोजित करुन, त्यात मोफत प्रसाद भोजनाच्या पदार्थांची यादी (menu) ठरविण्यात यावा व तो menuतीनही उत्सवात (श्रीपुण्यतिथी, श्रीरामनवमी व श्रीगुरुपौर्णिमा) देण्यात यावेत. मोफत प्रसाद भोजनाची व्यवस्था श्रीरामनवमी उत्सव-२०१४ या उत्सवापासून सुरु करण्यात यावे असे ठरले आहे.

प्रस्ताव:- सन-२०१८ चे विजयादशमीचे दिवशी श्रीसाईबाबांचे महानिर्वाणास १०० वर्षे पुर्ण होत असून शतकपुर्ती पुण्यतिथी साजरी करण्यात येत आहे. यानिमित्त श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत दि.०१ ऑक्टोबर, २०१७ पासुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास सुरुवात करण्यात आली असून श्रीसाईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ हा श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवाचा सांगता सोहळा साजरा करण्यात येणार आहे. याकरीता गतवर्षी श्रींचे आराधना विधीची पूजा समाधी मंदिराचे पहिल्या माळयावर करण्याऐवजी इतरत्र करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

विभागाचा अभिप्राय:- श्रींचे समाधी मंदिरास(बुटी वाड्यास) १०० वर्षे पुर्ण झाली असल्याने सदर वास्तू अतिशय जुनी झाली असून तिचे संवर्धन होणे व जपवणूक करणे ही श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेची अतिशय महत्वाची जबाबदारी आहे. याकरीता समाधी मंदिराचे वरील भागात भारदस्त किंवा जड वस्तू ठेवण्यात येत नाही. याकरीता समाधी मंदिराचे वरील वास्तूवर वर्दळ रहित ठेवली जाते.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ ते पुण्यतिथी उत्सव-२०१८ अखेर श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त वर्षभर विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम घेण्यात येत आहे. या शताब्दी महोत्सवाची सांगता या दृष्टीने सन-२०१८चे (दसरा मुख्य दिवस) आराधना विधी पूजेस अनन्य साधारण महत्व आहे. श्रींचे आराधना विधीचे पूजा समाधी मंदिराचे पहिल्या माळ्यावर करण्यात येते. याठिकाणी संस्थानचे विद्यमान मा.अध्यक्ष महोदय (सपत्नीक) यांचे हस्ते पूजा करण्यात येते व त्यांचे समवेत स्वइच्छेनुसार विद्यमान मा.उपाध्यक्ष, सर्व विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी,मा.प्रशासकीय अधिकारीव इतर अधिकारी त्याचप्रमाणे संस्थानचे माजी अध्यक्ष, माजी विश्वस्त, माजी अधिकारी, काही महत्वाचे देणगीदार साईभक्त, काही ग्रामस्थ व इतर असे अनेक इच्छुक व्यक्ती श्रींचे आराधना विधीचे पूजेसाठी येतात. दिवसेंदिवस श्रींचे आराधना विधी पूजेस येणा-या व्यक्तींमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास येत आहे. याकरीता मागील काही वर्षांपासुन श्रींचे आराधना विधीकरीता सुरुवातीस येणारे काही व्यक्तींनाच प्रवेश देण्यात येत असून उर्वरित व्यक्तींना पूजेस असलेले व्यक्तींचे दर्शनानंतर दर्शनास सोडण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे या वर्षी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता या वर्षीचे श्रींचे आराधना विधीकरीता हजर राहणेसाठी विश्वस्त, देणगीदार, ग्रामस्थ व अनेक साईभक्त इच्छुक असतील. त्यामुळे समाधी मंदिराचे पहिल्या माळ्यावर सदर विधी करणे योग्य होणार नाही, असे नम्र मत आहे. तसेच ऐन उत्सवामध्ये दर्शनास न सोडल्याने अथवा लवकर सोडले-उशीरा सोडले याबाबत वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्रींचे आराधना विधीचे पूजा समाधी मंदिराचे समोरीलमुख दर्शन हॉलचे स्टेजवर करणे सोईचे राहील, असे नम्र मत आहे. या कालावधीत मुख दर्शन बंद ठेवणेबाबत परिस्थीतीनुरुप निर्णय घेता येईल. तसेच या वर्षी आराधना विधी प्रसाद भोजन व्यवस्था मागील वर्षाप्रमाणे श्रीसाई प्रसादालयात करता येईल.

तरी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ चे आराधना विधीची जागा निश्चित होणेकामी निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवा निमित्त श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ चे आराधना विधीची पूजा समाधी मंदिराचे समोरील मुख दर्शन हॉलचे स्टेजवर करणेस मान्यता देण्यात आली. तसेच जे समिती सदस्य श्रींचे आराधना विधीचे पुजेस बसण्यास इच्छुक असतील त्यांना बसु द्यावे. पुजा संपल्यानंतर आराधना विधी प्रसाद भोजन व्यवस्था मागील वर्षाप्रमाणे श्री साई प्रसादालयात करणेत यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगतानिमित्त पंचधातूचा ध्वज तयार करुन लेंडीबागेतील स्तंभावर लावणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने श्रीसाईबाबांचे समाधीस १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्रींचे पुण्यतिथी उत्सव-२०१७ ते पुण्यतिथी उत्सव-२०१८ अखेर शताब्दी वर्षे म्हणून साजरा करण्यात येत आहे. श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सवाचे शुभारंभाचे दिवशी ध्वज तयार करुन दि.०१/१०/२०१८ रोजी श्रींचे रथामध्ये शिर्डी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली व बांधकाम विभागामार्फत लेंडीबागेतील धबधब्याजवळ उभारण्यात आलेल्या पितळी स्तंभावर मा.महामहिम राम नाथ कोविंद, राष्ट्रपती, भारत गणराज्य यांचे हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला आहे. त्यांचे हस्ते सकाळी १०.५५ वा लेंडीबागेतील ध्वजस्तंभावर श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाची शुभारंभानिमित्त “ध्वज”फडकवुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दीचे उद्घाटन करण्यात आले आहे.

प्रस्ताव:- माहे-ऑक्टोबर-२०१८ मध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगतानिमित्त पंचधातूचा ध्वज देणगीदाखल तयार करुन मान्यवरांचे हस्ते पूजन करुन कायम स्वरुपी लेंडीबागेतील शताब्दी स्तंभावर बसविणेस मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस मान्यता असावी.

विभागाचा अभिप्राय:- शताब्दी कक्षाचे जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/शताब्दी/१४३१/२०१७, दि.२०/०६/२०१७चे इतिवृत्तातील अ.क्र.३चे निर्देशानुसार श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त ध्वज निर्मिती करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०२, निर्णय क्र.८३२ नुसार ध्वज निश्चिती करुन श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सवाचे शुभारंभाचे दिवशी दि.०१/१०/२०१८ रोजी श्रींचे रथामध्ये शिर्डी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली व बांधकाम विभागामार्फत लेंडीबागेतील धबधब्याजवळ उभारण्यात आलेल्या पितळी स्तंभावर बसविण्यात आला आहे. तसेच श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवातील प्रत्येक उत्सवामध्ये नवीन ध्वज बसविण्यात आला आहे.

सन-२०१५ मध्ये नाशिक येथे झालेल्या कुंभेमेळयाचे वेळी त्याठिकाणी कुंभमेळयाचा तांब्याचा ध्वज तयार करुन कुशावर्तावर मान्यवरांचे हस्ते लावण्यात आला होता. या पार्श्वभुमीवर श्रीपुण्यतिथी उत्सव-२०१८ हा श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवाचा सांगता समारंभ आहे. यानिमित्त लेंडीबागेतील शताब्दी स्तंभावर श्रीसाईबाबांचे चित्र असलेला, श्रद्धा-सबुरी नांव असलेला तसेच श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव असे नांव असलेला योग्य त्या आकाराचा पंचधातूचा ध्वज तयार करता येईल. तसेच मान्यवरांचे हस्ते शताब्दी महोत्सव-२०१८ चे वेळी स्तंभावर कायमस्वरुपी बसविणेबाबतचा निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबागेतील ध्वज स्तंभावर पंचधातूचा ध्वज लावण्याचा प्रसताव आमान्य करण्यात आला त्याऐवजी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे सांगतानिमित्त लेंडीबागेतील स्तंभावर कापडी ध्वज लावणेत यावा, प्रत्येक उत्सवाचे वेळी ध्वज बदलणेत यावा तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त शताब्दी ध्वजाची प्रतीकृती लहान आकारात तयार करुन साई भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- मंदिर विभागप्रमुख/ लेखाशाखा विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये वीणा, पोथी, फोटो, अध्याय वाचन व पाद्यपुजा इ.साठी मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नावे निश्चीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव, श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव पुर्व परंपरेनुसार पार पाडले जातात. सदरच्या प्रत्येक उत्सवात पहाटे व्दारकामाईत अखंड पारायणास सुरुवात होते तत्पूर्वी श्रींचा वीणा, पोथी, फोटो,मिरवणूकीने गुरुस्थानमार्गे व्दारकामाईत येतात व मा. व्यवस्थापन समितीचे

सदस्यांच्या हस्ते अंखड साईसच्चरित पारायणास व्दारकामाईत सुरवात होते. तसेच श्रींचे स्नान झाल्यानंतर समाधि मंदिरात मा. व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे हस्ते पाद्यपुजा पार पाडली जाते.

श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६ पासून सदरच्या कार्यक्रमात भाग घेतलेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची माहिती खालीलप्रमाणे..

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१६**

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १०/१०/२०१६. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस** |
| | | **वीणा**- मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**पोथी**– मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>**प्रतिमा** - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य / *मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी* |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१** - मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले – सदस्य<br>**अध्याय क्र.२** - मा. सौ.अनिताताई विजय जगताप – पदसिध्द सदस्य<br>**अध्याय क्र.३** - मा.सौ.सरस्वती भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४**- मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष |
| ११/१०/२०१६. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस** |
| | | **वीणा** - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>**पोथी** – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य |
| | | **प्रतिमा**- १) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य, २) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष २) मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य ३) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम** – १) मा. श्री सुरेश हावरे, अध्यक्ष २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ३) श्री.सचिन तांबे, सदस्य ४) मा.ॲड.मोहन जयकर, सदस्य ५) मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |
| | सकाळी १०.४५वाजता | **आराधना विधी कार्यक्रम**- मा.अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| १२/१०/२०१६. | | **तृतीय दिवस** |
| बुधवार | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य व श्री.सचिन तांबे, सदस्य |
| १३/१०/२०१६ | | **सांगता दिवस** |
| गुरुवार | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.**श्री.बाजीराव शिंदे , कार्यकारी अधिकारी** |

**श्री रामनवमी उत्सव २०१७**

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| ०३/०४/२०१७. सोमवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस** |
| | | **वीणा**- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**पोथी**– मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील, सदस्य<br>**प्रतिमा**-०१)मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे , सदस्य ०२) मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** – **अध्याय क्र.१** - मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२** - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>**अध्याय क्र.३** - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.४** - मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - मा.सौ. योगिता अभय शेळके पाटील , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| दिनांक | वेळ | **उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे** |
| ०४/०४/२०१७. मंगळवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस** |
| | | **वीणा** - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**पोथी** – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | | **प्रतिमा**- १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले २) मा.डॉ.राजेंद्र राजाबली सिंग , सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा**- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |

| | | |
|---|---|---|
| ०५/०४/२०१७<br>बुधवार | <br>सकाळी ६.०० वाजता | **सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम , उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१७**

| दिनांक | वेळ | **उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे** |
|---|---|---|
| ०८/०७/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस**<br>वीणा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>पोथी– मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>प्रतिमा - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ - मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम – उपाध्यक्ष<br>अध्याय क्र.२ मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे – सदस्य<br>अध्याय क्र.३ - मा.सौ.योगिता शेळके पाटील सदस्या<br>अध्याय क्र.४ - मा.श्री.सचिन भागवत तांबे, सदस्य<br>अध्याय क्र.५ - मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा – मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.- कार्यकारी अधिकारी |
| ०९/०७/२०१७.<br>रविवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस**<br>वीणा - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>पोथी – मा. श्री सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>प्रतिमा- १) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले व मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | <br>सकाळी ६.०० वाजता | सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा- मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| १०/०७/२०१७<br>सोमवार | सकाळी ६.१५ वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक – मा.डॉ.संदीप आहेर - उपकार्यकारी अधिकारी |

**श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७**

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०९/२०१७<br>शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस**<br>**वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी-** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**प्रतिमा-** मा.ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य व मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन-**<br>**अध्याय क्र.१** - १.मा. सौ. सरस्वती वाकचौरे व मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे–सदस्य<br>**अध्याय क्र.२** ते ४ - २. मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - ३.मा. सौ. शेळके पाटील |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा -** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| ३०/०९/२०१७.<br>शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस**<br>**वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी -** मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**प्रतिमा-** १) मा. ॲड.मोहन मोतीराम जयकर, सदस्य २) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम -** १) मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व २)चंद्रशेखर कदम , उपाध्यक्ष ३) श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य ४) मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य<br>५)मा. सौ.योगिताताई शेळके पाटील, सदस्य ६) मा.श्री. धंनजय निकम,उपजिल्हाधिकारी<br>७) मा.श्री. मनोज घोडेपाटील – उपजिल्हाधिकारी. |
| | सकाळी १०.३० वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष व उपस्थित सदस्य |
| ०१/१०/२०१७.<br>रविवार | <br>सकाळी ६.०० वाजता | **तृतीय दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से. मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ०२/१०/२०१७<br>सोमवार | <br>सकाळी ६.०० वाजता | **सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -** मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |

**श्री रामनवमी उत्सव २०१८**

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २४/०३/२०१८ शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस** |
| | | **श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br>**वीणा-** मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी**– मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**प्रतिमा** -१) मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>२) मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन - अध्याय क्र.१** - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.२** - मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.३** - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.४** - मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**अध्याय क्र.५** - मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्रीमती. रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा. श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| २५/०३/२०१८ रविवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस** |
| | | **श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक**<br>**वीणा -** मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी** – मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>**प्रतिमा-** १) मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>२) मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. प्रताप भोसले, सदस्य |
| | सांय. ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा** – मा.श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २६/०३/२०१८. सोमवार | | **उत्सवाचा सांगता दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.३० वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक** – मा.श्री. धंनजय निकम, उपजिल्हाधिकारी |
| | सांय. ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८**

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी झालेल्या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २६/०७/२०१८. गुरुवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी-** मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**प्रतिमा** - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य व<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन** –<br>**अध्याय क्र.१** - मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य<br>**अध्याय क्र.२** - मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य<br>**अध्याय क्र.३** - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>**अध्याय क्र.४** - मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>**अध्याय क्र.५** - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | **श्रींची पाद्यपूजा** – मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य |
| २७/०७/२०१८. शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस** |
| | | **वीणा -** मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य<br>**पोथी** – मा. सौ. योगिताताई शेळके पाटील, सदस्या<br>**प्रतिमा-** मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष व<br>मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | **श्रींची पाद्यपूजा-** मा. श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य |
| २८/०७/२०१८ शनिवार | | **सांगता दिवस** |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा. श्रीमती रुबल अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी |
| | सकाळी ६.१५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक-** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनीधी<br>श्री. धनंजय निकम, उपजिल्हाधिकारी |

सन २०१६ पासूनचे उत्सवातील कार्यक्रमात मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची सहभागाची माहिती खालीलप्रमाणे...

| अ.नं. | सदस्यांचे नाव | श्री साईसच्चरित (पोथी) | प्रतिमा | वीणा | अध्याय वाचन | पाद्यपुजा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष | ०२ | - | - | - | ०६ |
| ०२ | मा.श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष | - | ०१ | ०६ | ०५ | ०६ |
| ०३ | मा.डॉ.मनीषा शामसुंदर कायंदे,सदस्य | - | - | - | - | - |
| ०३ | मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य | ०१ | ०७ | - | ०६ | ०२ |
| ०४ | मा.श्री.प्रताप सखाहरी भोसले, सदस्य | - | ०३ | - | ०१ | ०१ |
| ०५ | मा.डॉ.राजेंद्र राजा बली सिंह , सदस्य | - | १ | - | - | - |
| ०६ | मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य | ०५ | ०२ | ०१ | ०६ | ०२ |
| ०७ | मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य | ०१ | ०३ | ०४ | ०२ | ०४ |
| ०८ | मा.रविंद्र गजानन मिर्लेकर,सदस्य | - | - | - | - | - |
| ०९ | मा.अमोल गजानन कीर्तीकर, सदस्य | - | - | - | - | - |
| १० | मा.सौ.योगिताताई अभय शेळके पाटील सदस्य | ०३ | - | - | ०५ | - |

आता श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मधील कार्यक्रमांसाठी मान्यवरांच्या नावांची निश्चिती करणे आहे. तरी वीणा, पोथी, फोटो, अध्याय वाचन, पाद्यपुजा यातील सहभागाबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. . तरी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मान्यवरांची नावे निश्चित होणेस मान्यतेसाठी सादर.

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १७/१०/२०१८<br>बुधवार | पहाटे ५.०० वाजता | **प्रथम दिवस** |
| | | **वीणा-**<br>**पोथी-**<br>**प्रतिमा-** |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –**<br>**अध्याय क्र.१ –**<br>**अध्याय क्र.२ -**<br>**अध्याय क्र.३ -**<br>**अध्याय क्र.४ –**<br>**अध्याय क्र.५ -** |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | **श्रींची पाद्यपूजा –**<br>**श्रींची पाद्यपूजा -** |
| १८/१०/२०१८.<br>गुरुवार | पहाटे ५.०० वाजता | **मुख्य दिवस** |
| | | **वीणा -**<br>**पोथी -**<br>**प्रतिमा-** |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | **श्रींची पाद्यपूजा –**<br>**श्रींची पाद्यपूजा -** |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम -** |
| | सकाळी १०.३० वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** |
| १९/१०/२०१८<br>शुक्रवार | | सांगता दिवस |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायं. -६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –**<br>**श्रींची पाद्यपूजा –** |
| | सकाळी ६.१५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक -** मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |

निर्णय क्र.५६१ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव २०१८ मधील कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे मान्यवरांच्या नावांची निश्चिती करण्यात आली.

| दिनांक | वेळ | उत्सवातील कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| १७/१०/२०१८ बुधवार | पहाटे ५.०० वाजता | प्रथम दिवस |
| | | वीणा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>पोथी- मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे<br>प्रतिमा- मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर<br>मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे |
| | पहाटे ५.१५ वाजता | अध्याय वाचन –<br>अध्याय क्र.१ – मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर<br>अध्याय क्र.२ - मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे<br>अध्याय क्र.३ - मा.सौ.योगिताताई अभय शेळके पाटील<br>अध्याय क्र.४ – मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>अध्याय क्र.५ - मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा – मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>श्रींची पाद्यपूजा - मा.सौ.योगिताताई अभय शेळके पाटील |
| १८/१०/२०१८. गुरुवार | पहाटे ५.०० वाजता | मुख्य दिवस |
| | | वीणा - मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे<br>पोथी - मा.सौ.योगिताताई अभय शेळके पाटील<br>प्रतिमा- मा. श्री. चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष<br>मा. ॲड. मोहन मोतीराम जयकर |
| | सकाळी ६.०० वाजता<br>सायंकाळी | श्रींची पाद्यपूजा – मा.श्री. सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष<br>श्रींची पाद्यपूजा - मा. श्री. भाऊसाहेब राजाराम वाकचौरे |
| | सकाळी ९.०० वाजता | भिक्षा झोळी कार्यक्रम - सर्व विश्वस्त |
| | सकाळी १०.३० वाजता | आराधना विधी कार्यक्रम- सर्व विश्वस्त |
| १९/१०/२०१८ शुक्रवार | <br>सकाळी ६.०० वाजता<br>सायं. -६.०० वाजता | सांगता दिवस<br>श्रींची पाद्यपूजा – मा.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>श्रींची पाद्यपूजा – मा. श्री. बिपीनदादा शंकरराव कोल्हे |
| | सकाळी ६.१५ वाजता | गुरुस्थान येथे रुद्राभिषेक - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी |

(कार्यवाही-शताब्दी कक्ष प्रमुख / मंदिर विभाग प्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **श्री साईबाबा यांच्या चरण पादुका विदेशात जाऊ न देण्याबाबत सचिन निवृत्ती शिंदे यांचे पत्र.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समिती ठरावः-

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७

"...पादुका दर्शन सोहळ्यासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात...."

प्रस्तावनाः- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

या अनुषंगाने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी श्री साईबाबा संस्थानमार्फत तयार करण्यात आलेला कृती आराखडा मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता. या आराखडयामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे या शिर्षकाखाली " देशातील विविध शहरात तथा राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी महोत्सवाचे व श्री साईबाबांच्या प्रचार-प्रसारासाठी साई भजन संध्या व इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करणे. तसेच जाहिरात प्रसिध्दी व शताब्दी महोत्सवाची देशभरात माहिती देणेकरीता साईरथ यात्रा आयोजन " याचा समावेश करणेत आलेला होता.

उपरोक्त आराखडयास मा. मुख्यमंत्री महोदय यांनी दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार देशातील विविध शहरात तथा राज्यांत साईरथ व इतर प्रवासी साधनांद्वारे श्रींचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजन करण्यात येत आहे.

तथापि विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्र.पी.जो.पो-२०१८ सं.क्र.११४२/का.१६ दि.१०/०८/२०१८ रोजी यांनी संस्थानला खालीलप्रमाणे पत्र पाठविले आहे.

श्री. सचिन निवृत्ती शिंदे यांनी मा. पंतप्रधान महोदय यांना सादर केलेला दि.०२/०६/२०१७ रोजीचा अर्ज यासोबत पाठविण्यात येत आहे.

सदर अर्जात त्यांनी श्री साईबाबा यांच्या चरण पादुका विदेशात जाऊ न देण्याची विनंती केली आहे.

श्री. सचिन निवृती शिंदे यांचा सदरचा अर्ज आवश्यक त्या कार्यवाहीसाठी आपल्याकडे अग्रेषीत करण्यात येत आहे. या अनुषंगाने कार्यवाही केलेनंतर या संदर्भातील अहवाल शासनास सादर करून अर्जदारस परस्पर कळविण्यात यावे.

उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री. शिंदे यांनी मा.प्रधानमंत्री महोदय यांना पाठविलेल्या पत्रात खालीलप्रमाणे मजकूर नमूद केलेला आहे.

"..मा. प्रधानमंत्रीजी, मैं साईबाबा के चरणों से पावन शिरडी का रहनेवाला हूँ शिरडी में रोज हजारों भक्त साईदर्शन के लिए देश विदेश से आते है आनेवाली विजयादशमी से बाबा की समाधी शताब्दी महोत्सव होने जा रहा है उसके प्रचार और प्रसार हेतु यहॉ का कार्यकारी मंडल बाबा की चरण पादुका विदेश ले जाना चाहता हैं हम स्थानिक भक्त इसके विरोध में है. विरोध का कारण है कि विदेश में सुरक्षा कारणों से बाबा की चरण पादुका के साथ गलत व्यवहार किया जा सकता है जो हमारी धार्मिक भावनाओं को ठेस पहुंचा सकता है बाबा की यह चरण पादुका सौ देडसौ साल पुरानी है जो हमारी धार्मिक धरोहर है अंतः हम आपसे प्रार्थना करते है कि साईबाबा की चरण पादुका विदेश ले जाने की व्यवस्थापन मंडल की योजना को आप धार्मिक कारणों से रोक लगाए आपका बहुत बहुत धन्यवाद.."

प्रस्तावः-

तरी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील श्री साईबाबा यांच्या चरण पादुका विदेशात जाऊ न देण्याचे पत्र मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५६२ सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात आला. (कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) ता. राहाता, जि. अहमदनगर टप्पा-१ चे ई निविदेतील वाणिज्यीक देकार (Commercial Bids) उघडणेबाबत निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नांव | वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) (टप्पा-१) |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४/०४/२०१८, निर्णय क्रं.२३९.<br>मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०२/०५/२०१८, निर्णय क्रं.२८७. |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१८,१७,४९,५४५/-<br>रु.१४,५३,९९,६३६/- (२०% कपात करुन) |
| ४) | राज्य शासनाची प्रशासकिय मान्यता | मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची दि.०७/०२/२०१८ रोजी अंदाजे रु.२७,१३,०३,९८०/- मात्रचे खर्चास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली आहे. |
| ५) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | टप्पा-१ अंतर्गत शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे. |
| ६) | निविदा तपशिल | दि.०४/०४/२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहु जाहिरातीनुसार टप्पा-१ कामाचा ई-निविदा कालावधी दि.०७/०४/२०१८ ते दि.१०/०५/२०१८ अखेर होता. दि.२५/०४/२०१८ रोजीचे निविदापूर्व बैठकीमध्ये ठरलेप्रमाणे ई-निविदा सादर करणेसाठी दि.१७/०५/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती. त्यानंतर सदरहू प्रकल्प मोठया स्वरुपाचा असल्याने THE INDIAN HUME PIPE |

| | | |
|---|---|---|
| | | CO.LTD., PUNE व AastroPune Systems Pvt.Ltd., Ahmedabad यांनी निविदा सादर करणेसाठी मूदतवाढीची मागणी केली होती. दि.१६/०५/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी दि.०१/०६/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती.<br>उपरोक्त विहीत कालावधीत ०१ ई-निविदा प्राप्त झाल्याने दि.०२/०६/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी दि.१४/०६/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती. याकामी पुन्हा LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD., Kolhapur यांनी मुदतवाढ देणेची मागणी केल्याने दि.२५/०६/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती.<br>याकामी परत एकदा R.A.GHULE, Palghar व Dilip Raut, Sascon Infrastructure यांनी दि.२५/०६/२०१८ रोजी मुंबई उपविभागात मुसळधार पाऊस पडत असल्याने कार्यालयातील बहुतांशी कर्मचारी वर्ग उपस्थित राहु शकला नाही. सनदी लेखापाल चे कार्यालयातील विद्युत पुरवठा खंडीत होता व नेटवर्क यंत्रणा पूर्णपणे नादुरुस्त झाली होती. या योजनेचा देकार भरणे शक्य झाले नाही. यामुळे मुदतवाढ देणेची विनंती केली. दि.२६/०६/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये याकामी दि.०२/०७/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली.<br>उपरोक्त कामी दि.०७/०४/२०१८ ते दि.०२/०७/२०१८ या कालावधीत खालील ०५ ठेकेदारांकडुन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. |
| | | १. LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur<br>२. R.A.GHULE, Palghar.<br>३. Shriya Civil Engneers Pvt.Ltd.<br>४. Tejus Construction & Infrastructure Pvt.Ltd.<br>५. THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE.<br>उपरोक्त ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे दि.०९/०७/२०१८ रोजीचे खरेदी समितीमध्ये उघडणेत आलेले आहेत. सदर तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची तपासणी या प्रकल्पाचे सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन होणे आवश्यक असल्याने यासाठी मा.मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना इकडील विभागाकडील दि.११/०७/२०१८ व दि.१६/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले.<br>सदर तांत्रिक ई-निविदांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर यांचेकडुन तांत्रिक छाननी केली असता, त्यामध्ये R.A.GHULE, Palghar Thane यांनी सादर केलेल्या केलेल्या कागदपत्रांमध्ये किमान पात्रता निकषामध्ये नमुद केल्यानुसार त्यांची फर्म काळया यादीत समाविष्ट केले नसलेचे प्रमाणपत्र दिलेले होते मात्र arbitration & litigation record बाबत काहीही उल्लेख आढळून येत नसलेबाबत कळविण्यात आले. याबाबत दि.०१/०८/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.१२/०४/२०१७ रोजीचे शासन निर्णय क्रं.सीएटी २०१७/प्र.क्र.०८/ई.मा-२ अन्वये शर्त क्रं.४.५.२ पृष्ट क्रं.१४ वर नमुद तरतुदीनुसार स्पष्टीकरण सादर करणेकामी R.A.GHULE, Palghar Thane यांना जा.नं.एसएसएसटी/वशी/पाणी पुरवठा/२१८३/२०१८, दि.०२/०८/२०१८ अन्वये याबाबतचा स्वयंस्पष्ट खुलासा सादर करणेसाठी पत्र देण्यात आलेले होते.<br>याविषयी मे.आर.ए.घुले, पालघर (ठाणे) यांचेकडुन दि.०२/०८/२०१८ |

<table>
<tr><td></td><td></td><td>व दि.१०/०८/२०१८ रोजी ई-मेलव्दारे पत्र प्राप्त झाले. मे.आर.ए.घुले, पालघर (ठाणे) यांनी सादर केलेला स्वयंस्पष्ट खुलासा मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांना सादर करुन त्यांचेकडुन तांत्रिक निविदांचा अंतिम अहवाल घेणेसाठी दि.१८/०८/२०१८ रोजी पत्र देणेत आलेले होते.<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडुन याबाबतचा अंतिम अहवाल सादर करणेत आलेला असून सोबत जोडलेला आहे.</td></tr>
<tr><td>अ)</td><td>निविदा कालावधी</td><td>दि.०७/०४/२०१८ ते दि.०२/०७/२०१८.</td></tr>
<tr><td>ब)</td><td>तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ</td><td>दि.०९/०७/२०१८ सकाळी ११:०० वाजता.</td></tr>
<tr><td>क)</td><td>निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या</td><td>०५ ठेकेदार.</td></tr>
<tr><td>ड)</td><td>तांत्रिक निविदेत पात्र ठेकेदार</td><td>०३ ठेकेदार.</td></tr>
<tr><td>इ)</td><td>सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय?</td><td>होय.</td></tr>
<tr><td>ई)</td><td>सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय?</td><td>होय.</td></tr>
<tr><td>उ)</td><td>अंदाजपत्रकिय मंजूर रक्कम</td><td>रु.१८,१७,४९,५४५/-<br>रु.१४,५३,९९,६३६/- (२०% कपात करुन)</td></tr>
<tr><td>८)</td><td colspan="2">संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे शिफारशीप्रमाणे ठेकेदारांच्या तांत्रिक पात्रतेविषयीचा तपशिल:-<br>
<table>
<tr><th>अ.नं.</th><th>ठेकेदाराचे नांव</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>०१</td><td>LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur</td><td>पात्र.</td></tr>
<tr><td>०२</td><td>R.A.GHULE, Palghar.</td><td>पात्र.</td></tr>
<tr><td>०३</td><td>Shriya Civil Engneers Pvt.Ltd.</td><td></td></tr>
<tr><td>०४</td><td>Tejus Construction & Infrastructure Pvt.Ltd.</td><td></td></tr>
<tr><td>०५</td><td>THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE.</td><td>पात्र.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**प्रस्ताव:-** उपरोक्त वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) (टप्पा-१) प्रकल्पासाठी ई-निविदा मागविणेसाठी दि.०४/०४/२०१८ रोजी जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहू जाहिरातीनुसार ई-निविदा सादर करणेसाठी दि.१०/०५/२०१८ अखेर मुदत देणेत आलेली होती. त्यानंतर दि.१७/०५/२०१८ अखेर, दि.०१/०६/२०१८ अखेर अशी ०२ वेळेस मुदतवाढ देणेत आली. त्यावेळी वाढीव मुदतीअखेर ०१ निविदा प्राप्त झाल्याने दि.१४/०६/२०१८ अखेर, दि.२५/०६/२०१८ अखेर व दि.०२/०७/२०१८ अखेर अशी ०३ वेळेस मुदतवाढ देणेत आलेली होती. दि.०२/०७/२०१८ अखेर एकुण ०५ ठेकेदारांकडुन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी ०३ ठेकेदार पात्र होत असल्याचा अहवाल दिला आहे.

तरी याकामी प्राप्त होणारे ०३ ठेकेदार यांचे वाणिज्यिक देकार (Price Bids) उघडणेकामी निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्भव धरुन) (टप्पा-१) प्रकल्पासाठी ई-निविदा वाणिज्यिक देकार उघडणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेत दि.०६/०९/२०१८ रोजी मान्यता दिली त्यानुसार वाणिजीक देकार उघडण्यात आले त्यामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.**

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | LAXMI CIVIL ENGINEERING PVT. LTD. Kolhapur | २५,६७,१९,८२०.०९ | L3 |
| ०२ | R.A.GHULE, Palghar. | २३,९१,०७,०३९.९० | L2 |
| ०३ | THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE. | २३,८७,१४,५५५.१० | L1- निम्नतम |

यामध्ये THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० इतके असुन अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा ३१.३४ % अधिक आहे. अंदाजपत्रकीय रक्कम २०१६-१७ चे DSR प्रमाणे आहे, त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नाशिक कडून २०१८-१९ चे DSR प्रमाणे अंदाजपत्रक मागवून घ्यावेत. तसेच प्रस्तृत प्रकरणी टप्पा क्रं.-१ स्तर शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribution Network व पाईपलाईनचे काम करणे करीता शासनाची प्रशासकीय मान्यता रुपये २७,१३,०३,९८०/- मात्र इतकी आहे.

मा. प्रधान सचिव, विधी व न्याय शासन निर्णय क्रं.सासंवि-२०१५/१००७ /प्र.क.१७७ (भाग-१) /का.१६ दि. ०७ फेब्रुवारी २०१८ यांचे पत्रान्वये, योजनेसाठी आवश्यक उद्भव प्रमाणपत्र , पाणी आरक्षण, पाणी गुणवत्ता तपासणी अहवाल, उपांगांसाठी लागणा-या जमिनीची समंतीपत्रके व अनुषंगिक परवानग्या प्राप्त झाल्याशिवाय योजनेचे कार्यादेश देण्यात येऊ नयेत, असे निर्देश आहेत. तथापी वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना ता.राहाता जि.अहमदनगर (निळवंडे धरण उद्भव धरुन ) या योजनेचा टप्पा क्रं-१ व टप्पा क्रं.-२ ची कामे स्वतंत्र स्वरुपाची असल्याने शासनाने टप्पा क्रं.-१ व टप्पा क्रं.-२ दोन स्वतंत्र टप्प्यात राबविणेस मान्यता दिलेली आहे, तसेच टप्पा क्रं.-१ ( शिर्डी परिसरात करावयाची WTP, ESR, Distribut Network व पाईप लाईनची कामे करणे) इ. कामे अंतर्गत पाणी पुरवठा वितरनासाठी असून आज रोजी याकामी दारणा धरणावरुन आरक्षण मंजूर आहे त्यामुळे शासन निर्णयातील अट शिथील करुन टप्पा क्रं.-१ साठी कार्यारंभ आदेश देणेकामी शासनाची मान्यता घ्यावी यासाठी शासनाला त्वरीत प्रस्ताव सादर करावा, असे ठरले.

तसेच THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे प्राप्त झालेले निम्नतम दर रुपये २३,८७,१४,५५५.१० असून त्यांनी वाटाघाटी अंती लेखी स्वरुपात रु. २३,८१,००,०००/- इतक्या रकमेस सदरचे काम करणेस सहमती दर्शविली आहे. अंदाजपत्रकीय रक्कम ही सन २०१६-१७ चे DSR दराप्रमाणे असल्याने THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांचे निम्नतम दर स्विकारण्यात यावे असे ठरले तथापि टप्पा क्रं.-१ साठी शासनाने Work Order देण्यासाठी अटी शिथील करुन मान्यता दिल्यानंतर THE INDIAN HUME PIPE CO.LTD., PUNE यांना कार्यारंभ आदेश द्यावा, असे ठरले.

(कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०८ वुलन ब्लॅकेट नमुना व न्युनतम निविदाधारक मे. बांठिया एंटरप्रायजेस, पुणे यांनी ब्लॅकेट मिलचे मालक यांना व्यवस्थापन समितीचे सभेचे दिवशी भेट मिळणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता वुलन ब्लॅकेट खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. यामध्ये मे.बांठिया एंटरप्रायजेस,पुणे यांचे दर बुलन ब्लॅकेटसाठी न्युनतम होते. त्यांचेशी दि.२२.०१.२०१८ च्या उप समितीचे सभेत चर्चा वाटाघाटी होऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०२.२०१८ चे सभेत त्यांचे दर मान्य करण्यात आले होते.

मे.बांठिया एंटरप्रायजेस,पुणे यांना दि.०७.०३.२०१८ चे पत्रान्वये इरादा पत्र देण्यात येऊन वुलन ब्लॅकेट नमुना मागविण्यात आला होता. सदर नमुना Textile committee lab, Mumbai येथे तपासणीसाठी पाठविला होता. यामध्ये ५ Parameters मध्ये फरक असल्यामुळे पुन्हा त्यांचेकडे ब्लॅकेटचा नमुना मागविला होता. त्यानंतर त्यांनी ई-मेलद्वारे सदर वुलन ब्लॅकेट तयार करणारे मिलचे मालक यांनी संस्थानच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या भेटीची वेळ मिळण्याची विनंती केली आहे.

वरील विनंतीस अनुसरून मे.बांठिया एंटरप्रायजेस,पुणे यांना वुलन ब्लॅकेटचे मील मालकासह दि.०६.०९.२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेला उपस्थित राहणेसाठी लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

तरी मे.बांठिया एंटरप्रायजेस, पुणे यांचेशी वुलन ब्लॅकेटबाबत चर्चा होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५६४** **मे. बांठिया एंटरप्रायजेस, पुणे हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी निविदेमध्ये नमुद केलेल्या नमुन्यानुसार वुलन ब्लॅकेटचा पुरवठा करणेबाबत विचारणा केली असता याबाबत त्यांना समर्पक उत्तरे देता आली नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरीता वुलन ब्लॅकेट खरेदीकामी निम्नतम निविदाधारक मे. बांठिया एंटरप्रायजेस, पुणे हे निविदेमध्ये नमुद केलेल्या नमुन्यानुसार वुलन ब्लॅकेटचे सॅम्पल देण्यासाठी १५ दिवसांची मुदत द्यावी, त्यांनी मुदतीत सॅम्पल सादर न केल्यास त्यांचा पुरवठा आदेश रद्द करावा व त्यांचे नावाचा काळया यादीमध्ये समावेश करुन प्रस्तुत प्रकरणी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०९** **मे. स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी संस्थानविरुध्द राहाता येथील मे. न्यायालयात दाखल केलेले दाव्याचे सद्यस्थितीबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१७-१८ चे शुध्द तूप खरेदी पुरवठादार मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि.,अंबाला यांनी पुरविलेल्या शुध्द तूपाचे लॅब रिपोर्ट्सबाबतचा प्रस्ताव संस्थानच्या भांडार विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २३.१०.२०१७ चे सभेत सादर केला होता, यामध्ये मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि.,अंबाला यांचेकडून तुप खरेदी थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.११.२०१७ चे सभेत पुर्ववत पुरवठा आदेश मिळण्याची समक्ष विनंती केली होती. तथापि सभेने त्यांना पुरवठा आदेश देता येणार नाही, परंतु त्यांचा काळया यादीत समावेश करण्याची अट शिथील करून यापुढील गाईचे तूप खरेदीकामीच्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेस त्यांना मुभा देण्यात यावी असा निर्णय घेतला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे सदर निर्णयानुसार मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांना संस्थानकडून जा.क्रंएसएसएसटी/वशी-खरेदी/४२९८/२०१७ दि.१६/११/२०१७ नुसार त्यांचे पुरवठयाची मुदत संपलेबाबत व त्यांचा पुढील तूप पुरवठा थांबवायचा निर्णय घेतलेबाबत कळविणेत आले होते.

संस्थान व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ चे सभेतील निर्णयानुसार तूप खरेदीकामीचे नवीन ई-निविदा प्रक्रियेत मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना सहभाग घेण्याची संधीही देण्यात आली होती. परंतु तांत्रिक निविदेमध्ये आर्थिक बाबीबाबतची उचित कागदपत्रे ऑनलाईन सादर न केल्यामुळे ते अपात्र ठरले होते. त्यामुळे व मागील निविदेतील पुढील कालावधीसाठीचा पुरवठा आदेश त्यांना न मिळालेमुळे, या संस्थानविषयीच्या रागातूनच त्यांनी दिनांक २६.१२.२०१७ रोजी संस्थानविरुद्ध अंबाला (हरियाणा) न्यायालयात अनाधिकारे पुरवठा आदेश रद्द केला व संस्थानला तुप पुरवठा करणेचा त्यांचा आदेश कायम करणेबाबत व संस्थानच्या तुपाचे नवीन ई-निविदा खरेदी प्रक्रियेस स्थगिती मिळावी, याबाबत दावा क्र.३६२७/२०१७ दाखल केला होता. याबाबत संस्थाननेही वेळीच उचित कागदपत्रांसह मा.न्यायालयात म्हणणे सादर केलेमुळे, मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांना मनाईहुकुम मिळालेला नव्हता. तसेच संस्थानने अंबाला येथील मे.कोर्टात म्हणणे सादर केलेनंतर मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि., अंबाला यांनी अंबाला कोर्टात दाखल केलेला दावा मागे घेऊन राहाता येथील मे.न्यायालयात याबाबत दावा दाखल केला आहे.

संस्थानने मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी पुरविलेले शुध्द तूप १६३९.६२ क्विंटल त्यांची क्विंटलची एकुण किमत रक्कम रु.६,४९,२८,९५२/- त्यांना आदा केलेली आहे.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांची सदर शुध्द तूप पुरवठयापोटी एकूण दिलेल्या पुरवठा आदेशाच्या ३ टक्के रक्कम रु.३३,२६,४००/- संस्थानकडे जमा आहे.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी मे.अंबाला येथील न्यायालयात संस्थानविरुध्द दावा दाखल केलेमुळे व ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यांची संस्थानकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- परत करणेबाबत संस्थानचे विधी सल्लागार ॲड.श्री.नितीन भवर यांचे मार्गदर्शन/सल्ला घेण्याचे ठरले होते. त्यांनी सदर रक्कम परत करण्याऐवजी संस्थानकडे जमा राहू देणेबाबत सल्ला दिला होता.

याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.७/३/२०१८ चे सभेत मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांची संस्थानकढे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.३३,२६,४००/- परत करावी अगर कसे? याबाबत संस्थानचे वकीलांनी दिलेले अभिप्रायासह प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्रं.१६३ अन्वये सदरहू बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तूप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेल्या सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला. असा निर्णय झाला होता.

मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी संसथानविरुध्द राहाता येथील मे.न्यायालयात दाखल केलेले दाव्यामध्ये संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट श्री.गोंदकर यांनी संस्थानची बाजू मांडलेली आहे. राहाता येथील मा.न्यायालयातही संस्थानचे वकीलांनी उचित न्यायालयीन पूर्तता केलेली आहे. त्यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत. सदर दावा कोपरगांव येथील न्यायालयात वर्ग होईल अशी माहिती संस्थानचे वकीलांनी दिलेली आहे. **तसेच मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांनी संस्थानकडून तूपाच्या पुरवठयाची उर्वरित रक्कम रूपये ३१,०१,३४८/- व्याजासह प्रतिवादीकडून वसुल होऊन मिळावी असा सुधारित अर्ज राहाता येथील मे.न्यायालयात सादर केला आहे. असे सांगितले आहे व त्याची प्रतही दिली आहे.**

**प्रस्ताव** – वरीलप्रमाणे मे.स्मृती प्रॉडक्ट्स प्रा.लि अंबाला यांनी राहाता येथील मे.न्यायालयात संस्थानच्या विरूध्द दाखल केलेल्या दाव्याची सदयस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर.

निर्णय क्र.५६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे मे.स्मृती प्रॉडक्टस प्रा.लि., अंबाला यांचे शुध्द तूप पुरवठयापोटी संस्थानकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम परत देऊ नये, असे ठरले मात्र दाव्याचा अंतिम निकालानंतर याबाबत निर्णय घेता येईल.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१० **दरवर्षीप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई- निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) पात्र निविदाकार यांचे व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता, निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना कार्यादेश देणेसाठी विक्रीदर निश्चीत होणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ नं. ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**"श्री साईबाबांचे जीवन कार्य,त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील."**

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना उपलब्ध करुन दिले जातात.

**प्रस्तावः-** संदर्भ क्र.०१ नुसार मा. व्यवस्थापन समिती दि.०२.०५.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३१५(२९)नुसार सन २०१९ ची दैनंदिनी, दिनदर्शिका-०१ पाने व डिलक्स, ऑफीस,कार तसेच घरगूती दिनदर्शिका छपाईकामी रु. ४,६१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

संदर्भ क्र.०२ नुसार श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी ई-निविदा सूचना शासनाचे संकेतस्थळावर, संस्थान संकेतस्थळावर, माहीती प्रसारीत करून तसेच सर्व प्रिंटीग प्रेस यांना ई-मेलव्दारे व शासकीय दराने मुंबई,ठाणे,पुणे,सोलापूर,कोल्हापूर,अहमदनगर,नाशिक,औरंगाबाद, नागपूर या शहरातील वर्तमानपत्रात शासकीय दराने प्रसिध्दी करण्यात येऊन, अपलोडसाठी दि. ०६.०८.२०१८ ते दि.१७.०८.२०१८ पर्यंत असा १२ दिवसांचा कार्यकाल देण्यात आलेला होता.

संदर्भ क्र. ०३ नुसार मा. खरेदी समिती दि.२४.०८.२०१८ रोजीची सभेत सन-२०१९ च्या साई दैनंदिनी व दिनदर्शिका ई- निविदेतील तांत्रिक बीड (Technical Bid) उघडून, निविदेतील अटी/ शर्तीनुसार ०६ स्पर्धक निविदाकारांच्या पूर्वपात्रतेविषयक कागदपत्रांची लेखाशाखेकडून छाननी केली असता, त्यांचा अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अं.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| ०१ | मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर | **पात्र** |
| ०२ | मे.ओरिएन्ट प्रिंटर्स, मुंबई | **अपात्र** |
| ०३ | मे. प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई | **पात्र** |
| ०४ | मे. सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई | **पात्र** |
| ०५ | मे.टॅको व्हिजन,मुंबई | **पात्र** |
| ०६ | मे. वेदप्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली | **पात्र** |

संदर्भ क्र. ०४ नुसार ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०५ पात्र निविदाकार यांचे मा. खरेदी समिती दि.३०.०८.२०१७ रोजीची सभेतील ई- निविदेतील व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडणेबाबतचा निविदाकारांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि. मुंबई | प्रिंट प्लस प्रा.लि, मुंबई | मे.टॅको व्हिजन, मुंबई | वेद प्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स साईज- ७.५०" x ९.७५" | २,३०,००० | **८५.४०** | ९२.०७ | १०४/- | १२०/- | ११५.०५ |
| ०२ | श्री साईबाबा डायरी पॅकेट साईज ३" x ४.५" कव्हर मेटपेट | १,००,००० | १५.९० | ११.८८ | १३/- | २५/- | **११.८०** |
| ०३ | श्री साई दिनदर्शिका ०१ पानी मोठे (१९"x२९") इंच | ३,००,००० | **१४.९६** | १९.४४ | २३/- | १६.९० | १५.६८ |
| ०४ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" इंच | १५,००० | ०.०० | ०.०० | ०.०० | **२०७/-** | २१२.८० |
| ०५ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.००" इंच | १०,००० | ०.०० | ०.०० | ०.०० | **२२३/-** | २२९.६० |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"x२७" इंच | २,००० | ०.०० | ३०३.९३ | ०.०० | **२३२/-** | ४९९/- |
| ०७ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"x०७" इंच | १५,००० | ०.०० | **११९/-** | ०.०० | १२१/- | १२२.०८ |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पेजेस) आकार ६.५०"x९.५०" कार्ड बोर्ड पेपरवर छपाई | १०,००० | ५७.५० | ५६.४० | ८२/- | ५५.५० | **५०.४०** |
| ०९ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (ऑफीस) आकार १९.५०"x२८.००" | १०,००० | २५.७० | **२४.६६** | ३३.५० | ३१.९० | २९.१२ |
| १० | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती) आकार ११.००"x १६.८०" | १०,००० | १२.१० | ११.८५ | **१०.२०** | १२.३० | १४.५६ |
| ११ | श्री साईबाबा कार कॅलेंडर (कार) आकार १३.८०" x ५.५०" | २०,००० | **५/-** | ७.१० | ७.५५ | ६.१० | ७.५६ |

मा.व्यवस्थापन समिती दि.०३.०९.२०१८ रोजीचे सभेत न्युनतम निविदाधारकांना चर्चा वाटाघाटीकामी बोलाविणेत आले असता, सदरील मिटींग मध्ये ०५ न्युनतम दरधारकांपैकी मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर व मे.टॅको व्हिजन, मुंबई हे हजर राहून त्यांनी मा.उपसमिती समोर कुठल्याही प्रकारे दर कमी केलेले नाहीत.

**मागणी:-** सन २०१९ चे दैनंदिनी व दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाईकामी प्राप्त स्पर्धक निविदाकार यांचे ई-निविदेतील व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असल्याने निम्नत्तम दर प्राप्त झालेले आहे. श्री साई समाधी शताब्दी वर्ष असल्याने लवकरात लवकर छपाई करून निम्नत्तम दरधारकांना कार्यादेश देणे आहे. करिता खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे संस्थान विक्री किंमत ठरविता येईल, असे मत आहे.

| अ.नं. | छपाई साहित्याचा तपशिल | सन-२०१९ साठी छपाई संख्या नग | मागील वर्षीचे मंजूर दर | मागील वर्षीचे विक्री दर | सन-२०१९ ई-निविदेतील L1 दर प्रती नग | सन-२०१९ वर्षासाठी विक्री दर प्रती नग |
|---|---|---|---|---|---|---|
| | **मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर** | | | | | |
| १ | श्री साई दैनंदिनी डिलक्स साईज- ७.५०" x ९.७५" | २,३०,००० | ८६/- | ८६/- | ८५.४ | ९०/- |
| २ | श्री साई दिनदर्शिका ०१ पानी मोठे (१९"x२९") इंच | ३,००,००० | १५.१२ | १५/- | १४.९६ | १५/- |
| ३ | श्री साईबाबा कार कॅलेंडर (कार) आकार ३.८०" x ५.५०" | २०,००० | - | - | ५.०० | ५/- |
| | **मे.वेदप्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली.** | | | | | |
| १ | श्री साईबाबा डायरी पॅकेट साईज ३" x ४.५" | १,००,००० | १०.५० | १०/- | ११.८० | १५/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कव्हर मेटपेट | | | | | |
| २ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पेजेस) आकार ६.५०"x९.५०" कारोनाडो पेपरवर छपाई | १०,००० | ५३.५५ | ५४/- | ५०.४० | ५५/- |
| | **मे.टॅको व्हिजन प्रिंटींग , मुंबई** | | | | | |
| १ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" इंच | १५,००० | २०१.६० | २०२/- | २०७/- | २१०/- |
| २ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.००" इंच | १०,००० | २२४/- | २२४/- | २२३/- | २२५/- |
| ३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"x२७" इंच | २,००० | २३७.४० | २३७/- | २३५/- | २४०/- |
| | **मे.सॅप प्रिन्ट प्रा.लि.मुंबई** | | | | | |
| १ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"x०७" इंच | १५,००० | १२२.३१ | १२२/- | ११९/- | १२०/- |
| २ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (ऑफीस) आकार १९.५०"x२८.००" | १०,००० | - | - | २४.६६ | ३०/- |
| | **मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई** | | | | | |
| १ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती) आकार ११.००"x १६.८०" | १०,००० | - | - | १०.२० | १५/- |

**संस्थानचे अधिनियम / ठराव यानुसार छाननी करुन शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** आर्थिक/ धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्टः–** दरवर्षीप्रमाणे सन २०१९ ची श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाई करुन भक्तांना वेळेत उपलबध करुन देणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०५ पात्र निविदाकार यांचे व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता उक्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यात अधोरेखीत व गडद केलेले निम्नत्तम दर पुर्णांकीत करून त्या दराने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका विक्री करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना संस्थान प्रकाशीत साहित्य " ना-नफा, ना-तोटा" तत्वावर विक्री करावे, असे ठरले निविदा प्रक्रीयेत प्रिंटर्सकडून GST सह दर मागविण्यात आले आहेत, तथापी प्रिंटर्सकडून साहित्य प्राप्त झाल्यानंतर विक्री करण्यासाठी आस्थापना खर्च, हमाली व इतर हाताळणी खर्च यासाठी साधारणत: १०% खर्च येतो, सदर बाब विचारात घेता छपाई खर्चात काही रक्कम वाढ करुन विक्री किंमत निश्चीत करावी, असे ठरले त्यानुसार सन २०१९ ची श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाई करुन भक्तांना वेळेत उपलब्ध करुन देणेकामी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे संस्थान विक्री किंमत ठरविण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | छपाई साहित्याचा तपशिल | सन-२०१९ साठी छपाई संख्या नग | सन-२०१९ ई-निविदेतील L1 दर प्रती नग | सन-२०१९ वर्षासाठी विक्री दर प्रती नग |
|---|---|---|---|---|
| | **मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर** | | | |
| १ | श्री साई दैनंदिनी डिलक्स साईज- ७.५०" x ९.७५" | २,३०,००० | ८५.४ | ९०/- |
| २ | श्री साई दिनदर्शिका ०१ पानी मोठे (१९"x२९") इंच | ३,००,००० | १४.९६ | १५/- |
| ३ | श्री साईबाबा कार कॅलेंडर (कार) आकार ३.८०" x ५.५०" | २०,००० | ५.०० | ५/- |
| | **मे.वेदप्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली.** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री साईबाबा डायरी<br>पॅकेट साईज ३" x ४.५"<br>कव्हर मेटपेट | १,००,००० | ११.८० | <u>१५/-</u> |
| २ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (१४ पेजेस)<br>आकार ६.५०"x९.५०"<br>कारोनाडो पेपरवर छपाई | १०,००० | ५०.४० | <u>५५/-</u> |
| | **मे.टॅको व्हिजन प्रिंटींग , मुंबई** | | | |
| १ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"x३५" इंच | १५,००० | २०७/- | <u>२१०/-</u> |
| २ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार १९.२५"x२७.००" इंच | १०,००० | २२३/- | <u>२२५/-</u> |
| ३ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज)<br>आकार १९"x२७" इंच | २,००० | २३५/- | <u>२४०/-</u> |
| | **मे.सॅप प्रिंन्ट प्रा.लि.मुंबई** | | | |
| १ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"x०७" इंच | १५,००० | ११९/- | <u>१२०/-</u> |
| २ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (ऑफीस)<br>आकार १९.५०"x२८.००" | १०,००० | २४.६६ | <u>३०/-</u> |
| | **मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई** | | | |
| १ | श्री साईबाबा वॉल कॅलेंडर (घरगुती)<br>आकार ११.००"x १६.८०" | १०,००० | १०.२० | <u>१५/-</u> |

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **अन्नपाकीटे तयार करणेकामी असलेले ठेकेदार यांना ई-निविदा प्रक्रीया होईपावेतो मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रस्तावना:- वरील विषयास अनुसरुन, श्री साई प्रसादालयातील अन्नपाकीटे तयार करणेकामी दि.यशोधरा महीला सह.उत्पा.संस्था, नाशिक यांना दि.०१/१०/२०१८ ते ३०/०९/२०१८ या कालावधीकरीता प्रती अन्न पाकीटास रु.२.६९ पैसे जी.एस.टी.सह याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे मान्येतेने कामाचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

उपरोक्त अन्नपाकीटे तयार करणेकामी असलेल्या ठेकेदारांची मुदत दि.३० सप्टेंबर २०१८ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे भक्तांची गैरसोय होऊ नये, याकरीता पुढील कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया सुरु करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळालेली आहे. त्यानूसार इकडील विभागामार्फत ई-निविदा मसुदा तयार करुन तो मसुदा "निविदा दस्तऐवज तपासणी" समितीकडून तपासून कायम करणेत येवून वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेकामी जनसंपर्क विभागाकडे दि.०४/०९/२०१८ रोजी कार्यवाहीसाठी देण्यात आलेली आहे. जाहीरात प्रसिध्द झाल्यानंतर निविदा भरणेसाठी निविदाधारकांना किमान १५ दिवसांचा कालावधी देणे अनिवार्य असते. यासर्व बाबीस साधारणतः एक ते दोन महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

अन्पाकीटे ई-निविदा प्रक्रिया दि.३०/०९/२०१८ पर्यंत मुदतीत पुर्ण होईल असे वाटते. परंतू काहीशा (उदा.मा.व्य.स.सभेच्या तारखा मागे-पुढे झाल्यास) कारणास्तव सदर प्रक्रीयेस विलंब झाला तर, सध्या असलेले अन्नपाकीटे ठेकेदार यांना करारनामातील अटी/शर्ती नूसार सन २०१८-२०१९ करीता सुरु असलेली ई-निविदा

प्रक्रिया पुर्ण होवून नवीन ठेकेदारास कार्यादेश देईपावेतो, आहे त्याच मंजूर दराने मुदतवाढ मिळणेस व त्याकामी महिन्याकाठी अंदाजे रु.८,२३,५६०/- पर्यंत खर्च अपेक्षीत असून त्यास मान्यता मिळावी असे नम्र मत आहे.

**मागणी:-** अन्न पाकीटे तयार करणेकामी असलेले सध्या-चे ठेकेदारांना, भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर, केलेल्या. करारनाम्यानूसार संबंधीत ठेकेदार दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना मुदतवाढ दयावी लागेल. करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेत सादर करणे गरजेचे आहे. असे नम्र मत आहे.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- तरी उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, श्री साई प्रसादालयामध्ये अन्न पाकीटे तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना अन्नपाकीटांअभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता ई-निविदाची प्रक्रिया पुर्ण होवून पात्र ठेकेदारास कार्यादेश देईपावेतोच्या कालावधीकरीता आहे त्याच अटी/शर्तीवर, केलेल्या करारनाम्यानूसार मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेस मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.५६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयामध्ये अन्न पाकीटे तयार करणेकामी सध्या काम करत असलेले ठेकेदार, दि.यशोधरा महिला सह.उत्पा. संस्था, नाशिक यांना अन्नपाकीटांअभावी भक्तांची गैरसोय होवू नये याकरीता आवश्यकता भासल्यास एक महिना मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील समारोप कार्यक्रमानिमित्त मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप, सांधेरोपन शस्त्रक्रिया निदान शिबीर व कॅन्सर निदान शिबीराचे आयोजन करणेबाबत व सर्व समावेशक अंदाजे रु.८२,९०,०००/- खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद** – कलम १७(१) व १७(२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समिती ठराव** – मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०२ निर्णय क्र. ५०७

**प्रस्ताविक** – उपरोक्त विषयांन्वये महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि.१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि. १८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहे. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपुर्ण जगभर विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्या व्दारे श्री साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची १०० वी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरा न करता १०० व्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असून, हे संपुर्ण वर्ष उत्साही वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे.

श्री साईबाबा यांचे महासमाधीस सन २०१८ मध्ये शंभर वर्ष पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करुन, संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. या दृष्टीने कार्यक्रमाचे नियोजन केलेले आहे. तरी शताब्दी वर्ष समारोप कार्यक्रमा निमित्त रुग्णालये विभागाकडुन दि. १२/१०/२०१८ रोजी सकाळी ०९ ते सायं. ०५ वा. या वेळेत खालील प्रमाणे शिबीरांचे आयोजन करणेत आलेले आहे.

१. मोफत सांधेरोपन निदान शिबीर (गुडघा व खुबा) - श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील समारोप कार्यक्रमा निमित्त मोफत सांधेरोपन शिबीराचे आयोजन करण्याचा मानस संस्थानच्या रुग्णालय विभागाने व्यक्त केला आहे. श्री साईबाबांचे शताब्दी वर्ष असल्यामुळे शंभर जॉईन्ट रिप्लेसमेंट शस्त्रक्रीया करणेचा मानस रुग्णालय विभागाने केला आहे. पैकी पंन्नास शस्त्रक्रीया या गुडघेरोपन व पन्नास शस्त्रक्रीया या खुब्यांच्या सांधेरोपन अशा स्वरुपात करता येतील, तसेच ५० शस्त्रक्रीया या श्री साईनाथ रुग्णालय व ५० शस्त्रक्रीया या श्री साईबाबा हॉस्पीटल येथील आर्थोपेडीक विभागातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत करता येतील. तसेच सर्व शस्त्रक्रीया या एकाच वेळी करणे अवघड असल्यामुळे रुग्णांची नांव नोदंणी झाल्यानंतर रुग्ण व ऽॉक्टर तसेच रुग्णालयाच्या सोईनुसार रुग्णांना योग्य ती तारीख देऊन पुढे तीन ते सहा माहिने इतक्या कालावधीत सर्व शस्त्रक्रीया पुर्ण केल्या जातील तसेच या सर्व शस्त्रक्रीया करणेकामी विविध प्रकारचे इंन्प्लांन्टस रुग्णांसाठी वापरावे लागतात. सदर इन्प्लांन्टस चा खर्च खालील कोष्टकात दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ.नं. | शस्त्रक्रीया | रुग्ण इंन्प्लांन्टस संख्या | एका इंन्प्लांन्टस चा खर्च | अंदाजे एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | गुडघेरोपन शस्त्रक्रीया | ५० | ४६,०००/- | २३,००,०००/- |
| ०२ | खुबा सांधेरोपन शस्त्रक्रीया | ५० | ५७,०००/- | २८,५०,०००/- |
| | **एकुण** | १०० | १,०३,०००/- | ५०,५०,०००/- |

परंतू रुग्णांची संख्या वाढल्यास सदरचा खर्च वाढू शकतो सद्यस्थितीला रुग्णालयात सदर प्रकारचे इंन्लांन्टस Consignment basis वर घेतले जातात. तरी या पद्धतीने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे Consignment basis वर सदरचे इंम्प्लांटस वापरता येतील.

सदयस्थितीला दोनही रुग्णालय मिळून सहा अस्थीरोगतज्ञ डॉक्टर पुर्णवेळ व दोन डॉक्टर्स हे व्हिजीटींग पद्धतीने उपलब्ध असून त्यांच्या सल्यानुसार सदर शस्त्रक्रीया करुन घेता येतील. जे रुग्ण शस्त्रक्रीया करणेकामी निश्चीत झालेले आहेत, अशा रुग्णांच्या सर्व तपासण्या उदा. रक्त, लघवी, एक्स-रे, ईसीजी, टुडी ईको, सीटीस्कॅन, एम.आर.आय, इत्यादी संस्थानच्या दोनही रुग्णालयात आवश्यकतेप्रमाणे मोफत करणेत येतील. परंतू सद्यस्थितीला रुग्णालयातील सीटी स्कॅन व एमआरआय मशिन बंद असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि. २२/०८/२०१८ च्या ठरावानुसार निर्णय क्र. ५०७ सदर तपासण्या या प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी यांचेकडुन करुन घेता येतील. तसेच सदर रुग्णांना लोणी येथे जाणेयेणे करीता मोफत ॲम्बुय्लॅन्स सेवा देता येईल. तसेच प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी यांना सदरचे दराप्रमाणे प्रति महिना बील अदा करता येईल. तसेच पिवळे व केशरी रेशनकार्ड असणा-या रुग्णांना सदर शिबीरामध्ये प्राधान्य दिले जाईल. शिबीरामध्ये होणा-या शस्त्रक्रिया व इतर सर्व खर्च संसथान मार्फत मोफत केला जाईल.

**०२. मोफत नेत्रतपासणी व चष्मे वाटप शिबीर** - श्री प्रकाश गंगवाणी, गिरीश ऑप्टीक्स, मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांच्या संयुक्त विद्यमाने १००० रुग्णांची मोफत नेत्रतपासणी व एक हजार रुग्णांना मोफत नंबरचे चष्मे वाटप करणेत येईल. श्री प्रकाश गंगवाणी, मुंबई यांनी आतापर्यंत संस्थान रुग्णालयात अशा स्वरुपाच्या १० शिबीरांचे आयोजन केलेले आहे. तसेच साईसमाधी शताब्दी वर्षाच्या सुरुवातीलाच श्री गंगवाणी यांनी १००० रुग्णांना मोफत चष्मे वाटप केलेले आहे. श्री गंगवाणी यांनी शताब्दी वर्षाच्या समारोपा वेळी पुन्हा शिबीर आयोजित करणेची इच्छा व्यक्त केली होती. सदर शिबीरामध्ये शिर्डी व शिर्डी परीसरातील नेत्र रुग्णांची मोफत डोळयांची तपासणी करणेत येईल. व डोळयांचा नंबर असलेल्या रुग्णांना आवश्यकतेप्रमाणे नंबरचे चष्मे वाटप करणेत येईल. सदर शिबीरामध्ये १००० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात येऊन १००० रुग्णांना मोफत नंबरचे चष्मे वाटण्याचा मानस श्री. प्रकाश गंगवाणी यांनी केलेला आहे.

**०३. मोफत कॅन्सर निदान शिबीर,-** ए.सी.जी.मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक यांचे दि.०१/०९/२०१८ रोजीचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे श्री साईबाबांचे समाधी शताब्दी वर्षे असल्यामुळे कॅन्सर निदान शिबीराचे आयोजन करणेचा मानस ए.सी.जी.मानवता कॅन्सर सेंटर यांनी केलेला आहे.

सदर शिबीरामध्ये त्यांनी सर्जिकल ॲन्कोलॉजी, मेडिकल ॲन्कोलॉजी, हिमेटो ॲन्कोलॉजी, व बोन मॅरो ट्रान्सप्लॅन्ट बाबत मोफत सल्ला देणेकामी तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती दाखविण्याचे नमुद केलेले आहे. याबरोबरच त्यांनी खालील आजाराचे निदान करणेची तयारी दर्शविली आहे.

०१. तोंडाचा कॅन्सर, ०२. स्तनाचा कॅन्सर, ०३.गर्भपिशवीचा कॅन्सर,

०४. सिकलसेल ॲनेमिया, ०५. थॅलॅसेमिया, ०६. ल्युकेमिया

सदर शिबीरामध्ये त्यांनी ३०० पेक्षा जास्त रुग्णांची निदान चाचणी करणेत येईल. याबाबत कळविले आहे. तसेच निदान झालेल्या रुग्णांवर सवलतीच्या दरात पुढील तपासण्या व उपचार करणेची तयारी त्यांनी दर्शविलेली आहे. ए.सी.जी.मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक हे संस्थान रुग्णालयामार्फत आलेल्या रुग्णांना सवलतीच्या दरात उपचार करणार असुन ए.सी.जी.मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक यांच्याकडुन तसे लेखी पत्र घेण्यात येईल.

संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान –

१) मा. व्यवस्थापन समिती दि. २०/०८/२०१७ विषय नं. ०७ निर्णय क्र. ६८२

२) मा. व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ विषय नं. ०२ निर्णय क्र. ५०७

विभागाचे स्पष्ट मत / अभिप्राय – मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप व ऑर्थो इंम्पलांटेशन शिबीराच्या अनुषंगाने खालील सर्व विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं | विभाग | कामाचे तपशिल | अंदाजे येणारा खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | ०१. सदर शिबीराकामी २५ हजार स्के, फुट आकाराची मंडप व्यवस्था,<br>०२.सदर मंडपामध्ये १२x१५ साईजचे ३० क्युबी सेल पार्टीशन<br>०३. ऑफीस टेबल १५ नग, खुर्च्या ५०० नग,<br>०४. स्टॅण्ड फॅन ५० नग विद्युत पावर पॉईन्ट ५० नग, लाईट सीएफएल ५० नग<br>०५. जाहीरातीकामी ३० ७x४ चे साईजचे फ्लेक्स बोर्ड, स्वागत कमान फ्लेक्स बोर्ड ०२ नग, १२x०६ चे ०३ नग<br>०६. संपुर्ण मंडपामध्ये कारपेट व्यवस्था<br>०७. मेडीकल चेक-अप टेबल ३० नग, गादी ३० नग | ५,००,०००/- |
| ०२ | कॅटीन विभाग | ०१. शिबीर कालावधीमध्ये कॅन्टीन विभागाने साईनगर मैदानात आपले स्टॉल उभारणी करुन चहा/कॉफी/मिनीरल वॉटरची व्यवस्था दर आकरणी करुन रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी करण्यात यावे.<br>०२. शिबीर कालावधीमध्ये अंदाजे ३०० व्यक्तींकरीता दैनंदिन दोन वेळेच्या चहाची मोफत व्यवस्था करणेत यावी.<br>०३. शिबीर कालावधीमध्ये बाहेरील वैद्यकीय अधिकारी तंत्रज्ञ यांचेकरीता कॉफी,बीस्कीटे, मिनरल वॉटर, यांची मोफत व्यवस्था आवश्यतेप्रमाणे करणेत यावी. | २०,०००/- |
| ०३ | श्री साईप्रसादालय विभाग | ०१. शिबीर कालावधीमध्ये बाहेरील येणा-या डॉक्टर तंत्रज्ञ, यांचेकरीता दोन वेळेच्या जेवणाची व्यवस्था व्ही.आय.पी. कक्षात मोफत करणेत यावी.<br>०२. शिबीर कालावधीमध्ये येणा-या डॉक्टर तंत्रज्ञ, तसेच इतर स्टाफ यांचेकरीता शंभर व्यक्तीकरीता मोफत नाष्टा पुरविणेत यावा.<br>०३. शिबीर कालावधीमध्ये बाहेरील येणा-या डॉक्टर व तंत्रज्ञ व इतर स्टाफ यांचेकरीता दोन वेळा जेवणाची व्यवस्था बाहेरील हॉटेलमध्ये करणेत यावी. | ५०,०००/- |
| ०४ | व्दारावती भक्तनिवास | शिबीर कालावधीमध्ये बाहेरुन येणा-या डॉक्टर तंत्रज्ञ विनामुल्य १० एसी रुमची मोफत व्यवस्था करणेत यावी. | २०,०००/- |
| ०५ | जनसंपर्क विभाग | ०१. शिबीरासाठी येणा-या मान्यवरांची दर्शन व आरतीची मोफत व्यवस्था करणेत यावी.<br>०२. शिबीराची अवश्यकते प्रमाणे प्रसिद्धी करणे तसेच शिबीर संपन्न झालेनंतर आपले विभागाकडून सविस्तर बातमी प्रसिध्द करणेत यावी. | २०,०००/- |
| ०६ | विद्युत विभाग | शिबीरस्थळी आवश्यतेनुसार योग्य ठिकाणी मागणीप्रमाणे विद्युत जोडणी लाईट, फॅन, कुलर, ची व्यवस्था करणेत यावी. | -- |
| ०७ | वाहन विभाग | बाहेरुन येणा-या डॉक्टर व तंत्रज्ञ यांचेकरीता जेवण व दर्शन कामी रुमवरुन ने आण करणेकामी वातानुकुलीन गाडीची मोफत व्यवस्था करणेत यावी. | २०,०००/- |
| ०८ | संरक्षण विभाग | ०१. शिबीरात आलेल्या मान्यवर डॉक्टर व तंत्रज्ञ यांचे दर्शन व आरतीची व्यवस्था मोफत करणेत यावी.<br>२. शिबीरा कालावधीत दोन शिफटमध्ये दोन अतिरिक्त सुरक्षारक्षकाची शिबीरस्थळी नेमणूक करणेत यावी. | २०,०००/- |
| ०९ | प्रकाशने विभाग | बाहेरुन येणारे डॉक्टर व तंत्रज्ञ यांचेकरीता मोफत ३० नग साईचरित्र, ३० श्री डी फोटो, मोफत पुरविणेत यावे. | २०,०००/- |
| १० | सि.सि.टी.व्ही विभाग | शिबीर कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार फोटोग्राफर व शुटींगचे व्यवस्था करणेत यावी. | -- |
| ११ | ध्वनीक्षेपण विभाग | शिबीर कालावधीमध्ये शिबीरस्थळी माईक, साऊंडव्यवस्था, करणेत यावी. | -- |
| १२ | वित्त विभाग, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीर कालावधीमध्ये शिबीराकामी आलेल्या अनुषंगिक खर्चास वेळेवर बील अदा करणेत यावे. | |
| १३ | कामगार विभाग | १. शिबीर कालावधीत २० कुशल परिचारीका/परिचारक तथा आया/वार्डबॉय २० | २०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपलब्ध करुन देण्यता यावे.<br>२. शिबीरा कालावधीत दोन शिफ्टमध्ये दोन अतिरिक्त सुरक्षारक्षकाची शिबीरस्थळी नेमणूक करणेत यावी. | |
| १४ | मेडीकल स्टोअर, श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीर कामी लागणारे मेडिसीन, तसेच इंम्प्लाट साहीत्य आपले विभागाकडुन आवश्यकतेप्रमाणे पुरविण्यात यावेत. | ७५,००,०००/- |
| १५ | श्री साईबाबा हॉस्पीटल / श्री साईनाथ रुग्णालय | शिबीराकामी किरकोळ अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात यावी. | १,००,०००/- |
| | | **एकुण खर्च रक्कम** | ८२,९०,०००/- |

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः-** सदर शिबीरामध्ये दाखल झालेल्या रुग्णांचे गुडघ्याचे सांधेरोपन व खुबा सांधेरोपन शस्त्रक्रीयेसाठी अनुक्रमे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयातील अस्थीरोग तज्ञांमार्फत रुग्णांची विभागणी करुन दोनही रुग्णालयामध्ये शस्त्रक्रीया करता येईल तसेच रुग्णांना लागणारी औषधे ही रुग्णालयाच्या आतिरीक्त वार्षिक औषध खरेदीमधुन वापरता येतील तसेच सांधेरोपन शस्त्रक्रियासाठी लागणारे इंम्प्लांटस हे संस्थानमधील सध्याच्या दराप्रमाणेच Consigment basis वर घेता येतील.

**प्रस्ताव-** तरी उपरोक्त नमुद केलेल्या एकुण रक्कम रुपये ८२,९०,०००/- पैकी गुडघ्याचे सांधेरोपन व खुबा सांधेरोपन शस्त्रक्रीयेसाठी ऑर्थो इंम्पलांट रुपये ५०,५०,०००/- चा खर्च अपेक्षीत आहे. तरी नांव नोदणी करणेत येणा-या रुग्णांना श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील असथीरोगतज्ञ डॉक्टर रुग्णांना आवश्यकतेनुसार तारीख देऊन शस्त्रक्रीया करतील. शिबीराकामी येणा-या मेडिसीन, इंम्प्लांट इत्यादी खर्चास व इतर अनुषंगिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अंदाजे खर्चास मान्यता असावी. तसेच उपरोक्त विभागाकडून विभागांतर्गत कामे करुन घेण्यास देखील मान्यता असावी.

तरी सदरहु प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील समारोप कार्यक्रमानिमित्त मोफत नेत्र तपासणी, चष्मे वाटप, सांधेरोपन शस्त्रक्रिया निदान शिबीर व कॅन्सर निदान शिबीराचे आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या सर्व समावेशक अंदाजे रक्कम रु.८२,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ **मंदिर परीसरातील साई सत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत आणि वातानूकलन कामे करणेसाठी येणा-या अंदाजे रु. ३५.७८ लक्ष इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता देणे.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद**-अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये “ भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये “ मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे ” या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** मंदिर परीसरातील साई सत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये साईभक्तांमार्फत सकाळी ७ ते ८ व ९ ते १० या वेळेत नित्याने अभिषेक पुजा करण्यात येते. तसेच सदरहू हॉलमध्ये श्रींचे आरतीकरीता येणारे सशुल्क पासधारक साईभक्तांकरीता प्रतिक्षालय म्हणुन सदर हॉलचा वापर करण्यात येतो. श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांना ध्यान साधना करणेकरीता सदरचे ठिकाणी बंदिस्त हॉल करुन ध्यान मंदिर बनविणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी ध्यान मंदिर करणेकरीता सध्याचे ठिकाणी साईभक्तांकरीता होत असलेली अभिषेक पुजा व आरतीसाठी येणारे सशुल्क पासधारक साईभक्तांचे प्रतिक्षालयासाठी इतरत्र पर्यायी व्यवस्था करावी लागेल.

ध्यान मंदिर करणेकरीता सदरहू ठिकाणी आर.सी.सी. कॉक्रीट, वीट बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, अॅल्युमिनियम दरवाजे व खिडक्या बसविणे, फॉल्स सिलिंग, वॉल पॅनेलिंग, इलेक्ट्रीकल वर्क्स, वातानुकूलन यंत्रणा इ.कामे करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजे रक्कम रु. |
|---|---|---|
| अ | सिव्हिल कामे | २२,७८,९११.०० |
| ब | इलेक्ट्रीकल वर्क्स | १,८२,७२०.०० |

| | | |
|---|---|---|
| क | वातानुकुलीत यंत्रणा बसविणे | ४,४७,३७२.०० |
| | रक्कम रु.- (अ) | २९,०९,००३.०० |
| | कन्टेंजन्सीज ५% - | १,४५,४५०.१५ |
| | GST- १८ % (अ ) वर | ५,२३,६२०.५४ |
| | **एकूण रु. -** | **३५,७८,०७३.६९** |
| | **पुर्णांकीत रुपये-** | **३५,७८,०७४.००** |

**विभागाचा अभिप्राय** – श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांना ध्यानसाधना करता यावी यासाठी ध्यानमंदिराची सुविधा असणे आवश्यक आहे. सध्या संस्थान परिसरात अशा प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. मंदिर परिसरातील सत्यनारायण पुजा हॉलचे वर पहिल्या मजल्यावरील उपरोक्त जागा ध्यान मंदिरासाठी योग्य आहे. तरी सदर ठिकाणी सध्या होत असलेली अभिषेक पुजा व आरती पासधारकांसाठी प्रतिक्षालय या व्यवस्था इतरत्र स्थलांतरीत करुन सदर ठिकाणी ध्यान मंदिर करणेत यावे असे मत आहे.

**प्रस्ताव** – मंदिर परीसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी उपरोक्त दर्शविलेल्या तपशिलानुसार स्थापत्य,विद्युत व वातानुकूलन कामे करणेसाठी खालिल बाबींवर निर्णय होणेस विनंती.

१) एकुण रु. ३५.७८ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देणे.

२) सिव्हील मेकॅनिकल व विद्युत कामांसाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने बांधकाम विभागामार्फत विहीत पद्धतीने एकत्रित स्वरुपात एकच ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.

तरी प्रस्तावातील वरील बाबींबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनार्थ येणा-या साईभक्तांना ध्यानसाधना करता यावी यासाठी ध्यानमंदिराची सुविधा असणे आवश्यक आहे. सध्या संस्थान परिसरात अशा प्रकारची सुविधा उपलब्ध नाही. मंदिर परिसरातील सत्यनारायण पुजा हॉलचे वर पहिल्या मजल्यावरील उपरोक्त जागा ध्यान मंदिरासाठी योग्य आहे.**

**त्यासाठी आर.सी.सी. कॉक्रीट, वीट बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, अ‍ॅल्युमिनियम दरवाजे व खिडक्या बसविणे, फॉल्स सिलिंग, वॉल पॅनेलिंग, इलेक्ट्रीकल वर्क्स, वातानुकूलन यंत्रणा इ.कामे करणेस तसेच सिव्हील मेकॅनिकल व विद्युत कामांसाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने बांधकाम विभागामार्फत विहीत पद्धतीने एकत्रित स्वरुपात एकच ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३५.७८ लक्ष इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग/ उप कार्यकारी अभियंता,विद्युत विभाग/मॅकेनिकल विभागप्रमुख)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४ निर्णय क्र.५७० श्री विठ्ठल रुख्यमीणी देवस्थान, पंढरपुर चे व्यवस्थापक आजचे व्यवस्थापन समितीसमोर उपस्थित होते. त्यांनी सादर केलेले प्रस्तावावर चर्चा झाली पंढरपुर येथे अन्नछत्र बांधण्यासाठी संस्थानमार्फत अनुदान देणेबाबत चर्चा झाली. याकरीता श्री विठ्ठल रुख्यमीणी देवस्थान, पंढरपुर यांचेकडून अन्नछत्र बांधण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव, Estimate आणी Design घेवून व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५ निर्णय क्र.५७१ मा.पंतप्रधान महोदय व मा.मुख्यमंत्री महोदय यांचे कार्यक्रमाचे दिवशी साई सेवकांचे संमेलन आयोजित करावे. साई सेवकांची साईधर्मशाळा येथे मोफत निवास व जेवण व्यवस्था करणेत यावी.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख, विभाग प्रमुख साईधर्मशाळा, प्र. कामगार अधिकारी, श्री साईप्रसादालय विभाग )**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६ निर्णय क्र.५७२ योगीराज सदगुरु गंगागिर महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह संस्थान व शिर्डी ग्रामस्थां तर्फे आयोजीत करण्यात आला होता, त्याकामी संस्थान तर्फे रु. ७५ लाखाचे अनुदान मंजूर करण्यात आले होते, त्यापैकी रु. ५१ लाख योगीराज सदगुरु गंगागिर महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीस यापुर्वी देण्यात आलेले आहे, सप्ताह कामी ५२.२८ एकर जमीन अधिग्रहीत करण्यात आली होती, त्याकामी रु. ५,२७,०००/- इतका खर्च आला आहे, सदरचा खर्च सप्ताह समितीस देय रक्कम रु. २४ लाख मधून कपात करुन उर्वरीत रक्कम**

रु. १८,७३,०००/- सप्ताह समितीस देण्यात यावे, तसेच सप्ताह कालावधीत संस्थानचे इतर विभागामार्फत करण्यात आलेल्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१७ निर्णय क्र.५७३ श्री साई सेवक मंडळ, साई मंदिर कोल्हापूर यांना दि. २५/०९/२०१८ व दि. २६/०९/२०१८ रोजी श्रींच्या मुळ पादुका भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- शताब्दी कक्षप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८ निर्णय क्र.५७४ शताब्दी वर्षाच्या समारोपासाठी विविध माध्यमाव्दारे व्यापक स्वरुपात जाहिरात करण्याबाबत आजचे सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली, तथापी भाविकांच्या दर्शनासाठी समाधी मंदिराची क्षमता मर्यादीत असल्याने संस्थानने कोणत्याही पध्दतीची जाहिरात करु नये असे ठरले. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी )

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१९ निर्णय क्र.५७५ आजचे सभेत डॉ. प्रबोध जोशी, अध्यक्ष, वनवासी, कल्याण आश्रम , अहमदनगर जिल्हा व इतर यांनी समक्ष् येऊन वनवासी कल्याण आश्रमा मार्फत दि. ३०/०९/२०१८ ते दि. ०२/१०/२०१८ या कालावधीत आयोजीत होणाऱ्या शिबीरासाठी संस्थानने दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानले, परंतू त्याच वेळेस त्यांनी यापुर्वी संस्थानने केलेल्या व्यवस्थे व्यतिरिक्त सदरहू शिबीरासाठी खालील प्रमाणे अतिरिक्त व्यवस्था होणेसाठी विनंती केली.

वॉटर प्रुफ मंडप

अ) प्रदर्शनी – (१०८ X १०५ फुट = ११,४०० स्क्वे.फुट)

ब) पुजा – (२५६ X १५० फुट = ३८,४०० स्क्वे.फुट )

भोजन, चहा व नाष्टा

अ) अतिरीक्त ६०० ते ७०० व्यक्तींकरीता भोजन व चहा

ब) अतिरीक्त ६०० ते ७०० व्यक्तीसाठी सकाळचा नाष्टा व ३२५० व्यक्तीसाठी दुपारचा नाष्टा.

क) संस्थानचे साईनाथ हॉस्पीटलमार्फत आरोग्य (चिकित्सा) व्यवस्था.

ड) संमेलनस्थळी वाढीव खुर्च्याची व्यवस्था.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रमाणे अतिरिक्त वॉटरप्रुफ मंडप टाकणेस, अतिरीक्त भोजन,चहा, नाष्टा उपलब्ध करुन देणेस तसेच साईनाथ हॉस्पीटल मार्फत आरोग्य (चिकित्सा) व्यवस्था उभारणेस व वाढीव खुर्च्या उपलब्ध करुन देणेस व याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही - शताब्दी कक्षप्रमुख )

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२० निर्णय क्र.५७६ मेळघाट (अमरावती ) येथील आदिवासी बांधवांसाठी कामकरणाऱ्या डॉ. स्मीता कोल्हे यांचेवर श्री साईबाबा संस्थानच्या श्री साईबाबा रुग्णालयात मोफत सांधेरोपन शस्त्रक्रीया करणेबाबत होणाऱ्या सर्व समावेशक अनुषंगीक रु.९०,२९०/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. व त्यांना विशेषबाब म्हणून श्री साईबाबा रुग्णालयात डिलक्स रुम मध्ये भरती करुन शस्त्रक्रीया करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही – श्री साईबाबा हॉस्पीटल)

---

वरील निर्णय क्र.५३६ ते ५७६ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.